# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०४/२००९** **दिनांक ०५.०४.२००९**

**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- दुपारी २.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे रविवार दिनांक ०५ एप्रिल,२००९ रोजी दुपारी २.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-३६२९-२००९, दि.३०.०३.२००९ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा रविवार दिनांक ५.०४.२००९ रोजी दुपारी २.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा.अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष
०२. मा.श्री.शंकरराव गेणुजी कोल्हे,उपाध्यक्ष,
०३. मा.श्री.पांडुरंग गमाजी अभंग
०४. मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे
०५. मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर
०६. मा.श्री.रमाकांत गणेश कर्णिक
०७ मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर
०८. मा.सौ.सुमित्रा कैलास कोते

मा.श्री.किशोर रा. मोरे,कार्यकारी अधिकारी
मा.डॉ.यशवंतराव व. माने,उप-कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११(२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष, श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील, मा.श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव, मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे, मा.श्रीमती रिम्पल लोहिया, मा.श्री.कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्डेय व डॉ.पी.एल.तिवारी यांनी दूरध्वनीवरुन तसेच मा.श्री.समि खतिब व मा.श्री.कॅप्टन सुरेश वासुदेवा यांनी फॅक्स पत्राद्वारे कळविले त्याची नोंद घेण्यात येऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करण्यात आली.

**विषय नं.०१** **दिनांक ०८.०३.२००९ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.३१७** दिनांक ०८.०३.२००९ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेत असताना खालीलप्रमाणे दुरुस्या करण्यात आल्या.

**(०१) निर्णय क्र.२७६ मधील शेवटचा परिच्छेद-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, Puritan Bennett 840 व्हेन्टीलेटर अॅडल्ट-१० नग हे मे.बायोमेडिकॉन सिस्टम (इं) प्रा.लि.,मुंबई यांचेकडून भारतीय रुपयातील L/C द्वारे (सर्व कर व ड्यूटी सह) एकूण २७५००० US डॉलर इतक्या रकमेत (पुरवठा आदेश देतेवेळेस असलेल्या विनिमय दराने) तसेच Multi Para metor Monitor व CNS हे L&T कंपनीचे मे.एक्सेल कार्पोरेशन नाशिक यांचेकडून खरेदी करण्यात यावीत,असे ठरले.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे**

यावर सविस्तर चर्चा होऊन Puritan Bennett 840 व्हेन्टीलेटर अॅडल्ट-१० नग हे मे.बायोमेडीकॉन सिस्टीम (इं) प्रा.लि., मुंबई यांचेकडून भारतीय रुपायातील L/C द्वारे (सर्व कर व ड्यूटीसह) एकूण २७५००० US डॉलर इतक्या रकमेत (पुरवठा आदेश देतेवेळेस असलेल्या विनिमय दराने) तसेच Multi Para metor Monitor व CNS हे L & T कंपनीचे मे.एक्सल कार्पोरेशन, नाशिक यांचेकडून खरेदी करण्यात यावीत, याशिवाय सदर प्रस्तावातील न्यूरो ओ.टी. साठी लागणारी खालील हॉस्पिटल फर्निचर तसेच मशिनरी उपकरणे खरेदीस मान्यता देण्यात आली .

| Sr.No. | Name of Supplier | Sr.No. of Furnitre | Amt. in Rs. |
|---|---|---|---|
| 1 | Quali Surge Surgical Pvt. Ltd., Pune | Sr.No. B - 1 to 10, 13, 16, 17, 18 C – 5, 6, 7 | 763593.75 |
| 2 | Shree Hospital Equip, Ichalkaranji | Sr.No. 14 (Operating Chair with Hand Rest) | 3037.50 |
| 3 | Kanchan Drugs, Pune | Sr.No. C - 1 to 4 | 9900.00 |
| 4 | Sai Enterprises, Shrirampur | Sr.No. 11 (Cupboard - 6 Nos.) | 80700.00 |
| | | **Total in Rs.** | **857231.25** |

**(A) Machinery / Equipment –**

| Sr. No. | Name of Machinery / Equipment | Make / Model | Name of Tenderer | Qty. | Rate Per | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|
| 01. | Boyles Anaesthesia with ventilator | L&T Elite 615 | Excel Corporation, Nashik | 02 | 654885.00 | 1309770.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 02. | Boyles Anaesthesia without ventilator | L&T Elite 615 | Excel Corporation, Nashik | 02 | 460845.00 | 921690.00 |
| 03. | Defibrillator | DF2509R | BPL Ltd., Mumbai. | 03 | 123500.00 | 370500.00 |
| 04. | Electrosurgical Generator Cautery machine | Shalya MX Xcellance | Aditi Enterprises. Nashik | 01 | 225000.00 | 225000.00 |
| 05. | Central Nursing Station for 8 monitors for above monitors for ICCU | Philips Intellivue for MP 20 | Philips, Mumbai | 01 | 445000.00 | 445000.00 |
| 06. | Syringe Pump | Perfusor Compact | B.Braun, Mumbai | 40 | 52596.00 | 2103840.00 |
| 07. | U.P.S (5 K.V.A.) | AVO ISO 9001-02 | Tejas Electronics, Ahmednagar | 02 | 64220.00 | 128440.00 |
| 08. | Noiseless Electric Suction Machine S/S Body | | Kanchan Drugs, Pune | 03 | 8437.50 | 25312.00 |
| 09. | Multi Channel E.C.G. Machine 12 Leads with display & Accessories | 8408 View | BPL, Mumbai. | 01 | 95000.00 | 95000.00 |
| 09. | Mobile Single Light Dome - with 19" Dome | | A.G. Joshi & Co., Pune | 01 | 29250.00 | 29250.00 |
| 10. | ACT machine | Helena Luxtech Corpn. USA | B.L.LifeScience, Delhi | 01 | 104000.00 | 104000.00 |
| 11. | Light Source With Fiber optic cable (3 mtr) | | Kanchan Drugs, Pune | 01 | 8437.50 | 8437.50 |
| 12. | Deep vein Thrombosis - prevention device with all attachment | TYCO SCD | Prabha Surgical, Mumbai | 01 | 253125.00 | 253125.00 |
| 13. | TEE Probe – Adult | Philips Omni III | Care Mediquip, Mumbai | 01 | 2000000.00 | 2000000.00 |
| 14 | Magnitude Multiparameter Monitor for MRI | Magnitude Invio USA | Summit, Mumbai | 01 | 2301390.00 | 2301390.00 |
| 15 | Dialysis Machine | Nipro Surdial | Atlantic Pharma, Mumbai | 01 | 495000.00 | 495000.00 |
| 16 | Electric Sterlizer | | Kanchan Drugs, Pune | 02 | 4500.00 | 9000.00 |
| | | | | | **Total in Rs.-** | **10824754.50** |

**(C) Surgical Instrument :-**

| Sr.No. | Name of Instrument | Name of Tenderer | Qty. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | General Surgery Instrument | Kalelkar Surgical, Mumbai | - | 1920864.40 |
| 02. | E.N.T. Instrument | Chimco Bio-medical Eng. Co., Mumbai | - | 255135.00 |
| | | Kalelkar Surgical, Mumbai | - | 214913.12 |
| 03. | Gynecology Instruments | Kalelkar Surgical, Mumbai | - | 162482.37 |
| 04. | Laparoscopic Instruments (Karl Storz) | Chimco Bio-medical Eng. Co., Mumbai | - | 2203826.00 |
| 05. | Cardiac Surgery Instruments | Zenith Surgical, Mumbai | - | 528512.00 |
| | | Kalelkar Surgical, Mumbai | - | 47262.16 |
| | | B.L.Lifescience, Mumbai | - | 1126137.00 |
| | | | **Total in Rs.** | **6459132.05** |

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(०२) निर्णय क्र.२८६ मधील शेवटचा परिच्छेद-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, शिवशक्ती इंजिनिअरींग ॲण्ड फॅब्रीकेशन वर्क्स, बाभळेश्वर यांना उर्वरित शिल्लक रक्कम रू.६२,५००/- मात्र देण्यात येऊ नये. तसेच रुपये एक लाख मात्रचा दावा दाखल करु नये असे ठरले.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, शिवशक्ती इंजिनिअरींग ॲण्ड फॅब्रीकेशन वर्क्स, बाभळेश्वर यांना उर्वरित शिल्लक रक्कमे **पैकी रू.५०,०००/- मात्र देण्यात देण्यात यावे** व रु १२,५००/- दंड म्हणून घ्यावेत. तसेच रुपये एक लाख मात्रचा दावा दाखल करु नये असे ठरले. (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**(०३) निर्णय क्र.२८९ मधील शेवटचा परिच्छेद-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, कनिष्ठ महाविद्यालयाकरीता १५ केव्हीए साउंड प्रुफ जनरेटरसेट खरेदीकामी येणारे अंदाजे एकूण रक्कम रुपये ६,८८,१५७.०० चे खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, कनिष्ठ महाविद्यालयाकरीता **कमिन्स कंपनीचा १५ केव्हीए** साउंड प्रुफ जनरेटरसेट खरेदीकामी येणारे अंदाजे एकूण रक्कम रुपये ६,८८,१५७.०० चे खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

यानंतर सदर इतिवृत्त वाचुन कायम करण्यात आले.

**विषय नं.०२ नोंद घेण्याचे विषय.**

**०१ (अ) जमा खर्च तक्ता फेब्रुवारी,२००९**

**(ब) माहे फेब्रुवारी,२००९ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**(ड) माहे फेब्रुवारी,२००९ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(इ) माहे फेब्रुवारी,२००९ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र.३१८** (A) माहे फेब्रुवारी,२००९ मधील जमा रु २०,४९,३९,६३०.०१ आणि खर्च रुपये १४,११,८३,०७८.८५ चा तक्ता, मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर रक्कम रुपये २५ हजार पर्यंतच्या सर्वसाधारण खर्चाचा तपशील फेब्रुवारी,२००९ रुपये २,५०,१७४.०० चा तक्ता, दिनांक २६.३.२००९ अखेर संस्थानची गुंतवणूक रुपये ३,३६,५४,४७,६६६.०० चा तक्ता, माहे फेब्रुवारी,२००९ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने चांदी, कापड व इतर वस्तूसह आलेल्या एकूण रुपये ५,७५,०७,१९६.०० देणगीचा तक्ता, माहे फेब्रुवारी,२००९ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा विक्रीचा रुपये १,६२,४४९.०० चा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, **त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.**

**०२. श्री साईबाबा रुग्णालयात माहे फेब्रुवारी,२००९ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ३१८** (B) श्री साईबाबा रुग्णालयात माहे फेब्रुवारी,२००९ मध्ये वैद्यकीय बीलांमध्ये रुपये १३,५८,८८१.०० देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, **त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली**

**०३. साईनाथ रुग्णालयात माहे फेब्रुवारी,२००९ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ३१८** (C) श्रीसाईबाबा रुग्णालयामध्ये माहे फेब्रुवारी,२००९ मध्ये रुपये ६४,४७,३२५.०० देण्यात आलेल्या अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, **त्याची नोंद घेण्यात येऊन, मान्यता देण्यात आली.**

**०४. श्रीसाईनाथ रुग्णालय माहे फेब्रुवारी,२००९ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ३१८** (D) साईनाथ रुग्णालयात माहे फेब्रुवारी,२००९ मध्ये साईनाथ रुग्णालयातील रुग्णांना अंतररुग्ण रुपये ५७,८३०.०० बाह्य रुग्ण रुपये ५०,८६८.००.०० थॅलसेमिया व हिमोफेलिया रुपये ५१,०५०.०० वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, **त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली**

**०५. माहे फेब्रुवारी,२००९ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ३१८** (E) फेब्रुवारी,२००९ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या ३६,९४२ कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, **त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली**

**०६. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ३१८** (F) बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता "अ" व "ब" यांच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. **त्याची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**०७. पाणी तपासणी अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ३१८** (G) माहे फेब्रुवारी,२००९ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, **त्याची नोंद घेण्यात आली.**

**विषय नं.०३ श्रीसाईनाथ रुग्णालय फर्निचर करणेकामी आलेल्या निविदा उघडून निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३१९** श्री साईनाथ रुग्णालयाचे मागणी नुसार चौकशी काउंटर, गोळ्या औषधे वाटप कक्षात फर्निचर व मेडीकल सब स्टोअर तसेच वैद्यकीय अधिक्षिका यांचे कक्षात टेबल इ. फर्निचर करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०८/०२/२००९ रोजीचे सभेत मान्यता मिळालेली आहे. तसेच याकामी येणारे रक्कम रुपये ३,५३,०००.०० मात्रचे खर्चास व संस्थानचे आर्किटेक्ट पॅनल वरिल आर्किटेक्ट शितल जोशी, श्रीरामपूर यांचेकडून सविस्तर प्लॅन व एस्टिमेट बनविणेस मान्याता मिळाली आहे.

त्यानुसार आर्किटेक्ट यांचेकडून निविदा तयार करुन फर्निचरचे काम करणाऱ्या दहा ठेकेदारांना निविदा खरेदी करणेस व दि. २६/०२/२००९ अखेर सिलंद निविदा जमा करणेस कळविले होते. परंतू सदरच्या मूदतीत एकही निविदा जमा झाली नाही. नंतर इकडील दि. १२/०३/२००९ रोजीच्या टिपणी नुसार सदरच्या ठेकेदारांना दि. २४/०३/२००९ पर्यंत निविदा जमा करणेस कळविण्यात आले. सदरच्या विहित मूदतीत मे. बी.डी. मिस्त्री व मे. मगर जायभावे असोसीएट यांनी सिलबंद निविदा सादर केल्या आहेत. तसेच काही ठेकेदारांनी दि. ०१/०४/२००९ अखेर निविदा सादर करु असे दूरध्वनीवर सांगितले आहे. तरी किमान तिन निविदा प्राप्त होण्याचे दृष्टीने दि. ०१/०४/२००९ अखेर प्राप्त होणाऱ्या निविदा विचारात घेता येतील.

तरी साईनाथ रुग्णालयासाठी फर्निचर बनविणेकामी दि. ०१/०४/२००९ अखेर जमा खालीलप्रमाणे निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | पार्टीचे नांव | निविदेतील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | M/s B.D. Mistry, Kothrud-Pune | ३,७३,०००/- | अनुपस्थित |
| ०२ | M/s K.K. Construction, Nasik | ३,५९,०००/- | ३,५९,०००/- |
| ०३ | M/s Magar Jaibhave Associates, Nasik | ३,७८,५५५/- | ३,३५,०००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन M/s Magar Jaibhave Associates, Nasik यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.०४ द्वारावती इमारत उत्तर बाजू कंपाऊण्ड उंची वाढविणे निविदा उघडुन निर्णय घेणे**

**निर्णय क्र.३२०** **अ)** संस्थानचे शिर्डी येथील स.नं. १४८ मधिल द्वारावती भक्तनिवास इमारतीचे काम पुर्ण झाले असून साईभक्तांचे वापरासाठी इमारत चालू करण्यात आली आहे. इमारतीचे उत्तर बाजूचे कंपाउंड वॉलची उंची परिसर विकासकामे केल्यानंतर फ्लोअर लेव्हलचे वर २' ते २'६" झालेली आहे. त्यामुळे आसपास राहणारे रहिवाशी कंपाउंड वॉल ओलांडून इमारतीचे पार्कीगसाठीच्या मोकळया जागेत आत येउ शकतात. तसेच भविष्यात सुरक्षेच्या दृष्टीनेदेखील सदर कंपाउंड वॉलची उंची वाढविणे गरजेचे आहे.

आर्कीटेक्ट श्री. काबरे यांनी कंपाउंड वॉलची उंची वाढविणेकामी कॉंटिंजन्सिज व आर्कीटेक्ट फीसह रु.१०,५४,७००.००रकमेचे अंदाजपत्रक व आराखडे सादर केले आहेत. सदर कामामध्ये आर्कीटेक्ट यांनी सध्याचे कंपाउंड वॉलचा पाया दगड बांधकामात असल्याने सध्याचे कंपाउंड वॉलवर नवीन कॉलम्स, बीम, बांधकाम व त्यावर गॅल्व्हनाईजड वेल्डेड मेश अँगल फ्रेममध्ये बसवून फ्लोअर लेव्हलचे वर ९ फुट उंची करणेबाबत तरतुद केलेली आहे.

**ब)** मा.व्यवस्थापन समितीचे दि. १५.११.२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८४५ अन्वये सविस्तर चर्चा होऊन " प्रस्तावित केलेप्रमाणे व्दारावती इमारत उत्तर बाजू कंम्पाऊंड भिंतीची उंची वाढविण्यास व याकामी येणारे सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली आहे. ठेकेदार मे. गोलानी बिल्डर्स हे मंजूर निवीदा दराने काम करण्यास तयार असल्यास त्यांचेकडून सदर काम करण्यात यावे अन्यथा याकामी निवीदा मागवून काम करुन घेण्यात यावे " असे ठरले.

**क)** उपरोक्त "**ब**" प्रमाणे मा. व्यवस्थापन समितीचे झालेले निर्णया प्रमाणे ठेकेदार मे. गोलानी बिल्डर्स यांना सदरचे कामाबाबत विचारणा केली असता त्यांनी असमर्थता दर्शविलेली आहे. करीता सदर कामासाठी आर्किटेक्ट मे. काबरे चौधरी, नाशिक यांचेकडून निवीदा फॉर्म तयार करुन दि. २३.०३.२००९ ते दि. २८.०३.२००९ अखेर निवीदा विक्रीची मुदत देऊन दि. ३०.०३.२००९ रोजी सिलबंद निवीदा सादर करणेबाबत वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिद्ध करणेत आली होती. त्यानूसार विहीत मुदतीत खालील निवीदाधारकांनी कोरे निवीदा फॉर्म विकत घेतलेले आहे.

०१. यशवंत डी. गाढे, माहेगांव देशमुख
०२. इंजि. पाटील योगेश सुरेश, कोपरगांव

०३. श्री. मिलींद एस. पाचोरकर, नाशिक
०४. इंजि. सचिन व्हि. बनकर, औरंगाबाद
०५. जाधव पी. बी., संगमनेर

वरिल "क" प्रमाणे एकुण ०५ निवीदा धारकांनी कोरे निवीदा फॉर्म विकत घेतलेले असून त्यांनी विहीत मुदतीत सिलबंद निवीदा सादर केल्या आहेत. तरी प्राप्त झालेल्या सिलबंद निवीदा आजचे सभेत उघडून त्यावर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी आजचे सभेपूढे सादर केला होता. त्यानुसार प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेपूढे समक्ष उघडण्यात आल्या त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| **अ.नं.** | **पार्टीचे नांव** | **निविदेतील दर रुपये** | **चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये** |
|---|---|---|---|
| ०१ | इंजि. पाटील योगेश सुरेश, कोपरगांव | ५% अधिक (१०,१३,७०५.७०) | ९,६५,४३४.०० |
| ०२ | जाधव पी. बी., संगमनेर | ५% अधिक (१०,१३,७०५.७०) | ९,००,०००.०० |
| ०३ | यशवंत डी. गाढे, माहेगांव देशमुख | १२. ६% अधिक (१०,८७,०७८.६८) | १०,८७,०७८.६८ |
| ०४ | श्री. मिलींद एस. पाचोरकर, नाशिक | १०% अधिक (१०,६१,९७७.४०) | १०,६१,९७७.४० |
| ०५ | इंजि. सचिन व्हि. बनकर, औरंगाबाद | १५% अधिक (११,१०,२४९.१०) | १०,४२,६६८.००० |

**वरीलप्रमाणे निविदासादरकर्त्यांशी केलेले चर्चा तथा वाटाघाटीअंती मे. जाधव पी. बी., संगमनेर यांचे दर निम्नतम स्वरुपाचे असल्याने त्यांचे दर स्विकारुन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.०५ साईआश्रम इमारतीमध्ये लिफ्ट बसविणेकामी प्राप्त झालेल्या टेंडरमधील कमर्शियल बीडस् उघडून टेंडरसादरकर्त्यांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**निर्णय क्र.३२१** साईआश्रम इमारतीचे काम शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई (तामिळनाडू) यांचेमार्फत चालू आहे. मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक २२-०९-२००७ चे सभेतील आयत्या वेळचा विषय क्र.२३ निर्णय क्र.७६८ अन्वये साईआश्रम प्रकल्पचे बांधकाम सुरु झालेनंतर नियोजित सर्व इमारतींमध्ये लिफ्ट (Lift) बसविणेसाठी विद्युत विभागामार्फत कार्यवाही सुरु करण्यात यावी असे ठरले आहे.

या इमारतीमधून लिफ्ट बसविणेकामी टेंडर मागविणेकामी लागणारे टेंडर डाक्युमेंटच्या १० प्रती या प्रकल्पाचे आर्किटेक्ट मे.डी.ओ.निकम, पुणे यांचेकडून आता प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. दिनांक १५-१२-२००८ ते दिनांक २९-१२-२००८ असा टेंडर विक्री कालावधी ठेवण्यात आला होता. टेंडर सादर करण्याची मुदत दिनांक ३०-१२-२००८ अखेर अशी ठेवण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या टेंडरसचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.जॉनसन लिफ्टस् प्रा.लि., पुणे |
| ०२ | मे.कोने ईलेव्हेटर इंडिया प्रा.लि., पुणे. |

उपरोक्तप्रमाणे आलेली टेंडरमधील टेक्नीकल बीडस् उघडून ती संस्थान कन्सल्टंट, डी.ओ.निकम, पुणे यांचेकडे अभिप्रायासाठी पाठविण्यात आली होती. त्यांनी ती मे.डॉर्स्च कन्सल्टंट या साईआश्रम इमारतीकरीता नेमलेल्या पीएमसीकडे पाठविली होती. मे.डॉर्स्च कन्सल्टंट यांनी त्यांचा अभिप्राय दिला असून तो खालीलप्रमाणे-

०१. दोन्ही कंपन्यांचे टेक्नीकल स्पेसिफिकेशन सारखेच आहे.
०२. मे.कोने ईलेव्हेटर इंडिया प्रा.लि., पुणे यांनी ऑर्डरसोबत १० टक्के ॲडव्हान्सची तर मे.जॉनसन लिफ्टस् प्रा.लि., पुणे यांनी ३० टक्के ॲडव्हान्सची मागणी केली आहे.
०३. दोघांनीही काम करण्यासाठी बारा महिन्यांची (एक वर्षाची मुदत) मागितली आहे.

उपरोक्तप्रमाणे साईआश्रम इमारतींमध्ये लिफ्ट बसविणेकामी प्राप्त झालेल्या टेंडर्समधील कमर्शिअल बीडस् आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | पार्टीचे नांव | मागणी | निविदेतील दर रु. | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|---|
| ०१ | मे.जॉनसन लिफ्टस् प्रा.लि., पुणे | २० नग | Gear Drive २,७२,००,०००.०० | Gear Drive २,७२,००,०००.०० |
| | | २० नग | Gear Less Drive २,९७,००,०००.०० | Gear Less Drive २,९२,००,०००.०० |
| ०२ | मे.कोने ईलेव्हेटर इंडिया प्रा.लि., पुणे. | २० नग | Gear Drive ३,४९,२०,०००.०० | Gear Drive ३,३१,७४,०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन,

**०१. लिफ्ट खरेदीकामी फेरनिविदा मागविण्यात याव्यात.**

**०२. यापूर्वी टेंडर भरलेल्या मे.जॉनसन लिफ्टस् प्रा.लि., पुणे व मे.कोने ईलेव्हेटर इंडिया प्रा.लि., पुणे यांनाही पुन्हा निविदा सादर करावयास सांगण्यात यावे. परंतु त्यांचेकडून निविदेची किंमत न घेता त्यांना कोऱ्या निविदा देण्यात याव्यात.**

**०३. ओटीस कंपनीला टेंडर फेरनोटीसबाबत लेखी पत्रान्वये कळविण्यात यावे,असें ठरलें.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.०६ श्री साईबाबा रुग्णालयातील कॅन्टीन भाडे तत्वावर चालविण्यास देणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**निर्णय क्र.३२२** श्री साईबाबा रूग्णालयात भाडे तत्वावर कॅन्टीन चालविणेस देणेकामी दि. २८/०१/२००९ चे टिपणीन्वये वर्तमान पत्रात जाहिरात देण्यास मान्यता मिळालेली होती. त्यास अनुसरून दैनिक लोकमत या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि. २३/०२/२००९ ते दि. ०४/०३/२००९ अखेर श्री साईबाबा हॉस्पिटलच्या कार्यालयात १० निविदा व मुंबई कार्यालयात १० निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि. ०६/०३/२००९ अखेर ठेवण्यात आली होती. त्यापैकी शिरडी येथील कार्यालयात १० निविदांची विक्री झालेली आहे, तर मुंबई येथील कार्यालयात ०० निविदा विक्री झालेली आहे. त्यास अनुसरून एकुण ०४ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्या खालिलप्रमाणे-

०१) श्री शांताराम नामदेव कोटकर, तळेगाव दिघे, संगमनेर
०२) श्री नामदेव भटू पाटील, शिर्डी
०३) विराज केटरर्स, अ. नगर
०४) सदगुरू हरीहर महाराज स्वयंरोजगार सहकारी संस्था, अ.नगर

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०४ सिलबंद निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | पार्टीचे नांव | निविदेतील दर रुपये (प्रती महा रु.) | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये (प्रती महा रु.) |
|---|---|---|---|
| ०१ | श्री शांताराम नामदेव कोटकर, तळेगाव दिघे, संगमनेर | २५,०००.०० | अनामत रक्कम भरलेली नसल्याने अपात्र. |
| ०२ | श्री नामदेव भटू पाटील, शिर्डी | ३५,०००.०० | ४५,०००.०० |
| ०३ | विराज केटरर्स, अ. नगर | ३०,०००.०० | ३५,०००.०० |
| ०४ | सदगुरू हरीहर महाराज स्वयंरोजगार सह. संस्था, अ.नगर | ४१,०००.०० | ४६,०००.०० |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सदगुरू हरीहर महाराज स्वयंरोजगार सहकारी संस्था, अ.नगर यांचे उच्चतम दर स्वीकारणेत येऊन त्यांना श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅन्टीन भाडेतत्वावर चालविणेकामी कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

**विषय नं.०७ श्री साईनाथ रुग्णालयाकरीता आर्थोस्कोप सेवर खरेदीकामी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३२३** श्री साईनाथ रुग्णालयातील आर्थोपेडीक सर्जन डॉ. प्रशांत पठारे यांनी एक आर्थोस्कोपी सेवरची मागणी केलेली आहे. कारण सध्या श्री साईनाथ रुग्णालयात आर्थोपेडीकच्या शस्त्रक्रिया करणेसाठी सदरचे सेवर नाही. सदर प्रकारच्या वर्षातून जवळजवळ ४० ते ५० रुग्णांच्या शस्त्रक्रिया होत असतात व त्याचा फायदा रुग्णांना मिळू शकेल. सध्या अशा प्रकारचे सेवर फक्त श्री साईबाबा रुग्णालयात असून श्री साईनाथ रुग्णालयात गरज लागलेस ते श्री साईबाबा रुग्णालयातून वापरावयास नेण्यात येते.

सदरचे आर्थोस्कोपी सेवर खरेदीकामी दि. १२/१२/२००८ रोजीचे मा. उपसमिती सभेत विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४,५०,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार इकडील पत्र क्र. १८९५१ दि. ३०/१२/२००८ अन्वये एकुण ११ पुरवठा धारकांकडून दि. १०/०१/२००९ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन ४ कोटेशन प्राप्त झालेले होते, ते खालीलप्रमाणे -

01. M/s. Biomedicon System (I) Pvt.Ltd., Mumbai
02. M/s. Everest Medical Technologies Pvt.Ltd., Mumbai
03. M/s. Chimco Bio-Medical Engineering Co., Mumbai
04. M/s. Eagle Medical Systems Pvt.Ltd., New Delhi

वरीलप्रमाणे प्राप्त बंद कोटेशन दि. ०८/०३/२००९ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये समक्ष उघडण्यात आलेली आहेत. सदरचे कोटेशनचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येऊन तो या क्षेत्रातील तज्ञ डॉक्टर डॉ. रामाराव - (आर्थोपेडीक सर्जन) हैद्राबाद, जे महिन्यातून एक वेळेस श्री साईबाबा रुग्णालयात मोफत सेवा देतात, त्यांना दाखविण्यात आला होता. त्यांनी उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास करुन Smith & Nephew या कंपनीची आर्थोस्कोपी सेवर सिस्टीम घेण्याची शिफारस केलेली असून तुलनात्मक दरांचे तक्त्यात त्यांचे दर देखील निम्नत्तम येतात.

त्यांचे शिफारशीनुसार सदरचे खरेदीकामी रु. ५,६२,५००/- इतका खर्च येईल. त्यानुसार Smith & Nephew या कंपनीचे दर दिलेले कोटेशन धारक मे. एव्हरेस्ट मेडीकल टेक्नोलॉजीस प्रा. लि., मुंबई यांना दरात अजुन सुट मिळणेकामी आजचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटी बोलविण्यात आले असता त्यांनी चर्चा/ वाटाघाटीमध्ये रु.५,१७,५००.०० मात्र अंतीम दर देऊ केला.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाकरीता आर्थोस्कोप सेवर खरेदीकामी मे.एव्हरेस्ट मेडिकल टेक्नॉलॉजीस प्रा.लि., मुंबई यांचे दर स्वीकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

**विषय नं.०८** **द्वारकामाई धुनीकरीता रान शेणगोवरी खरेदीकामी आलेल्या निविदा उघडून निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३२४** समाधी मंदिर विभागाकडील श्रींची द्वारकामाई धुनीकरीता रान शेणगोवरी खरेदीकामी उपरोक्त संदर्भान्वये निविदा मागविणेस मंजुरी घेण्यात आलेली होती. त्यास अनुसरुन खालील पुरवठाधारकांकडून निविदा मागविणेत आल्या होत्या.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नाव व पत्ता |
|---|---|
| ०१. | श्री.विजय पितांबर देवरे, मालेगाव कॅम्प, नाशिक |
| ०२. | श्री.बाळासाहेब रे. पाटील, मालेगाव, नाशिक |
| ०३. | श्री.संतोष मोतीराम सुर्यवंशी, मालेगाव, नाशिक |
| ०४. | जनसेवा फाऊंडेशन, लोणी बु।।, ता.राहाता |
| ०५. | श्रीमती कुसुम लक्ष्मण ढवळे, साकरवाडी, ता.कोपरगाव |

उपरोक्त पुरवठाधारकांना निविदा पाठविण्यात आल्या होत्या. निविदा भरुन सिलबंद पाकिटामध्ये जमा करण्याची अंतीम मुदत दि.१६.०३.२००९ अखेर ठेवण्यात आली होती. त्याप्रमाणे खालील निविदाधारकांनी मुदतीमध्ये निविदा सादर केल्या आहेत.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नाव व पत्ता |
|---|---|
| ०१. | श्री.संतोष मोतीराम सुर्यवंशी, मालेगाव, नाशिक |
| ०२. | श्री.विजय पितांबर देवरे, मालेगाव कॅम्प, नाशिक |
| ०३. | श्रीमती कुसुम लक्ष्मण ढवळे, साकरवाडी, ता.कोपरगाव |

उपरोक्तप्रमाणे विहित मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा आजचे आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | पार्टीचे नांव | निविदेतील दर रुपये |
|---|---|---|
| ०१. | श्री.संतोष मोतीराम सुर्यवंशी, मालेगाव, नाशिक | ३.१० प्रती किलो |
| ०२. | श्री.विजय पितांबर देवरे, मालेगाव कॅम्प, नाशिक | २.९० प्रती किलो |
| ०३. | श्रीमती कुसुम लक्ष्मण ढवळे, साकरवाडी, ता.कोपरगाव | २.७० प्रती किलो |

**यावर सविस्तर चर्चा होऊन श्रीमती कुसुम लक्ष्मण ढवळे, साकरवाडी, ता.कोपरगाव यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन त्यांना श्री द्वारकामाई धुनीसाठी गोवरी पुरविणेकामी कार्यादेश देणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

**विषय नं.०९** **प्रसादालय व कॅन्टीनसाठी किराणा माल खरेदीकामी निवडलेल्या नमुन्यांबाबत चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**निर्णय क्र.३२५** सन २००९-१० मध्ये प्रसादालय व कॅन्टीन विभागासाठी आवश्यक किराणा माल वार्षिक दराने खरेदीकामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि. ०३.०१.२००९ निर्णय क्र.७१ नुसार तत्वत: मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दि. ०५-०७.०२.२००९ चे वर्तमानपत्रात जाहिरात देवून दि. ०९.०२.२००९ ते दि. १८.०२.२००९ अखेर निविदा विक्री करणेत आलेली असून दि. २०.०२.२००९ अशी निविदा स्विकारणेची अंतिम मुदत ठेवणेत आलेली होती. मुदतीअंती प्राप्त झालेल्या निविदा मा.व्यवस्थापन समिती सभा दि. ०८.०३.२००९ रोजी मा.विश्वस्तांसमोर उघडणेत आलेल्या आहेत.

निविदेतील अटीनुसार निविदेसोबत पुरवावयाच्या मालाच्या एकुण किंमतीच्या १ टक्का किंवा रु. २५,०००/- यापैकी जी रक्कम जादा असेल ती बयाणा रक्कम भरणेची अट ठेवणेत आलेली होती. त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडणेत आलेल्या निविदांपैकी मे.सुरज सेल्स कार्पोरेशन, नाशिक यांनी बयाणा रक्कम कमी भरलेली असल्याने व नेहरुनगर महिला बचत गट, श्रीरामपूर यांनी बयाणा रक्कम भरलेली नसल्याने त्यांचे दरांचा विचार केलेला नाही. तसेच खालील निविदाधारकांचे नमुने स्विकारार्ह झालेले नाही.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव व गांव |
|---|---|
| ०१ | शुभम इंडस्ट्रीज, इंदौर |
| ०२ | गुप्ता ट्रेडींग कंपनी, नांदेड |
| ०३ | के.रामजी ॲण्ड कंपनी, नांदेड |
| ०४ | एस.के.ऑईल इंडस्ट्रीज, जळगांव |
| ०५ | हिरालाल चुनिलाल भराडीया ॲण्ड कंपनी, नांदेड |

**उर्वरीत स्विकारार्ह नमुनेधारकांच्या संबंधित पुरवठाधारकांना उपसमितीचे सभेपूढे आमंत्रित करुन चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.१०** **तांदुळ खरेदीकामी कोटेशन उघडणे व नमुने निवडणे.**

**निर्णय क्र.३२६** सन २००९-१० या आर्थिक वर्षात प्रसादालयासाठी आवश्यक असणारा ६००० क्विंटल तांदूळ जानेवारी / फेब्रुवारी मध्ये स्वतंत्र वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, कोटेशन मागवून मा.विश्वस्तांचे उपस्थितीत आंध्रप्रदेश किंवा इतर उत्पादक प्रदेशामधून अथवा निविदेमध्ये समाविष्ट करुन तांदुळ खरेदी करणेस मा.व्यवस्थापन समिती सभा दि. ०३.०१.२००९ निर्णय क्र. ७१ (क - २) नुसार तत्वत: मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दि.०८.०३.२००९ चे वर्तमानपत्रात जाहिरात देवून पुरवठाधारकांचे लेटरहेडवर दरपत्रकांची मागणी करणेत आलेली असून त्यासोबत बयाणा रक्कम व नमुन्यांची मागणी करणेत आलेली आहे.

मुदतीअंती प्राप्त निविदांचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव व गांव |
|---|---|
| ०१ | पवन इंडस्ट्रीज, रंगारेड्डी (आंध्रप्रदेश) |
| ०२ | ऐश्वर्या इडस्ट्रीज, हैद्राबाद (आंध्रप्रदेश) |
| ०३ | मयुरी ट्रेडींग कंपनी, नांदेड |
| ०४ | कैलाश ट्रेडींग कंपनी, नांदेड |
| ०५ | संदीप ट्रेडींग कंपनी, नांदेड |
| ०६ | कमलेश ट्रेंडींग कंपनी, नांदेड |
| ०७ | विजय ऑईल इंडस्ट्रीज, अकोला |
| ०८ | हिरालाल चुनिलाल भराडीया, नांदेड |
| ०९ | गुलाबचंद छोगमल श्रीश्रीमाळ, घोटी, नाशिक |
| १० | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिकरोड |
| ११ | सुरेश पुनमचंद बागमार, पुणे |
| १२ | बाफणा बाजार, नाशिक |

**उपरोक्त प्रमाणे प्राप्त निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या,या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन संबधितांना चर्चा/वाटाघाटीसाठी उपसमितीचे सभेत बोलावून अंतिम निर्णय घेण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.११** **संस्थान कर्मचाऱ्यांकरिता शिलाईसह गणवेश कापड खरेदीकामी आलेले कोटेशन उघडणे.**

**निर्णय क्र.३२७** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१५.११.२००८ मधील निर्णय क्र.८७१ नुसार संस्थान कर्मचाऱ्यांना आवश्यक असणारे गणवेष खरेदीकामी मफतलाल, एसकुमार, बेलमेंट, रेमंड, सियाराम या नामांकित कंपन्यांचे कापडाचे युनिफॉर्मसाठी शिलाईसह कोटेशन्स मागविणेस व त्याकामी येणारे रक्कम रु.१९,२२,८४०/- मात्रचे खर्चास तत्वत: मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दि.०१-०२.०३.२००९ चे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि.०२.०३.२००९ ते दि.१२.०३.२००९ अखेर निविदा विक्री करणेत आलेली असून दि.१४.०३.२००९ अखेर निविदा व कापडाचे नमुने मागविणेत स्विकारणेची अंतिम मुदत ठेवणेत आलेली होती. मुदतीअंती प्राप्त निविदांचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव व गांव |
|---|---|
| ०१ | सारा ट्रेडर्स (प्रा.) लिमीटेड, पुणे |
| ०२ | शिवनेरी कलेक्शन, येवला |
| ०३ | श्री गुरुकृपा जनरल सप्लायर्स, मुंबई |
| ०४ | राज सेल्स कार्पोरेशन, नाशिक |
| ०५ | राजेंद्र क्लॉथ स्टोअर्स, राहुरी |
| ०६ | तुलसी एम्पोरीयम, सोनई |
| ०७ | निधी एक्झीम, सोलापूर |
| ०८ | मोता गारमेंटस, बारामती |
| ०९ | रेडस्टार, नवी मुंबई |
| १० | एम.बी. ट्रेडींग कंपनी, नाशिक रोड |
| ११ | के.जी. बांठीया ब्रदर्स, पुणे |
| १२ | श्री साईबाबा कार्पोरेशन, पुणे |

**उपरोक्त प्रमाणे प्राप्त निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या,या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन संबधितांना चर्चा/वाटाघाटीसाठी उपसमितीचे सभेत बोलावून अंतिम निर्णय घेण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.१२.** **श्री साईनाथ रुग्णालयातील ऑपरेशन थिएटर विभागासाठी सी.आर्म मशिन खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडणे बाबत**

**निर्णय क्र.३२८** श्री साईनाथ रुग्णालयाच्या आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागासाठी सन १९९९ मध्ये मे. विप्रो जी. ई. मेडीकल सिस्टीम लि., मुंबई यांचेकडून सी. आर्म मशिन (Stenoscope ६०००) रु.१८,६०,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आलेले होते.

सदरचे मशिन बायबॅक करणे बाबत बायोमेडीकल विभागाने त्यांचे दि.१२/०७/२००८ चे पत्रान्वये सदर मशिनवर आतापर्यंत रक्कम रु.३,५६,७१३/- इतका खर्च झालेला आहे व आताचे दुरुस्तीकामी येणारा खर्च अंदाजे रु.९,१६,५४०/- इतका सांगीतला होता. परंतु याकामी मे. विप्रो जी. ई. मेडीकल सिस्टीम लि., मुंबई यांचेकडून दुरुस्तीकामी प्रत्यक्ष खर्चाचे कोटेशन मागविले असता त्यांचे दि.२६/०९/२००८ चे पत्राअन्वये सदरचे दुरुस्तीकामी रु.२७,९२,४००/- इतका खर्च कळविला होता. प्राप्त परिस्थितीचा विचार करीता आपणास सध्या असलेले मशिन बायबॅक करुन नविन मशिन खरेदी करणे योग्य राहिल. तर नविन मशिन घेण्यासाठी अंदाजे रु.२७,००,०००/- पर्यंत खर्च येणार आहे.

सदरचे खरेदीकामी दि. १५/११/२००८ चे मा. व्यवस्थापन समिती सभेतील मंजुरीन्वये जनसंपर्क कार्यालयामार्फत विहीत पध्दतीने महाराष्ट्र टाईम्स, डी.एन.ए.पुणे या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.०८/१२/२००८ ते २०/१२/२००८ अखेर शिर्डी कार्यालयात ३ तर मुंबई कार्यालयात ७ निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या व दि. २३/१२/२००८ अखेर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत होती. तसेच सदरचे जाहिरातीबाबत १८ पुरवठा धारक / अधिकृत विक्रेत्यांना इकडील पत्र क्र. १७९०२ दि. ०४/१२/२००८ अन्वये अवगत करण्यात आले होते.

परंतु उपरोक्त खरेदीकामी शिर्डी व मुंबई कार्यालयात एकही निविदा विक्री झालेली नाही. त्यामुळे दि. ०८/०२/२००९ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील मंजुरी अन्वये इकडील पत्र क्र. २२०१ दि. २३/०२/२००९ अन्वये २१ उत्पादक कंपन्याकडुन दि. ०५/०३/२००९ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन चार कोटेशन प्राप्त झालेले आहेत, ते खालीलप्रमाणे -

०१.M/s. Excel Corporation, Nashik (प्रशासन शाखेकडून टपालामार्फत उघडून मिळाले)
०२.M/s. Siemens Ltd., Mumbai (बंद कोटेशन)
०३..M/s. Meditronics Healthcare Pvt. Ltd., Mumbai (बंद कोटेशन)
०४.M/s. Summit Healthcare Pvt. Ltd., Mumbai (बंद कोटेशन)

वरीलप्रमाणे प्राप्त कोटेशनपैकी अं. न. १ हे कोटेशन प्रशासन शाखेकडून टपालामार्फत उघडून मिळालेले असून उर्वरित तीन कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात आले,या व्यतिरिक्त श्री साई मेडिकल,नाशिक व पी.डी एंटरप्रायजेस,नाशिक यांचे दोन कोटेशन्स दिनांक ४.४.२००९ रोजी प्राप्त झाले ते देखील आजचे सभेत उघडण्यात आले **या सर्व कोटेशन्सचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१३. Walk in fridge खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन्स/निविदा उघडणेबाबत.**

**निर्णय क्र.३२९** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील औषध भाडांरात मोठया प्रमाणावर लॅब केमिकल्स येत असतात, ते ठेवण्यासाठी सध्या Domestic फ्रिजचा वापर करण्यात येत आहे. परंतु त्यामध्ये किट / औषधे ठेवण्यास जागा कमी पडते. त्यामुळे औषध भांडारासाठी १ नग खरेदीचा अंदाजे रु.६,००,०००/- चा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२४/१०/२००८ चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यानुसार उपरोक्त फ्रिज खरेदीकामीच्या अंदाजे रु. ६,००,०००/- इतक्या खर्चाच्या प्रस्तावास व विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदीस मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार सदरचे खरेदीकामी संस्थानचे जनसंपर्क कार्यालयामार्फत महाराष्ट्र टाईम्स - मुंबई, डीएनए - पुणे या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.१९/०१/२००९ ते दि.३१/०१/२००९ अखेर निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या, तसेच संस्थानचे वेबसाईटवर देखील निविदा टाकण्यात आली होती व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.०३/०२/२००९ अखेर ठेवण्यात आली होती. सदरचे जाहिरातीबाबत १० अधिकृत विक्रेते / कंपन्याना इकडील पत्र क्र. ५६७ दि. १४/०१/२००९ अन्वये निविदा भरणेबाबत कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन दोनच निविदा प्राप्त झालेल्या होत्या त्या खालीलप्रमाणे -

०१. M/s. Thermolab Scientific Equipments Pvt.Ltd., Vasai (W)
०२. M/s. Skylab Instruments & Engineering Pvt.Ltd., Vasai (E)

सदरचे खरेदीकामी जाहिरातीस व पत्रास अनुसरुन फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्यामुळे दि. १४/०२/२००९ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये उर्वरीत आठ विक्रेत्यांना इकडील पत्र क्र. २४७९ दि. ०२/०३/२००९ अन्वये फेर पत्र पाठवून दि. १४/०३/२००९ अखेर कोटेशन देणेबाबत विनंती करण्यात आली होती. त्यास अनुसरुन एक कोटेशन प्राप्त झालेले आहे, ते खालीलप्रमाणे -

०१. M/s. Megastar Engineering, Pune (बंद कोटेशन)

तरी वरीलप्रमाणे प्राप्त दोन सिलबंद निविदा व एक कोटेशन आजचे सभेत उघडण्यात आले, **या कोटेशन्सचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१४. श्रीसाईबाबा व श्रीसाईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना गणवेश खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडणेबाबत**

**निर्णय क्र.३३०** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचा-यांना गणवेष खरेदी करणेकामी मा.व्यवस्थापन सभा दिनांक ०८/०२/२००९ निर्णय क्र.१०५ विषय क्र.३३ अन्वये एकुण रु.३,७२,०००/- चे खर्चास व विहीत

पध्दतीने कोटेशन मागवण्यास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार इकडील पत्र क्र. २३१३ दि. २५/०२/२००९ अन्वये एकुण ०७ पुरवठा धारकांकडुन दि. १४/०३/२००९ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यापैकी तीन पुरवठा धारकाकडून कोटेशन प्राप्त झालेले आहेत. ते खालीलप्रमाणे-

०१. मे. मोता गारमेंन्ट्स, बारामती
०२. मे.सारडा इंटेरिअर,अहमदनगर
०३. मे.बांठीया एन्टरप्रायजेस,पुणे

तरी वरीलप्रमाणे प्राप्त ३ बंद कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात आले, **या कोटेशन्सचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१५** **श्री साईनाथ हॉस्पिटलमधून Nasal Endoscope गहाळ झालेबाबत**

**निर्णय क्र.३३१** श्री साईनाथ रुग्णालयातील रुपये ४५,०००/- किंमतीचे Fiegert Endotec Germeny या कंपनीचे Nasal Endoscope दि.१३-१२-२००८ रोजीचे दरम्यान गहाळ झाले आहे. याप्रकरणी जा.नं.एसएसएस/वशी-प्र.अ./३५४८/ २००८ दि.२७-११-२००८ अन्वये डॉ.एन.एस.म्हस्के, उप वैद्यकिय संचालक, श्री साईबाबा हॉस्पीटल, शिरडी यांना चौकशी करुन, चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्या आदेशानुसार डॉ.एन.एस.म्हस्के यांनी सदर प्रकरणी चौकशी करुन, दि.०३-१२-२००८ रोजीचा निष्कर्ष अहवाल इकडील कार्यालयात सादर केला आहे. सदरचे अहवालात त्यांनी खालील प्रमाणे निष्कर्ष काढलेले आहे.

**१)** वस्तु गहाळ होण्यामागे श्री साईनाथ रुग्णालयातील शस्त्रक्रिया विभागातील कार्यपध्दतीमध्ये कोणत्याही प्रकारची कार्यप्रणाली (System) अस्तित्वात नाही.कोणतीही वस्तु कोणीही उचलुन नेणे हे सहज शक्य आहे.

**२)** मौल्यवान वस्तुंच्या जबाबदाऱ्यांची सुनिश्चीती झालेली नाही.

**३)** तेथील कामकाज रुग्णालयाऐवजी एखादया एकत्र कुटूंब पध्दतीप्रमाणे असल्यासारखे दिसते.

**४)** रुग्णालयांच्या परंपरेप्रमाणे ही वस्तु गहाळ होण्याची जबाबदारी स्टाफनर्स श्रीमती मुजावर, सिस्टर इन्चार्ज श्रीमती निलीमा मसींह व प्र.मेट्रन श्रीमती मानिनी कुलकर्णी यांची आहे. कारण यांनी Instrument/ Equipment देणे घेणेची कार्यप्रणाली बसविलेली नाही.

घटनेचे गांभीर्य विचारात घेऊन, तसेच निष्कर्ष अहवालातील जबाबदार धरलेले कर्मचारी श्रीमती मानिनी नंदकुमार कुलकर्णी, प्र.सहाय्यक अधिसेविका, श्रीमती निलीमा मोहम्मद अनिस मसिहा, सिस्टर इन्चार्ज व खान (मुजावर) रुक्साना साजिद, परिचारीका यांना दि.१५-१२-२००८ रोजीची कारणे दाखवा नोटीस काढून त्यांचे लेखी खुलासे मागविणेत आले आहेत. त्यांनी अनुक्रमे दि.१७-१२-२००८, दि.१७-१२-२००८ व दि.२०-१२-२००८ रोजीचे लेखी खुलासे सादर केले आहे.

सदर प्रकरणी उप वैद्यकिय संचालक डॉ.एन.एस.म्हस्के यांनी केलेल्या चौकशीत वैद्यकिय अधिक्षीका डॉ.पेंडसे एस.एम.यांनी दि.२८-११-२००८ रोजीचे निवेदनात असे म्हटले आहे की, ओ.टी.मध्ये काम करणाऱ्या सर्व डॉक्टर्स, नर्सेस, ओ.टी.असिस्टंट्स व इतर कर्मचारी या सर्वावरती या स्कोपची नुकसान भरपाईची जबाबदारी टाकण्यात यावी. तसेच संबंधीत २६ कर्मचाऱ्यांनी दि.२९-११-२००८ रोजीचे निवेदनात असे म्हटले आहे की, सर्वच स्टाफ हा प्रत्येक गोष्टीला जबाबदार असतो. प्र.सहाय्यक अधिसेविका यांनी दि.१७-१२-२००८ रोजीचे खुलाशात असे म्हटले आहे की, घटनेची जबाबदारी सर्वावरच आहे. ऑपरेशन थियटर इन्चार्ज श्रीमती निलीमा मसिंह व परिचारीका रूक्साना सजिद खान यांच्या लेखी खुलाशावरून असे दिसून येते की, सदर प्रकरणी संबंधीत सर्वच कर्मचारी जबाबदार दिसून येतात.

**१)** तरी सदर प्रकरणी सामुहीक जबाबदारी निश्चीत करून, संबंधीत २६ कर्मचारी तसेच प्र.सहाय्यक अधिसेविका अशा २७ कर्मचाऱ्यांकडून Nasal Endoscope ची किंमत रूपये ४५,०००/- समप्रमाणात वसूल करावी.

<u>**किंवा**</u>

**२)** चौकशी अधिकारी डॉ.एन.एस.म्हस्के यांचे चौकशी अहवालानुसार परिचारीका श्रीमती रूक्साना साजिद खान (मुजावर), सिस्टर इन्चार्ज श्रीमती निलीमा मसिंह व प्र.सहाय्यक अधिसेविका श्रीमती मानिनी नंदकुमार कुलकर्णी यांचेवर जबाबदारी निश्चीत करून, त्यांचेकडून समप्रमाणात Nasal Endoscope ची नुकसान भरपाई वसुली करावी याबाबत निर्णय होणे आवश्यक असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू मशिनरी/उपकरणांचे रजिस्टर ठेवण्याची जबाबदारी श्री साईनाथ रुग्णालयाचे मुख्य म्हणून डॉ.आशा श्रीराम पेंडसे यांची आहे. याबाबत डॉ.पेंडसे यांचा खुलासा मागविण्यात यावा. तद्नंतर जबाबदारी निश्चित करुन संबधितांकडून रक्कम वसूल करण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/कामगार अधिकारी )

**विषय नं.१६** **श्री.शांताराम मालोजी नांदगावकर,रा.मुंबई यांचे वैद्यकीय आर्थिक अनुदान मागणी अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.३३२** श्री.शांताराम मालोजी नांदगावकर, रा.मुंबई यांनी त्यांचे वैद्यकिय उपचाराकरीता संस्थानकडे आर्थिक मदत मिळणेबाबत अर्ज केलेला असून सदरचा अर्ज दि.१६.०२.२००९ रोजी इकडील कार्यालयास मिळालेला आहे. अर्जासोबत आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पुर्तता केलेली नाही. श्री.नांदगावकर हे अल्झाईमर, मधुमेह, अर्धांगवायू या विकाराने आजारी असून ते बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई या रुग्णालयात उपचार घेत आहेत. या उपचारासाठी रु.२,५०,०००/- खर्च अपेक्षित असल्याचे प्रमाणपत्र संबंधित रुग्णालयाने दिलेले आहे.संस्थानचे वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार श्री.नांदगावकर यांचे आजाराकरीता अनुदान देता येत नाही.

मा.अध्यक्ष महोदय यांनी दि.१६.०२.२००९ रोजी दुरध्वनीद्वारे श्री.नांदगावकर यांना एक विशेष बाब म्हणून अनुदान मंजूर करणेकामी सदरचा अर्ज मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवणेबाबत कळविलेले आहे.

महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.०५.०५.२००६ चे पत्रान्वये संस्थानचे वैद्यकिय आर्थिक अनुदान योजणेस मान्यता दिलेली असून त्यामध्ये वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावलीची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, असे आदेश दिलेले आहेत.

तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५.११.२००५ रोजी झालेल्या सभेतील विषय नं.१६, निर्णय क्र.६६५ अन्वये फक्त संस्थान वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावलीत बसणारे अर्ज परस्पर मा.कार्यकारी अधिकारी यांनी मान्य करावेत. नियमावलीत न बसणारे अर्ज मा.व्यवस्थापन समिती समोर निर्णयार्थ सादर करणेत येऊ नयेत असे ठरलेले असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, **श्री.नांदगावकर हे अल्झाईमर, मधुमेह, अर्धांगवायू या विकाराने आजारी असून सदर आजारावर संस्थानमार्फत आर्थिक अनुदान देता येत नाही. परंतु एक विशेषबाब म्हणून संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार श्री नांदगांवकर यांना अनुदान देण्यात यावे,असें ठरलें.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वै.अधिक्षीका)

**विषय नं.१७ श्री साईनाथ रुग्णालयाचे ऑप्थॅल्मिक ओ.पी.डी करीता Retinoscope व Indirect Ophthalmoscope खरेदी बाबत**

**निर्णय क्र.३३३** श्री साईनाथ रुग्णालयाचे ऑप्थलमोलॉजिस्ट डॉ. सुनिल सोनटक्के यांनी ओ.पी.डी. साठी प्रत्येकी एक नग Retino Scope व Indirect Ophthalmoscope ची मागणी केलेली आहे.

सदरचे इन्स्ट्रुमेंट हे साईनाथ रुग्णालयातील डोळयांच्या रुग्णांची अदयावत पध्दतीने तपासणी करणेसाठी आवश्यक आहे. तसेच सदर इन्स्ट्रुमेंटद्वारे डोळ्याची तपासणी लवकरात लवकर करणे शक्य होणार आहे.

सदरचे १ नग Retino Scope खरेदीकामी अंदाजे रु.१५,०००/- व १ नग Indirect Ophthalmoscope खरेदीकामी अंदाजे रु.८०,०००/- म्हणजेच दोन्ही मिळून अंदाजे रु.९५,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तेंव्हा वरीलप्रमाणे प्रत्येकी १ नग Retino Scope व Indirect Ophthalmoscope विहीत पध्दतीने **कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९५,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१८ श्री साईनाथ रुग्णालयाचे डेंटल विभागासाठी डेंटल मटेरिअल खरेदी बाबत**

**निर्णय क्र.३३४** श्री साईनाथ रुग्णालयातील Dental विभागाने डि.पी.क्र. १११४ दि. २०/०१/२००९ तातडीने Dental Material ची मागणी केलेली होती. सदर मटेरीयलची तातडीने आवश्यकता होती, त्यामुळे तीन अधिकृत विक्रेत्यांकडुन फॅक्सव्दारे कोटेशन मागविण्यात आले होते, ते खालीलप्रमाणे -

०१. M/s. Vasant Distributors, Nashik
०२. M/s. AK Instruments, Mumbai
०३. M/s. Aurang Detal, Aurangabad

उपरोक्तप्रमाणे प्राप्त कोटेशनचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो श्री साईनाथ रुग्णालयाचे दंत विभागातील डॉ. विखे यांना दाखविण्यात आलेला असून त्यांनी दर्शविल्याप्रमाणे मटेरीयल घेण्याची शिफारस केलेली असून, त्यांचे **शिफारशीनुसार सदरचे खरेदीकामी रु. ४९,०८४.६२ इतका खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१९ संस्थान कर्मचारी जादा वैद्यकीय बीलाचा परतावा मिळणे बाबत**

**निर्णय क्र.३३५** संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असलेल्या त्यांचे अवलंबीतांना कर्मचारी वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये जादा वैद्यकीय बीलाचा परतावा देण्यात येतो. त्याप्रमाणे ज्या कर्मचाऱ्यांची बीले एका वर्षात रुपये ५०००/- चे आत असतील त्यांचा परतावा मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर होतो व ज्या बीलांची रक्कम रुपये ५०००/- पेक्षा अधिक आहे त्यांचे बीलास

मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागते. यापूर्वी व्यवस्थापन समितीचे दिनांक ११.०९.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१९ अन्वये येथून पुढे अशा प्रकारची कर्मचाऱ्यांची वैद्यकीय बीले वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी तपासून त्यांचे शिफारशीनुसार बीले अंतीम मंजूरीसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावीत, असें ठरलें आहे.

**त्यानुसार खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची बीले सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व सदस्य मा. डॉ.पी.एल. तिवारी यांना दाखवून घेतली आहेत. त्यानुसार खालील देयके आदा करण्याची शिफारस केली आहे, ज्यास मान्यता देण्यात आली.**

| अ.नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | रुग्णालयाचे नाव | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | कु.कमल भिमराज तांबे | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | १३११०.०० | १३११०.०० |
| २ | श्री.प्रशांत महादु देवरे | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | २२५६.०० | २२५६.०० |
| ३ | श्री.पी.टी.जोशी | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | १००४.०० | १००४.०० |
| ४ | श्री. रंगनाथ कारभारी पाचोरे | श्री साईनाथ रुग्णालय,शिर्डी | २५६३.०० | २५६३.०० |
| ५ | श्री.किशोर साहेबराव गवळी | श्री साईनाथ रुग्णालय,शिर्डी | ४२१.०० | ४२१.०० |
| ६ | डॉ.एन.एस.म्हस्के | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | २७६७.०० | २७६७.०० |
| ७ | श्री.भारत बाबासाहेब कोते | श्री साईनाथ रुग्णालय,शिर्डी | ८४८.०० | ८४८.०० |
| ८ | श्री.अनिल नामदेव वाणी | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | ९७०९.०० | ९७०९.०० |
| ९ | श्री. श्रावण माधव चौधरी | श्री साईनाथ रुग्णालय,शिर्डी | ९५९.०० | ९५९.०० |
| १० | श्री.अशोक चांगदेव कुऱ्हे | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | ७८२.०० | ५०९.०० |
| ११ | श्री.प्रभाकर भास्कर जगताप | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | १४०२१.०० | १३१६५.०० |
| १२ | श्री.नितीन सोपानराव शिंदे | श्री साईनाथ रुग्णालय,शिर्डी | २२९१.०० | २२९१.०० |
| १३ | श्री.गुलामरसुल गुलामहबीब पठाण | श्री साईनाथ रुग्णालय,शिर्डी | १२२३.०० | १२२३.०० |
| १४ | श्री.रंगनाथ निवृत्ती पवार | के.ई.एम.हॉस्पिटल,पुणे | १९१७७.०० | १५९६७.०० |
| १५ | सौ.जिजाबाई रमेश भोसले | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | २२७६.०० | २२७६.०० |
| १६ | श्री.दिपक सुर्यकांत लोखंडे | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | १३५४.०० | १३४९.०० |
| १७ | श्री.प्रशांत भानुदास गोंदकर | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | १०३७.०० | १०३७.०० |
| १८ | सौ.गिता आप्पासाहेब शिंदे | श्री साईनाथ रुग्णालय,शिर्डी | ३०७५.०० | २६९१.०० |
| १९ | श्री.राजेंद्र साहेबराव डांगे | के.ई.एम.हॉस्पिटल,मुंबई | ४१५००.०० | ००.०० |
| | | ॲडव्हॉन्स वजा रक्कम रु. | ४१५००.०० | |
| | | ॲड. वजा जाता शिल्लक येणे रक्कम रु. | ००.०० | |
| २० | श्री.अशोक रघुनाथ कांबळे | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | १३४१८.०० | १२७९९.०० |
| २१ | श्री.प्रदिप विश्वनाथ त्रिभुवन | श्री साईनाथ रुग्णालय,शिर्डी | १८००.०० | १८००.०० |
| २२ | श्री.किरणसिंग महेंद्रसिंग सावंत्रे | प्रवरा हॉस्पिटल,लोणी | ३४७८५.०० | १३७८०.०० |
| २३ | श्री.अजिज बुढणभाई शेख | के.ई.एम.हॉस्पिटल,पुणे | ३२२९५.०० | ३००१५.०० |
| २४ | श्री.अनिल बाळकृष्ण भणगे | श्री साईनाथ रुग्णालय,शिर्डी | १४००.०० | १४००.०० |
| २५ | डॉ.व्ही.आर.राठी | श्री साईनाथ रुग्णालय,शिर्डी | १६१३.०० | १६१३.०० |
| २६ | श्री.चंद्रकांत धोंडीराम लुटे | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | १४६८.०० | १४६८.०० |
| २७ | सौ.हिराबाई तुळाजी मोकळ | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | १०२१.०० | ९६९.०० |
| २८ | श्री.मोहन नारायण देशपांडे | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | १२३७.०० | १२३७.०० |
| २९ | डॉ.सौ.प्रणोत रुपेश जडगे | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | ६३९.०० | ६३९.०० |
| ३० | श्री.लक्ष्मण सदाशिव चव्हाण | टाटा मेमोरियल हॉस्पिटल,मुंबई | १७७०००.०० | -१४०९.०० |
| | | ॲडव्हॉन्स वजा रक्कम रु. | १७५५९१.०० | |
| | | ॲड. वजा जाता शिल्लक येणे रक्कम रु. | १४०९.०० | |
| ३१ | श्री.मधुकर भिवाजी डोखे | बॉम्बे हॉस्पिटल,मुंबई | २१७६२.०० | २१७६२.०० |
| ३२ | श्री.दिनकर हनुमंत डोखे | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | ३४३५.०० | ३४३५.० |
| ३३ | श्री.लक्ष्मण श्रीपत गव्हाणे | श्री साईनाथ रुग्णालय,शिर्डी | ५३८.०० | ५३८.०० |
| ३४ | सौ.हसीना शेरखान पठाण | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | १६५१३.०० | १६५१३.०० |
| | | एकुण रक्कम रु.- | ४२९२९७.०० | १८२११३.०० |

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२०** **B.M.V Balloon Accessories सह On Consignment Basis वर खरेदी बाबत**

**निर्णय क्र.३३६** श्री साईबाबा रुग्णालयातील ॲन्जीओप्लास्टीच्या शस्त्रक्रिया करण्यासाठी B.M.V. Balloon ची आवश्यकता असते. सदर B.M.V. Balloon हे दोन प्रकारामध्ये येत असतात. एक with Accessories तर दुसरे without Accessories कॅथलॅब विभागाने सन २००८-०९ या वर्षामध्ये उपरोक्त B.M.V. Balloon ची without Accessories ची मागणी केली होती. परंतू त्यांना दैनंदिन शस्त्रक्रियासाठी खालील B.M.V. Balloon Accessories सह आवश्यक असतात.

सन २००७ - ०८ या वर्षामध्ये Toray कंपनीचे Balloon with Accessories सह त्यांची मागणी होती व त्यानुसार मे. कार्डीओ प्रॉडक्ट, मुंबई यांचेकडून रु.७४,०००/- खरेदी करण्यात येत होते.

मे.कार्डीओ प्रॉडक्ट, मुंबई हे आता सदर दराने पुरवठा करणेस तयार नाहीत. कारण सदरची ऑर्डर ही सन २००७-०८ मधील आहे. त्यानंतर Balloon with Accessories साठी त्यांचे सुधारित दर रु. ८५,२८०/- असे झाले आहे, असे त्यांनी त्यांचे दि.०५/०२/२००९ चे फॅक्स पत्राव्दारे कळवले आहे. म्हणजे एका बलुनसाठी त्यांचे दर रु. ११,२८०/- ने वाढलेले आहेत. मे. कार्डीओ प्रॉडक्ट, मुंबई यांनी सन २००८-०९ या वर्षामध्ये B.M.V. Balloon with Accessories चे दर दिलेले नव्हते, कारण कॅथलॅब विभागाकडून तशी मागणी नसल्यामुळे टेंडरमध्ये मागणी करण्यात आली नव्हती.

डॉ. बजाज - कार्डीओलॉजीस्ट यांनी अॅन्जीओप्लास्टीच्या शस्त्रक्रिया करण्यासाठी Toray कंपनीचे B.M.V. Balloon लागतात असे कळविले आहे. त्यामुळे मे. कार्डीओ प्रॉडक्ट, मुंबई यांचेकडून सदरचे B.M.V. Balloon with Accessories सुधारीत दर रु. ८५,२८०/- या दराने On Consignment Basis खरेदी करता येईल. **सन २००९-१० या वर्षामध्ये B.M.V. Balloon with Accessories ची मागणी करण्यात आलेली आहे, ती उपलब्ध होईपर्यंत (अंदाजे २-३ महिने) सदरचे बलुन अॅक्सेसरीजसह On Consignment Basis ठेवण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२१** **श्रीसाईनाथ रुग्णालयात नविन तयार करण्यात येत असलेले ऑपरेशन थिएटरमध्ये ऑक्सिजन सिस्टम बसविणेबाबत**

**निर्णय क्र.३३७** श्री साईनाथ रुग्णालयात सध्या होत असलेल्या जागेच्या अडचणीमुळे व रुग्णांचे गैरसोयीमुळे धर्मशाळा इमारत नं. २ व्यतिरीक्त अजुन एक धर्मशाळा इमारत नं. १ वापरण्यास देण्यात आलेली आहे.

त्यानुसार दोन्हीही इमारतीत सध्या असलेल्या विविध वॉर्ड, ऑपरेशन थिएटर इत्यादीचे नियोजन करण्यात आलेले असून नविन नियोजनानुसार धर्मशाळा इमारत नं. १ मध्ये तळमजल्यावर असलेले ४ खाटांचे आय.सी.सी.यु. हे दुसऱ्या मजल्यावर घेण्यात येऊन तेथे ४ ऐवजी १० खाटांचे नियोजन आहे.

तसेच आय.सी.सी.यु. व्यतिरीक्त गंभीर रुग्णांसाठी फिमेल मेडीकल / मेल सर्जिकल वॉर्डमध्ये सध्या ऑक्सीजन व व्हॅक्युमचे पॉईंट नाही, त्यामुळे अशा प्रकारच्या गंभीर रुग्णांना उपचार करणेस अडचणी निर्माण होतात. त्यामुळे सदर वॉर्डमध्ये देखील काही ऑक्सीजन व व्हॅक्युम पॉईंट घेण्याचे नियोजन आहे. सदरचे पॉईंट हे सध्या कार्यान्वित असलेल्या ऑक्सीजन सिस्टीमवर वाढवून कार्यान्वित करता येईल.

तसेच नुकतीच ताब्यात मिळालेली इमारत नं. १ मध्ये दोन ऑपरेशन थिएटर स्थलांतरीत करावयाचे आहे. (इ.एन.टी. व ऑप्थलॅमिक) सदर दोन ऑपरेशन थिएटरसाठी नविन ऑक्सीजन व्हॅक्युम सिस्टीम बसवावी लागणार आहे. तसेच सदर इमारतीत असलेल्या मेल मेडीकल वॉर्ड, रिकव्हरी वॉर्ड, शस्त्रक्रिया गृह, पेडीयाट्रीक वॉर्ड इत्यादी ठिकाणी ऑक्सीजन, एअर, व्हॅक्युम, नायट्रस पॉईंट घ्यावे लागणार आहे.

दोन्ही इमारतीत एकुण ९६ पॉईंट घ्यावे लागतील त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

**अ) इमारत नं. १ - (नविन ऑक्सीजन, एअर, व्हॅक्युम कंट्रोल पॅनल सिस्टीम)**

| अ.नं. | वॉर्डचे नाव | ऑक्सीजन | व्हॅक्युम | एअर | नायट्रस | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Male Medical Ward | ४ | ४ | | | ८ |
| २ | Physiotherapy | १ | १ | | | २ |
| ३ | Opthal O.T. | २ | २ | २ | २ | ८ |
| ४ | ENT O.T. | २ | २ | २ | २ | ८ |
| ५ | O.T. Recovery | ४ | ४ | | | ८ |
| ६ | Paediatric Ward | ४ | ४ | | | ८ |
| | | | | | एकुण - | ४२ |

**ब) इमारत नं. २ -**

| अ.नं. | वॉर्डचे नाव | ऑक्सीजन | व्हॅक्युम | एअर | नायट्रस | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | I.C.C.U. | १० | १० | १० | | ३० |
| २ | Male Surgical Ward | ४ | ४ | | | ८ |
| ३ | Female Surgical Ward | ४ | ४ | | | ८ |
| ४ | Female Medical Ward | ४ | ४ | | | ८ |
| | | | | | एकुण - | ५४ |

उपरोक्तप्रमाणे "अ" व "ब" मिळून एकुण ९६ पॉईंट बसवावे लागणार आहे.

उपरोक्त प्रमाणे ९६ पॉईंटसाठी इमारत नं. २ मध्ये असलेल्या सध्याचे ऑक्सीजन कंट्रोल पॅनलची वाढीव पाईप लाईन वाढवून ५४ पॉईंट कार्यान्वित करता येईल. तर इमारत नं. १ मधील नविन ऑक्सीजन सिस्टीम, व्हॅक्युम, एअर कॉम्प्रेसर कंट्रोल पॅनल नविन बसवावी लागणार आहे. सध्याचे ऑक्सीजन कंट्रोल पॅनल सिस्टीमवर वाढीव (५४) पॉईंट व पाईपलाईन तसेच नविन कंट्रोल पॅनल, पाईपलाईन व ४२ पॉईंट इत्यादीसाठी एकुण रु. १० लाख पर्यंत खर्च येणार आहे.

**याशिवाय नविन ऑक्सीजन कंट्रोल पॅनल सिस्टीमसाठी पत्र्याचे शेड, भिंतीचे बांधकाम फाऊंडेशन इत्यादी काम संस्थानचे बांधकाम विभागामार्फत करावे लागणार आहे. त्यासाठी सदरचे कामाबाबत बांधकाम विभागामार्फत पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२२** **सन २००८-०९ या वार्षिक निविदेतील मंजूर दराने Inj. cardaron खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.३३८** श्री साईबाबा रुग्णालयाचे कार्डीयाक शस्त्रक्रिया विभागात लागणाऱ्या Inj. Cardarone 150mg / 1ml करीता सन २००८-२००९ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने मे. चेतना एंटरप्रायजेस, अहमदनगर यांना इकडील पत्र क्र. १०९२९८ दि. २६/०७/२००८ अन्वये Samarth कंपनीचे इंजेक्शनकरीता प्रती व्हायल रु. २१.१९८९ याप्रमाणे ५० व्हायलचा पुरवठा आदेश देण्यात आला होता.

मे. चेतना एंटरप्रायजेस, अहमदनगर यांनी पुरवठा आदेशाप्रमाणे इंजेक्शनचा पुरवठा पुर्ण केलेला असून सध्या औषध भांडारात सदर इंजेक्शनचा साठा शिल्लक नसून जीवनदायी योजनेअंतर्गत रुग्णांची संख्या वाढल्यामुळे कार्डीयाक विभागात त्याची आवश्यकता आहे.

सदर इंजेक्शनची सन २००९-१० या वार्षिक औषधे खरेदीमध्ये मागणी करण्यात आलेली असून सदरचे मटेरीयल उपलब्ध होण्यास अजुन ३-४ महिन्यांचा कालावधी लागेल त्यामुळे तुर्तास पुढील तीन-चार महिने पुरु शकेल इतका साठा खरेदी करावा लागणार आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Make | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Inj. Cardarone 150mg / 1ml | Samarth | 200 | 21.1989 | 4239.78 |
| | | | | Total Amt. in Rs.- | 4239.78 |

वरीलप्रमाणे मे. चेतना एंटरप्रायजेस, अहमदनगर यांचे वार्षिक मंजुर दरानुसार सदरचे खरेदीकामी रु. ४२३९.७८ इतका खर्च येणार आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१५/०४/२००८ निर्णय क्रमांक ३५४ Clause No.८ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मा. व्यवस्थापन समितीचे मंजूर दराने खरेदी करण्यात यावी, असे ठरले आहे. तसेच मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १८/१०/२००८ निर्णय क्र. ७५९(२८-८) अन्वये वैद्यकिय संचालक यांनी त्यांचे अधिकारात स्थानिक मेडीकल स्टोअर्समधून तातडीची खरेदी करण्यात यावी, तसेच औषधे कमी पडल्यास वार्षिक मंजुर दराने वेळोवेळी औषधे खरेदी करण्यात यावीत, असे ठरले आहे.

तरी **मे. चेतना एंटरप्रायजेस, अहमदनगर यांचेकडून वरीलप्रमाणे Inj. Cardarone 150mg / 1ml वार्षिक मंजुर दराने खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.४२३९.७८ चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**.विषय नं.२३** **सन २००८-०९ या वार्षिक निविदेतील मंजूर दराने Inj. Pause खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.३३९** श्री साईबाबा रुग्णालयाचे कॅथलॅब / कार्डीयाक शस्त्रक्रिया विभागात लागणाऱ्या Inj. Pause करीता सन २००८-२००९ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने मे. संजिवनी एजन्सी, अहमदनगर यांना Emcure कंपनीचे Inj. Pause 500mg / 5ml करीता प्रती व्हायल रु. ७/- याप्रमाणे १००० व्हायलचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. परंतु उपरोक्त इंजेक्शनचे दर तुलनात्मक तक्ता तयार करताना चुकीचे टाईप झाल्यामुळे दि. १३/०८/२००८ चे मंजुर टिपणीन्वये मे. संजिवनी एजन्सी, अहमदनगर यांचा पुरवठा आदेश रद्द करुन तो मे. कारवा एजन्सी, संगमनेर यांना इकडील पत्र क्र. १३६८८ दि. १७/०९/२००८ अन्वये प्रती व्हायल रु. ३४.६० याप्रमाणे १००० व्हायलचा पुरवठा आदेश देण्यात आला होता.

मे. कारवा एजन्सी, संगमनेर यांनी पुरवठा आदेशाप्रमाणे इंजेक्शनचा पुरवठा पुर्ण केलेला असून सध्या औषध भांडारात सदर इंजेक्शनचा साठा शिल्लक नसून जीवनदायी योजनेअंतर्गत रुग्णांची संख्या वाढल्यामुळे कार्डीयाक विभागात त्याची आवश्यकता आहे.

सदर इंजेक्शनची सन २००९-१० या वार्षिक औषधे खरेदीमध्ये मागणी करण्यात आलेली असून सदरचे मटेरीयल उपलब्ध होण्यास अजुन ३-४ महिन्यांचा कालावधी लागेल त्यामुळे तुर्तास पुढील तीन-चार महिने पुरु शकेल इतका साठा खरेदी करावा लागणार आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| **Sr. No.** | **Description** | **Make** | **Qty.** | **Rate Per in Rs.** | **Total Amt. in Rs.** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Inj. Pause 500mg / 5ml | Emcure | 1000 | 34.60 | 34600.00 |
| | | | | **Total Amt. in Rs.-** | **34600.00** |

वरीलप्रमाणे मे. कारवा एजन्सी, संगमनेर यांचे वार्षिक मंजुर दरानुसार सदरचे खरेदीकामी रु. ३४,६००/- इतका खर्च येणार आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१५/०४/२००८ निर्णय क्रमांक ३५४ Clause No.८ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मा. व्यवस्थापन समितीचे मंजूर दराने

खरेदी करण्यात यावी, असे ठरले आहे. तसेच मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १८/१०/२००८ निर्णय क्र. ७५९(२८-८) अन्वये वैद्यकिय संचालक यांनी त्यांचे अधिकारात स्थानिक मेडीकल स्टोअर्समधून तातडीची खरेदी करण्यात यावी, तसेच औषधे कमी पडल्यास वार्षिक मंजुर दराने वेळोवेळी औषधे खरेदी करण्यात यावीत, असे ठरले आहे.

तरी **मे. कारवा एजन्सी, संगमनेर यांचेकडून वरीलप्रमाणे Inj. Pause 500mg / 5ml वार्षिक मंजुर दराने खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.३४,६००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२४ कार्डीयाक विभागासाठी Premilene ४/० सुचर्स खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.३४०** श्री साईबाबा रुग्णालयाचे कार्डीयाक विभागात कार्डीयाक सर्जरीसाठी लागणाऱ्या उपरोक्त सुचर्स करीता सन २००८-२००९ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने मे. सर्जिलिंक, श्रीरामपुर यांना इकडील पत्र क्र. ११०१९ दि. २६/०७/२००८ अन्वये B. Braun कंपनीच्या ३ बॉक्सचा प्रती बॉक्स (३६ Foil) रु.३२७८/- याप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

त्यानुसार मे. सर्जिलिंक, श्रीरामपुर यांनी पुरवठा आदेशाप्रमाणे उपरोक्त सुचर्सचा पुरवठा पुर्ण केलेला असून सध्या आपणाकडे औषध भांडारात सदरचे सुचर्स शिल्लक नाही. सदर सुचर्सची दैनंदिन वापरासाठी आवश्यकता असून सुचर्सचा दरमहा खप पाहता तो १ बॉक्स इतका आहे. उपरोक्त सुचर्सची सन २००९-१० च्या वार्षीक खरेदीमध्ये मागणी करण्यात आलेली असून ते उपलब्ध होण्यास अजून दोन महिने लागणार आहे. त्यामुळे पुन्हा दोन महिने पुरु शकेल इतका साठा खरेदी करावा लागणार आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Make | Co.Code | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Premilene Blue Monofilament 70cm 4/0 1/2 Circle RB 16MM | B. BRAUN | C0090013 - 1 PACK 36 FOILS | 2 | 3278.00 | 6556.00 |
| | | | | | Total Amt. in Rs.- | 6556.00 |

वरीलप्रमाणे मे. सर्जिलिंक, श्रीरामपुर यांचे वार्षिक मंजुर दरानुसार सदरचे खरेदीकामी रु. ६५५६/- इतका खर्च येणार आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१५/०४/२००८ निर्णय क्रमांक ३५४ Clause No.८ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मा. व्यवस्थापन समितीचे मंजूर दराने खरेदी करण्यात यावी, असे ठरले आहे. तसेच मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १८/१०/२००८ निर्णय क्र. ७५९(२८-८) अन्वये वैद्यकिय संचालक यांनी त्यांचे अधिकारात स्थानिक मेडीकल स्टोअर्समधून तातडीची खरेदी करण्यात यावी, तसेच औषधे कमी पडल्यास वार्षिक मंजुर दराने वेळोवेळी औषधे खरेदी करण्यात यावीत, असे ठरले आहे.

तरी **मे. सर्जिलिंक, श्रीरामपुर यांचेकडून वरीलप्रमाणे सुचर्स वार्षिक मंजुर दराने खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.६५५६/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२५ जून्या प्रसादालय परिसरात साईभक्तांसाठी दर्शन रांग व इतर अनुषंगिक सुविधा निर्माण करणेबाबत.**

**निर्णय क्र.३४१ (अ)** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८ फेब्रुवारी, २००९ रोजीचे सभेत साईभक्तांच्या वाढत्या गर्दीचे नियोजन करणेकामी जुने प्रसादालय परिसर विकसित करणेबाबत निर्णय क्र.७७ खालीलप्रमाणे झालेला आहे :

.. .. यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर व मंदिर परिसरतील गर्दीचे नियोजन करणेचे दृष्टीने प्रसादालय परिसरासह मंदिर परिसरात योग्य ते बदल करणेस तत्वत: मान्यता देणेत आली. याकामी मंदिर व मंदिर परिसराचे पूर्वीचे आर्किटेक्ट मे.माथुर ॲण्ड काप्रे असोसिएटस्, नवी दिल्ली यांचेसह आणखी दोन-तीन नामांकित आर्किटेक्ट यांचेकडून संकल्पना चित्रे, कच्चे बांधकाम आराखडे व अंदाजित बांधकाम खर्च याबाबत प्रस्ताव (Concept Proposals) घेणेत यावेत. याकामी आर्किटेक्ट यांना योग्य तो मोबदला देणे, जुन्या नकाशांच्या प्रती उपलब्ध करुन देणे आणि कामांसाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत आली.

याकामी मे. माथूर ॲण्ड काप्रे असोसिएटस्, नवि दिल्ली यांनी तयार केलेल्या आराखडयाचे सादरीकरण मा. व्यवस्थापन समितीचे सदरहू सभेत करणेत आलेले आहे.

सदरहू निर्णयाचे अनुषंगाने मा. अध्यक्षसो. यांनी, जुना प्रसादालय परिसर साईभक्तांना भविष्यकाळात उपलब्ध करुन द्यावयाच्या सोयी-सुविधेच्या दृष्टीने विकसित करणेकामी राष्ट्रीय स्तरावर जाहिरात प्रसिध्द करुन, बांधकाम क्षेत्रातील नामांकित आर्किटेक्टस् अथवा तज्ञ सल्लागार संस्थांकडून

संकल्पना चित्रे, कच्चे बांधकाम आराखडे तयार करणेकामी सहभाग प्रस्ताव मागविण्यांत यावेत, अशा सुचना दिलेल्या आहेत. त्यानुसार इकडील विभागामार्फत कार्यवाही करणेत येत आहे.

अशा प्रकारे सविस्तर संकल्पना चित्रांसह कच्चे बांधकाम आराखडे तयार करणेस आर्किटेक्ट यांना बराचसा कालावधी लागण्याची शक्यता आहे. तसेच आर्किटेक्ट यांचेकडून उपलब्ध होणाऱ्या नवीन प्रस्तावामध्ये या ठिकाणी म्हणजेच सध्या जुन्या प्रसादालय परिसरात असलेल्या इमारती अनावश्यक ठरणार आहेत. त्यामुळे या परिसरातील इमारती पाडणे, त्याचे निरुपयोगी साहित्य परिसराबाहेर नेऊन टाकणे आदि कामांसाठी बराच कालावधी लागणार आहे. त्यामुळे आर्किटेक्ट यांचेकडून प्रस्ताव प्राप्त होईपर्यन्तच्या कालावधी मध्ये अशा अनावश्यक इमारती नामशेष करणेसाठी निविदा मागवून कार्यवाही करणे उचित राहील.

**(ब)** उपरोक्त परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे, जुन्या प्रसादालय परिसरातील तूर्त साईप्रसाद नंबर १ व साईप्रसाद नंबर २ या दोन इमारती पाडणे व त्याचे साहित्य परिसराबाहेर वाहून टाकणे आदि कामे विहीत पध्दतीने निविदा मागवून करुन घेता येतील.

सदरहू इमारती पाडण्यासाठी अद्यायवत पध्दतीने (Implosion) अथवा प्रचलित पध्दतीने पाडणेकामी निविदा मागवून कार्यवाही करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, असे ठरविण्यात आले की, श्रींचे दर्शन रांगेसाठी सध्या असलेली व्यवस्था गर्दीचे वेळेस अपूरी पडते. साईभक्तांचे दर्शन रांगेची व्यवस्था व रांगेतील साईभक्तंना इतर अनुषंगिक सोयी सुविधा पुरविणे आवश्यक आहे. करीता श्रींचे समाधी मंदिरालगत प्रसादालय परिसरातील जागा उपलब्ध होऊ शकते त्यामूळे **प्रस्तावित केलेप्रमाणे साईप्रसाद नं.०१ व साईप्रसाद नं.०२ या दोन इमारती स्थानिक विश्वस्तांना दाखविण्यात याव्यात व त्यानंतर टेंडर मागणी करावी, असे ठरले. तसेच पूर्वी श्रीसाईबाबा मंदीर विकास प्रकल्पासाठी राष्ट्रीय स्तरावर वास्तुविशारद स्पर्धा घेणेत आली होती. त्यावेळी स्पर्धेच्या कामकाजासाठी श्री.आवर्ती अनिल नागरथ,मुंबई यांनी व्यावसायिक सल्लागार म्हणून सेवा दिली होती. त्याच धर्तीवर आता वरीलप्रमाणे मर्यादीत वास्तुविशारद स्पर्धेच्या कामकाजासाठीही श्री.आवर्ती अनिल नागरथ, मुंबई यांची व्यावसायिक सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात यावी. याकामी आदा करावयाच्या व्यावसायिक शुल्काबाबत त्यांचेकडून प्रस्ताव घेऊन व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करणेत यावा,असें ठरलें.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२६** **समाधी चौथाऱ्याभोवती मार्बलचा कठडा बसविणेबाबत**

**निर्णय क्र.३४२** समाधी चौथाऱ्याभोवती सध्या जाळीचा मार्बलचा कठडा लावण्यात आला आहे. या अगोदर सन- १९९० ते १९९५ या कालावधीमध्ये त्यावेळीच्या मा.व्यवस्थापन समितीने हा कठडा बसविलेला आहे. (अगोदरचा कठडा खराब झाल्याने). श्री. अर्जुन प्रजापती, अर्जुन आर्ट गॅलरी, जयपुर यांनी दि.०२.०३.२००९ चे पत्राद्वारे नवीन मार्बल कठडा देण्याची इच्छा व्यक्त केली आहे. ते सध्या समाधी मंदिरातील मार्बल फरश्या देणगी दाखल बसवत आहेत. या अगोदरही कोर्ट रिसीवर यांच्या काळामध्ये पादुका व समोरच्या बाजुस भक्तांना दर्शन करताना त्रासदायक होत असल्याने कठडयाची रुंदी वाढविण्यात आली होती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख/अधिक्षक,मंदिर विभाग)

**विषय नं.२७** **नविन श्रीसाईप्रसादालय समोरील श्रीसाईबाबांचे शिल्पासाठी छत तयार करणे.**

**निर्णय क्र. ३४३** संस्थानचे श्री साई प्रसादालय हे दि.०८/०१/२००९ पासून श्री साई भक्तांसाठी प्रसाद भोजन घेणेकरीता खुले करण्यात आले आहे. श्री साई प्रसादालयासमोर श्री साईबाबा भक्तांसाठी प्रसाद भोजन बनवित आहेत, या मुद्रेत भव्य असे शिल्प ऑगस्ट २००७ मध्ये श्री.प्रमोद कांबळे, अहमदनगर यांचेमार्फत तयार करुन बसविण्यात आले आहे. सदर शिल्पाचे ऊन, पाऊस यापासून संरक्षण होणेकामी छत तयार करणेत यावे अशा आशयाचे निवेदन दिल्ली, भोपाळ, मुंबई, नाशिक येथिल काही साईभक्तांनी दिलेले आहे. त्यापैकी श्री. मितेश जगदीशचंद्र राठी, भोपाळ यांनी सदर छत बनविणेसाठी जो काही खर्च येईल तो ते स्वत: करणेस तयार असल्याचे कळविले आहे. तसेच ज्या कलाकाराकडून मुर्ती तयार करुन घेतली, त्यांचेकडुनच छत तयार करुन घ्यावे अशी विनंती केली आहे. याप्रमाणे साईभक्तांकडून करण्यात आलेल्या मागणीचा व श्री साईबाबांप्रती भक्तांना असलेल्या श्रद्धेचा विचार करुन, शिल्पासाठी छत तयार करणेकामी नगरचे आर्टिस्ट श्री. प्रमोद कांबळी यांना विनंती करण्यात आली. त्यानुसार श्री.प्रमोद कांबळे यांनी छताचे डिझाईन व एस्टीमेट दि.०४/०४/२००९ रोजी सादर केले आहे.

श्री.प्रमोद कांबळे यांनी दिलेल्या उपरोक्त डिझाईन व एस्टीमेटनुसार छताचे कामासाठी रु.३४.५० लक्ष मात्र इतका खर्च कळविला आहे. सदरहु खर्च हा जास्त स्वरुपाचा आहे. त्यामुळे सदर छतासाठी ॲल्युमिनिअम कम्पोझिट पॅनेल अथवा पॉलिकार्बोनेट शिट इ. पर्यायांचा विचार करता येईल. त्यासाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार रु.३.७५ लक्ष मात्र इतका खर्च येईल.

तरी वरीलप्रमाणे छताचे काम श्री. मितेश जगदीशचंद्र राठी, भोपाळ यांचेकडुन देणगी स्वरुपात करुन घेणेबाबत तसेच त्यासाठी कामाचे स्वरुप ठरविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त शिल्पासाठी छत केल्यास त्यामूळे शिल्पाचे सौंदर्यास बाधा निर्माण होण्याची शक्यता असल्याने तूर्त छत उभारण्यात येऊ नये असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२८ श्रीसाईबाबा हॉस्पिटल येथील लेखाशाखेत तसेच इतर ठिकाणी फर्निचर व अल्यूमिनियमचे पार्टीशन (टप्पा क्र.चार) करणे.**

**निर्णय क्र. ३४४** सदरहू विषय मागे घेण्यात आला. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२९ शिर्डी नगरपंचायत हद्दीतील नविन पिंपळवाडी रस्त्याचे दुरुस्ती व देखभालीसाठी रस्ता श्रीसाईबाबा संस्थानकडे हस्तांतरीत करणेबाबत.**

**निर्णय क्र. ३४५ अ)** मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील दि. ०९.११.२००८ रोजीचे पत्रान्वये विनंती केली आहे की, शिर्डी येथे येणाऱ्या भाविकांना नगरपंचायत देत असलेल्या नागरी सुविधा त्या मानाने अपुऱ्या आहेत. त्यामुळे येथे येणाऱ्या यात्रेकरुंना गैरसोयीनां तोंड द्यावे लागते. वरिल परस्थिती पहाता शिर्डी शहरातील मुलभूत सुविधामध्ये योग्य रितीने वाढ करणे आवश्यक आहे. नागरी भागामध्ये अशा प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी शिर्डी नगरपंचायतीची आहे. तथापी शिर्डी नगरपंचायतीची आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्याने साईभक्तांकरीता आवश्यक त्या सोई उपलब्ध करुन देणे शिर्डी नगरपंचायतीस आर्थिक दृष्टया शक्य झालेले नाही.

शिर्डी हद्दीत नविन पिंपळवाडी रस्ता असून सदर रस्त्याची लांबी ६३० मी. इतकी आहे. सदर रस्त्याची विकास योजनेत १५.०० मी. रुंदी असून सदर रुंदीस नगरपंचायत मार्फत अतिक्रमणे काढून रुंदीकरण करण्यात आलेले आहे. सदरचा रस्ता सन २००५ मध्ये डांबरीकरण करण्यात आलेला आहे. सद्दस्थितीत सदर रस्ता अत्यंत खराब झालेला असून वाहतूकीस अडचणीचा झालेला आहे.

शिर्डी नगरपंचायत हद्दीतील जुना पिंपळवाडी रस्ता श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांचेमार्फत करण्यात आलेला आहे. परंतू सदर श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांनी भावीकांचे दर्शन रांगेसाठी वाहतूकीस बंद केलेला आहे. त्यामुळे पिंपळवाडी कडे जाणारी त्याभागातील सर्व हॉटेल्सकडे तेसच आडवडे बाजार, कालिकानगर, बिरेगांव रोड, भाजी मंडई, विरभद्र मंदिर याकडे जाणारी वहातूक नविन पिंपळवाडी रस्त्याने जाते. त्यावर चारी गळती, पावसाच्या पाण्यामुळे व वहातूकीमुळे खड्डे पडल्याने सदर रस्त्याची दुरावस्था झालेली आहे. सदर रस्त्याचे कॉक्रीटीकरण केल्यास रस्ता भविष्यात लवकर खराब होणार नाही. तरी सदरच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण व देखभाल दुरुस्तीकाम श्री साईबाबा संस्थान मार्फत करणे अथवा त्यासाठी आवश्यक लागणारी खर्चाची रक्कम शिर्डी नगरपंचायत कडे वर्ग करण्यात यावी. " अशी विनंती केली होती.

वरिल प्रमाणे मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी केलेले विनंती नूसारचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०३.०१.२००९ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की,"शिर्डी शहरातील नविन पिंपळवाडी रस्ता संस्थानमार्फत विकसीत करणेस शासनाची मान्यता घेण्यात यावी, याकामी येणारे अंदाजे रु. २३६ लाख खर्चास मान्यता देणेत आली. तसेच याकामी एम. एस. आर. डी. सी. चे सल्लागार UNISON PROJECT MANAGMENT PVT. LTD., PUNE यांची नेमणूक करण्यात यावी. " असा निर्णय झालेला आहे.

**ब)** मा.अध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील दि. १७.०२.२००९ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, " सदर रस्त्यास भुयारी गटर, विद्युत व्यवस्था, तसेच पाणी पुरवठ्याची पाईप लाईन इ. व्यवस्था केलेली आहे. सदर रस्ता हा महत्वाचा रस्ता असल्याने सदर रस्त्याचे कॉक्रीटीकरण करुन त्याची देखभाल व दुरुस्ती संस्थानमार्फत करणे आवश्यक आहे. जेणेकरुन सदर रस्त्याची देखभाल व दुरुस्ती संस्थान यांचेकडून निधी उपलब्ध होऊन त्याचा फायदा साईभक्तांना व नागरीकांना हाईल. सदर रस्त्याचा वापर सध्या नविन पिंपळवाडी रस्त्याने होत असल्याने रस्ता श्री साईबाबा संस्थान यांचेकडे देखभाल व दुरुस्तीसाठी वर्ग करण्यासाठी येणाऱ्या सभेत निर्णय घेण्यात येणार आहे. तरी सदर रस्ता हा देखभाल व दुरुस्तीसाठी हस्तांतर करुन घेण्यासाठी श्री साईबाबा संस्थान यांची संमती देण्यास विनंती. " असे कळविले आहे.

**क)** थोडक्यात, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दि. १७ फेब्रुवारी, २००९ चे पत्रानूसार नविन पिंपळवाडी रस्ता (अहमदनगर- मनमाड रस्ता ते जुना पिंपळवाडी रस्ता अंदाजीत एकुण ६३० मीटर लांबी) दुरुस्ती देखभालीसाठी संस्थानने ताब्यात घेणेकामी संमती द्यावी, अशी विनंती केलेली आहे.

यापूर्वी सस्थानमार्फत जुना पिंपळवाडी रस्ता कॉक्रीटीकरण करुन, दोष दावित्व कालावधीनंतर नगरपंचायतीकडे दुरुस्ती देखभालीसाठी देणेत आलेला आहे. त्याच धर्तीवर नविन पिंपळवाडी रस्ता शासन मान्यतेनंतर संस्थानमार्फत कॉक्रीटीकरण करुन दोष दायित्व कालावधीपर्यंत संस्थानचे ताब्यात ठेवून, त्यानंतर नगरपंचायतीकडे दुरुस्ती देखभालीसाठी नगरपंचायतीकडे पुन्हा देता येईल, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर चर्चा होऊन, सदरचा रस्ता हा शिर्डीतील प्रमुख रस्त्यापैकी एक रस्ता असल्याने शासनाची मान्यता प्राप्त झालेनंतर कॉंक्रीटीकरण करण्यात यावे व कॉंक्रीटीकरण झाल्यानंतर सदर रस्त्याची दुरुस्ती व देखभाल संस्थानतर्फे करण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.३०** **साई आश्रम प्रकल्प परिसर विकास कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांवर चर्चा करुन निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३४६** मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयांन्वये, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे संयुक्त विद्यमाने साई आश्रम प्रकल्पाचे बांधकाम सध्या प्रगतीपथावर आहे. सदर प्रकल्पाचे परिसर विकास कामांसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.२७/०७/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६४३ अन्वये रुपये २०,४३,७२,४००.०० मात्रचे खर्चास मंजुरी घेण्यात आली आहे. त्यानुसार आर्किटेक्ट व कन्सलटंट यांचेकडून सदर कामाचे अंदाजपत्रक स्पेशिफिकेशन्स, नकाशे व निविदा तयार करुन घेण्यात आल्या.

सदर कामासाठी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर दोन वेळा निविदा सूचना प्रसिद्ध करण्यात आली होती. त्याचे प्रतिसादात दोन्ही वेळेस ठेकेदार मे. पार्श्वनाथ डेव्हलपर्स लि., नवि दिल्ली यांची एकच सिलबंद निविदा प्राप्त झाली. मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/११/२००८ रोजीचे सभेत सदरहू कामासाठी एकच निविदा प्राप्त झाली असल्याने याकामी फेर निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले. तसेच दि.२८/११/२००८ रोजी साई आश्रम प्रकल्प साईटवर साईभक्त श्री.के.व्ही.रमणी, मॅनेजींग ट्रस्टी, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे समवेत प्रकल्प आढावा बैठक घेण्यात आली. सदर बैठकी दरम्यान श्री. रमणी यांचेशी सदरचे टेंडर संदर्भात चर्चा करण्यात आली. त्यावेळी त्यांना सांगण्यात आले की, सदर कामाचे टेंडर हे दोन वेळेस मागवूनही त्यास फार कमी प्रतीसाद मिळाला. सदर बैठकीमध्ये उपरोक्त परिसर विकास कामाची निविदा तीन भागात विभागणे बाबत चर्चा झाली, जेणेकरुन निविदा सुचनेस जास्तीत जास्त प्रतिसाद मिळेल व संबंधीत कामामध्ये विशिष्ट स्वरुपाचे नैपुण्य असलेले ठेकेदार निविदा भरतील.

त्यानुसार सदर कामाचे आर्किटेक्ट मे.डी.ओ. निकम, पुणे व कन्सलटंट मे. डॉर्श कन्सल्ट इंडिया प्रा.लि., मुंबई यांचेकडून सदर कामाची सुधारित निविदा, अंदाजपत्रक, स्पेशिफिकेशन्स व नकाशे तयार करुन घेण्यात आले. सदर परिसर विकास कामासाठी जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकरीता व सदरचे कामात नैपुण्य असलेले ठेकेदार येण्याचे दृष्टीने निविदा ही खालीलप्रमाणे तिन भागात विभागण्यात आली आहे.

01. Tender for Construction of External Services (Civil work, Roads & Pathways, Pumbing & External Electrification work ) for Sai Ashram Project at Shirdi.
02. Tender for Construction of External Services (ESR, G.S.R. & Septic tank ) for Sai Ashram project at Shirdi.
03. Installation & Commissioning of Substation work & D.G. sets for Sai Ashram Project at Shirdi.

त्यानुसार दि. ०२/०२/२००९ रोजीचे वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीचा कालावधी हा दि.०२/०२/२००९ ते दि.१२/०२/२००९ पर्यंत ठेवण्यात आला व सिलबंद निविदा सादर करणेसाठी दि.२६/०२/२००९ पर्यंत मूदत देण्यात आली होती.

विहीत मूदतीत खालील तिन ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेऊन सिलबंद निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | सिलबंद पाकीट | आवक नं. | दिनांक |
|---|---|---|---|---|
| ०१ | पार्श्वनाथ डेव्हलपर्स लि., नवि दिल्ली. | ०१ | ७०४८ | २६/०२/२००९ |
| ०२ | आय.व्ही.आर.सी.एल. इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड प्रोजेक्टस् लि., पुणे. | ०१ | ७०४६ | २६/०२/२००९ |
| ०३ | शापुरजी पालोनजी ॲण्ड कं. लि., नाशिक | ०१ | ७०४७ | २६/०२/२००९ |

उपरोक्त निविदा दि. ०८/०३/२००९ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उघडण्यात आल्या त्यानंतर उपरोक्त निविदा सादरकर्त्यांना सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी बोलाविणेत आले असता सर्व निविदा सादरकर्ते यांनी सुधारित देकार देणेसाठी पुरेसा अवधी मिळणेबाबत विनंती केली. त्यावर सविस्तर चर्चा होऊन सर्व निविदा सादरकर्त्यांनी त्यांचे सुधारीत देकार सिलबंद पाकीटातून यथावकाश सादर करावेत. याप्रमाणे प्राप्त झालेले सुधारित देकार मा.स्थानिक विश्वस्तांपुढे उघडून, चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय घेणेत यावा असे ठरले.

त्यानुसार वरीलप्रमाणे प्राप्त झालेले सुधारीत देकार दि.१९/०३/२००९ रोजी शिर्डी येथे मा.स्थानिक विश्वस्तांपुढे उघडून चर्चा / वाटाघाटी केल्या असता निविदा सादरकर्ते यांनी देऊ केलेल्या दरांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | निविदा सादरकर्त्यांचे नांव व पत्ता | कामाचा प्रकार | निविदेतील दर | चर्चा / वाटाघाटींनंतर देऊ केलेले दर |
|---|---|---|---|---|
| ०१ | पार्श्वनाथ डेव्हलपर्स लि., नवि दिल्ली. | सिव्हील | ६९% अधिक | ४४ % अधिक |
| | | इलेक्ट्रीकल | ५४% अधिक | ४४ % अधिक |
| ०२ | आय.व्ही.आर.सी.एल. इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि., पुणे. | सिव्हील | ४६.०३% अधिक | ४४ % अधिक |
| | | इलेक्ट्रीकल | ४६.०३% अधिक | ४४ % अधिक |
| ०३ | शापुरजी पालोनजी ॲण्ड कं. लि., नाशिक | सिव्हील | ४१.९६% अधिक | ३० % अधिक |
| | | इलेक्ट्रीकल | ३५.९६% अधिक | ३० % अधिक |

वरिलपैकी शापुरजी पालोनजी ॲण्ड कं.लि.,नाशिक यांची ३० टक्के अधिक या निम्नतम दराची निविदा स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेत यावा अशी शिफारस मा.स्थानिक विश्वस्त यांनी केली आहे. त्या अन्वये **शापुरजी पालोनजी ॲण्ड कं.लि.,नाशिक यांना जा.नं.३४०२, दि.२५/०३/२००९ अन्वये उपरोक्त कामाचा कार्यादेश देण्यात आला आहे. याप्रमाणे कार्यवाहीस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.३१** **सेंटेड फिनेल व लिक्वीड सोप तयार करणेकामी लागणारे मटेरिअल खरेदी करणेबाबत**

**निर्णय क्र.३४७** वरील विषयान्वये संस्थानचे स्वच्छता विभाग, प्रसादालय विभाग, रुग्णालय विभाग यांना साफ-सफाई करणेसाठी सेंटेड फिनेल व लिक्वीड सोपची मोठया प्रमाणावर गरज भासते या विभागांना लागणारे मटेरीयल जुलै-२००७ पासून तयार करण्यात येते या करीता लागणारे केमिकल्स सुरत येथील साईभक्तांनी देणगी स्वरुपात दिलेले होते ते मटेरीयल वापरुन व कमी पडलेले मटेरीयल खरेदी करुन आत्तापर्यंत १६६६ लिटर्स फिनेल व ५३४४ लिटर्स लिक्वीड सोप तयार करुन विविध विभागांना वापरण्यासाठी देण्यात आलेले आहे. त्यापासून खालील प्रमाणे फायदा झालेला आहे.

| अ.नं.<br>१ | मटेरीयल<br>२ | तयार केलेले मटेरीयल<br>३ | मार्केट दराप्रमाणे प्रती लिटर्स दर<br>४ | मार्के दराप्रमाणे एकूण खर्च<br>५ | संस्थान लॅब मध्ये तयार करतांना येणारा प्र.लि. खर्च<br>६ | संस्थान लॅब मध्ये तयार करतांना येणारा एकूण खर्च<br>७ |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | सेंटेड फिनेल. | १६६६ लि. | ६३.०० प्रती लिटर्स | १,०४,९५८.०० | ४४.८३ प्र.लि. | ७४,६८६.७८ |
| ०२. | लिक्विड सोप. | ५३४४लि. | २२.०० प्रती लिटर्स | १,१७,५६८.०० | ११.२५ प्र.लि. | ६०,१२०.०० |

यावरुन संस्थान पाणी पुरवठा लॅबमध्ये लिक्वीड सोप व फिनेल तयार केल्यास दर्जा उत्तम मिळून खालील प्रमाणे नफा झाला.

लिक्वीड सोप नफा(५-७) + फिनेल नफा (५-७) = एकूण नफा

५७,४४८.०० + ३०,२७१.२२ = ८७,७१९.२२

संस्थानचे विविध विभागांना खालील प्रमाणे लिक्वीड सोप व फिनेलची आवश्यकता आहे.

| अ.नं. | मटेरीयल | प्रसादालय विभाग, स्वच्छता विभाग, रुग्णालय विभाग यांची एकत्रित वार्षिक मागणी |
|---|---|---|
| ०१ | सेंटेड फिनेल. | ४,००० लिटर्स |
| ०२. | लिक्विड सोप. | ७,००० लिटर्स |

वरील प्रमाणे मटेरीयल खरेदी न करता लॅबमध्ये तयार केल्यास खालील प्रमाणे फायदा होईल.

| अ.नं.<br>१ | मटेरीयल<br>२ | एकूण वार्षिक मागणी<br>३ | मार्केट मधील सध्याचा प्रती लिटर्स दर<br>४ | मार्के दराप्रमाणे एकूण खर्च<br>५ | संस्थान लॅब मध्ये तयार करतांना येणारा प्रती लिटर्स खर्च<br>६ | संस्थान लॅब मध्ये तयार करतांना येणारा एकूण खर्च<br>७ |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | सेंटेड फिनेल. | ४००० लिटर्स | १२०.०० प्र.लि. | ४,८०,०००.०० | ८१.००प्र.लि. | ३,२४,०००.०० |
| ०२. | लिक्विड सोप. | ७००० लिटर्स | ३०.०० प्र.लि. | २,१०,०००.०० | १२.०० प्र.लि. | ८४,०००.०० |

लिक्वीड सोप नफा (५-७) + फिनेल नफा (५-७) = एकूण नफा

१,२६,०००.०० + १,५६,०००.०० = २,८२,०००/-

सेंन्टड फिनेल व लिक्वीड सोप वरील विभागांना वर्षभर पुरविणेसाठी ते तयार करणेसाठी लागणारे मटेरीयल वार्षिक दर ठरवून पाहिजे तशी मटेरीयलची मागणी करुन कनकुरी साठवण तलाव प्रयोगशाळेत तयार केल्यास ते आपणास चांगल्या दर्जाचे मिळून रुपये २,८२,०००/- मात्र फायदा होईल.

म्हणून त्याकरीता ४००० लिटर्स फिनेल व ७००० लिटर्स लिक्वीड सोप तयार करण्यासाठी खालील प्रमाणे मटेरीयल व खर्च अपेक्षित आहे.

वार्षिक मागणी मटेरीलय तपशिल

| अ.नं. | तपशिल | आवश्यक मटेरीयल | मागणी | अंदाजे किंमत | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सेंटेड फिनेल. व लिक्वीड सोप तयार करणेचे | १) TRO Oil (७५%). | १४०० लिटर्स | ४५/- प्रती लिटर्स | ६३,००० /- |
| | | २) Acid slurry (७५%). | १००० किलो | ६८/- प्रती किलो | ६८,००० /- |
| | | ३) Costic Soda | ४७५ किलो | १२/- प्रती किलो | ५,७०० /- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | मटेरीयल | ४) Pine Oil (A ग्रेड) | २६०० लिटर्स | १०० /- प्रती लिटर्स | २,६०,००० /- |
| | | | | एकूण | ३,९६,७०० /- |
| | | | | व्हॅट १२.५ % | ४९,५८७ /- |
| | | | | **एकूण** | **४,४६,२८७ /-** |

**सेंटेड फिनेल व लिक्वीड सोप तयार करणेसाठी लागणारे मटेरीयल वार्षिक मागणी प्रमाणे कोटेशन मागवून खरेदी करण्यास व त्यासाठी अंदाजे रुपये ४,४६,२८७ /- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**विषय नं.३२ एल.पी.जी गॅस भट्टीचे स्पेअरपार्ट खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत**

**निर्णय क्र.३४८** प्रसादालयामध्ये दररोज सरासरी २७००० साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेतात. त्याचप्रमाणे दररोज सरासरी ५०,००० लाडू पाकिटाची व ६००० नाष्टा पाकिटाची विक्री होते. उपरोक्तप्रमाणे प्रसादभोजन पदार्थ, मोतीचूर लाडू व नाष्टा पाकिटातील पदार्थ बनविणेकामी एल.पी.गॅस चा वापर करीत असून दररोज सरासरी १४०० किलो ग्रॅम गॅस वापर होत आहे. त्याकामी सुमारे ३२ ते ४० गॅस भट्टयांचा वापर १६ तास ते २४ तासापर्यंत चालू असतो. त्यामुळे सततच्या वापरामुळे भट्टयांचे स्पेअरपार्ट वरचेवर बदलावे लागतात.

प्रतिवर्षी श्री पुण्यातिथी उत्सव माहे नोव्हेंबर, डिसेंबर व जानेवारी २००९ भक्तांची गर्दी मोठया प्रमाणात होत असते. या कालावधीत दररोज सुमारे ४०,००० भक्त प्रसादभोजनाचा लाभ घेतात व ९०,००० लाडू पाकिट व १०,००० पर्यंत नाष्टापाकिटाची विक्री होत असते. ऐन गर्दीच्या काळात स्पेअरपार्ट अभावी गॅस भट्टया बंद राहून साईभक्तांच्या सेवेत अडचणी निर्माण होऊ नये व तातडीची गरज म्हणून एल.पी्.गॅस स्पेअरपार्ट होलसेलर्स व संस्थानचे एल.पी.गॅस संदर्भात नेहमीचे सल्ला, मार्गदर्शक व सेवा देणारे असे मे.ग्लोब गॅस इक्वीपमेंट इंडस्ट्री प्रा.लि. मुंबई यांचेकडून खालीलप्रमाणे स्पेअरपार्ट खरेदी करुन वापरलेले आहेत.

1) Invoice No. GG/411/T/2008-09.

| Sr. no. | Description | Qty. | Rate Rs | Per Unit | Amount Rs |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Copper Burner Pigtail 3' long | 06 | 300.00 | - | 1800.00 |
| 2. | Copper Cylinder Pigtail 3' long | 06 | 260.00 | - | 1560.00 |
| 3. | Flexible Burner Cum Cylinder Pigtail 5' long | 06 | 275.00 | - | 1650.00 |
| 4. | Flexible Burner Cum Cylinder Pigtail 5' long | 06 | 225.00 | - | 1350.00 |
| 5. | Flexible Burner Pigtail 5' long | 06 | 185.00 | - | 1110.00 |
| 6. | Flexible Burner Pigtail 5' long | 06 | 135.00 | - | 810.00 |
| 7. | F-Washer | 100 | FOC | - | FOC |
| 8. | Needle Control valve 3/8" x 3/8" x 3/8" | 06 | 25.00 | - | 1500.00 |
| 9. | Main line valve ½" x ½" | 06 | 400.00 | - | 2400.00 |
| 10. | Click on NCV | 06 | 350.00 | - | 2100.00 |
| | | | | Total- | 14280.00 |
| | | | | Vat 12.5% | 1785.00 |
| | | | | Gran total- | 16065.00 |

2) Invoice No. GG/443/T/2008-09.

| Sr. no. | Description | Qty. | Rate Rs | Per Unit | Amount Rs |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Copper Burner Cum Cylinder Pigtail 5' long | 06 | 490.00 | - | 2940.00 |
| 2. | Copper Burner Cum Cylinder Pigtail 3' long | 06 | 390.00 | - | 2340.00 |
| 3. | Copper Burner Pigtail 5' long | 06 | 400.00 | - | 2400.00 |
| 4. | Copper Cylinder Pigtail 5' long | 06 | 480.00 | - | 2880.00 |
| 5. | M 78 Complte Burner | 06 | 1750.00 | - | 8750.00 |
| | | | | Total- | 19310.00 |
| | | | | Vat 12.5% | 2414.00 |
| | | | | Gran total- | 21724.00 |

| अ.नं. | बील नं. | रक्कम |
|---|---|---|
| 1. | Invoice No. GG/411/T/2008-09, dated 29.09.2008 | 16,065.00 |
| 2. | Invoice No. GG/443/T/2008-09, dated 07.10.2008 | 21,724.00 |
| | एकूण बीलांची रक्कम रु. | 37,789.00 |

तरी **मे. ग्लोब गॅस इक्वीपमेंट इंडस्ट्री प्रा.लि., मुंबई यांचेकडून खरेदी केलेल्या एल.पी.गॅस भट्टीचे स्पेअरपार्टचे एकूण रक्कम रु. ३७,७८९/- आदा केलेल्या रक्कमेस कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**विषय नं.३३ नवीन प्रसादालयातील प्लंबींग कामाकरिता मटेरियल खरेदीस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३४९** मा.व्यवस्थापन समिती सभा दि. १८.१०.२००८ मधील निर्णय क्र. ७७६ नुसार नविन प्रसादालयातील प्लंबींग कामासाठी आवश्यक असणारे जी.आय. पाईप, एस. डब्ल्यु .आर. पाईप व इतर साहित्य विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे एकुण रक्कम रु. १,२१,३२६/- पर्यंतचे खर्चास मान्यता आहे. त्यानुसार संस्थान जा.नं.एसएसएस/खरेदी - पा.पु./११६७/२००९ दि. २३.०१.२००९ अन्वये १२ पुरवठाधारकांकडून मागविणेत आलेली दरपत्रके उघडणेत येऊन त्यातील न्युनतम दराने मे. हिंदुस्थान टुल्स ॲण्ड इंजिनिअरींग कंपनी, मुबई यांना जा.नं. १८६६ दि. १३.०२.२००९ अन्वये रक्कम रुपये १,६२,६१६.५८ पुर्णांकित रक्कम रुपये १,६२,६१७/- चा पुरवठा आदेश देण्यात आलेला असून त्यांनी साहित्याचा पुरवठा पुर्ण केलेला आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयानुसार रु. १,२१,३२६/- पर्यंतचे खर्चास मान्यता असल्याने मुळ मंजूरीपेक्षा रु. ४१,२९१/- जादा खर्च झालेला आहे.

तरी नविन प्रसादालयातील प्लंबींग कामासाठी आवश्यक असणारे जी.आय.पाईप, एस.डब्ल्यु. आर पाईप व इतर साहित्यासाठी मूळ मंजूरीपेक्षा जादा आलेल्या रक्कम रु. ४१,२९१/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

तसेच साईभक्त पादूका सोहळ्यात लाडू प्रसाद वाटप करणेसाठी **मे.निलकमल कंपनीकडून प्रसादालय विभागाचे मागणीनुसार तातडीने क्रेटस् खरेदी करण्यात आलेले आहेत. त्यासाठी रक्कम रुपये ९६,३५८ व लाडू करीता लागणारी ३२१.९० कि.ग्रॅ प्लॅस्टिक पिशवी वेगळी छपाई करुन मे.सरस प्लॅस्टिक्स, अहमदनगर यांचेकडून खरेदी करण्यात आली असून त्यास रुपये ४१,८४७/- खर्च आला असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.३४** **पुजारी प्रशिक्षणाकरिता सोहळे खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.३५०** श्री साईबाबांचे मंदिरातील दैनंदिन कार्यक्रम पुजा अर्चा व वर्षभरातील उत्सवाबाबतची माहिती भारतातील सर्व साई मंदिरातील पुजाऱ्यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत मिळावी व प्रत्येक मंदिरातील दैनंदिन कार्यक्रम, पुजा अर्चा व वर्षभरातील उत्सव यामध्ये एकसुत्रीपणा असावा म्हणून श्री विविध ठिकाणचे श्री साई मंदिरातील दैनंदिन कार्यक्रम, पुजा-अर्चा व वर्षभरातील उत्सव यामध्ये एकसुत्रीपणा असावा म्हणून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत सदर मंदिरांना प्रशिक्षण देण्यासाठी दि.२९.०१.२००५ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. प्रती प्रशिक्षणार्थी कडून रु.५००/- शूल्काची आकारणी करण्यात येते. सदर पुजारी प्रशिक्षणांतर्गत निमंत्रीत पुजारी यांना भेट वस्तू म्हणून सोहळे देणगी देण्यास उपरोक्त संदर्भाने मान्यता घेण्यात आलेली आहे. पुजाऱ्यांची वाढती संख्या असल्याने सदर सोहळे खरेदी करावे लागत लागत आहे.

त्यामुळे सन २००९ ते २०१० या कालावधीकरीता प्रति महिना अंदाजे ५० पुजाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहेत. त्यासाठी अंदाजे ६०० सोहळे लागतील सदर साहळे मंदिर विभागाकडे उपलब्ध नसल्याने **स्थानिक व्यापाऱ्यांकडून विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.१,२५,०००/- खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,मंदिर विभाग)

**विषय नं.३५** **संस्थानचे इतर इमारतीचे सुरक्षिततेसाठी लागणारे साहित्य खरेदी करणे बाबत**

**निर्णय क्र.३५१** दि.२२.०९.२००७ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील विषय नं.२७ व निर्णय क्र.७७२ अन्वये समाधी मंदिर व परिसराचे सुरक्षा व्यवस्थेकरीता सुरक्षा कन्सल्टंट म्हणून मे. ट्रायकलर कन्सल्टंट प्रा.लि., मुंबई यांची नेमणूक करण्यत आलेली आहे. त्याकामी त्यांना प्रोफेशनल फि म्हणून रु.३,५०,०००/- मात्र तसेच प्रत्यक्ष प्रवास, राहणे, जेवण इ.चा खर्च देण्यात यावा, असे ठरले आहे.

त्यानुसार मा.व्यवस्थापन समिती सभेतील दि.१८.१०.२००८ विषय नं.३६ व निर्णय क्र.७९३ अन्वये सुरक्षा साहित्य खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्तप्रमाणे मागविलेल्या ३५ निविदांपैकी १९ निविदा जमा झालेल्या आहेत. १९ निविदाधारकांमधून मंजूर होणाऱ्या निविदाधारकांमार्फत व ट्रायकलर कन्सल्टंट प्रा.लि., मुंबई यांचेकडून खालील इमारतींचा सर्वे करुन सदरील ठिकाणी बसविण्याचे सुरक्षा साहित्य खरेदी करता येईल.

**०१.** नविन श्री साई प्रसादालय, **०२.** नविन भक्तनिवासस्थान, **०३.** श्री साईबाबा हॉस्पिटल,
**०४.** श्री साईनाथ रुग्णालय, **०५.** वॉटर टँक एरिया **०६.** द्वारावती इमारत.

उपरोक्त कामासाठी ट्रायकलर कन्सल्टंट प्रा.लि., मुंबई यांनी प्रोफेशनल फि म्हणून रु.२,००,०००/- मात्र जादा खर्च लागेल असे त्यांचे पत्राद्वारे कळविले आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे ट्रायकलर कन्सल्टंट यांनी कळविलेल्या जादा खर्चास तसेच मंजूर निविदाधारकांमार्फत मंजूर झालेल्या दराप्रमाणे सदरील **इमारतीसाठी लागणारे सुरक्षा साहित्य खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-संरक्षण विभागप्रमुख)

**विषय नं.३६ संस्थानचे वेबसाईडसाठी स्वतंत्र वेब सर्व्हर भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या जागेचे नुतनीकरणे करणेबाबत.**

**निर्णय क्र.३५२** श्री साईभक्तांना संस्थान विषयी माहिती-सेवा उपलब्ध करुन देणेसाठी संस्थानने स्वत:ची अधिकृत वेबसाईट (website) url www.shrisaibabasansthan.org या नावाने दिनांक २१ नोव्हेंबर,१९९८ पासून सुरु केलेली आहे. या वेबसाईटसाठी आवश्यक असणाऱ्या वेबसर्व्हर होस्टींगचे काम Institute of Advanced Studies, Nagpur ही संस्था पाहत असून, संकेतस्थळ सुरु ठेवणेसाठी दिनांक ०१ मे, २००७ ते दिनांक ३१ ऑक्टोबर, २००७ या सहा महिन्याच्या कालावधीसाठी 5 GB Space 100 GB Data transfer खरेदी करण्यात आलेले आहे. या संस्थेमार्फत People Connect Managed Servers या कंपनीकडे असलेल्या वेब सर्व्हरवर संस्थानच्या संकेतस्थळासाठी उपरोक्तप्रमाणे जागा (Space) खरेदी करण्यात आलेली आहे.

संस्थान वेबसाईटवर श्री साईबाबांचे व व्दारकामाई यांचे ऑन लाईन दर्शन सुरु केल्याने, तसेच वेबसाईटवर वेळोवेळी होणारे बदल यामुळे आपल्या वेबसाईटला देशी विदेशातील हजारो साईभक्त भेटी देत आहेत. त्याचे प्रमाण मागील काही महिन्यात जादा प्रमाणात वाढलेले आहे. एकाच वेळी जास्त साईभक्तांनी वेबसाईट ओपन केल्यास, वेबसाईट ओपन होण्याची गती कमी होऊन, वेबसाईट लवकर दिसण्यास अडथळा तयार होतो. यामुळे साईभक्तांमध्ये नाराजी निर्माण होत आहे. याबाबत यापूर्वी प्रशासनाचे निदर्शनास आणून देण्यात आले असून, संस्थानचे स्थानिक मानद तांत्रिक सल्लागार श्री विजय नायडू, कोपरगाव यांचा अभिप्राय घेण्यात आला होता. त्यांनी श्री सुनिल गणात्रा, नागपूर यांचेशी चर्चा करण्यास सांगितले, त्याप्रमाणे, श्री सुनिल गणात्रा यांचेशी दूरध्वनीवरुन चर्चा केली असता, त्यांनी संस्थान वेबसाईटचा डेटा मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. Live Darshan सुविधेमुळे साईभक्तांची संख्या क्षमतेपेक्षा जास्त झालेली आहे. वेबसाईटला भेटी देणाऱ्या श्रीसाईभक्तांची संख्याही वाढलेली आहे. त्यामुळे संस्थान वेबसाईट इंटरनेटवर उघडण्यास (ओपन होण्यास) अडचणी निर्माण होत आहे. संस्थान वेबसाईट सुरळीत चालू राहणेसाठी स्वतंत्र वेबसर्व्हर भाडे तत्वावर घेतल्यास, या संगणकातील हार्डडिस्कवरील संपूर्ण जागा संस्थान वेबसाईटसाठी वापरता येईल. तसेच एकाच वेळी कितीही श्रीसाईभक्तांनी वेबसाईट ओपन केली तरीही वेबसाईट दिसण्याची गती कमी होणार नाही, असे श्री सुनिल गणात्रा यांनी उपरोक्त संदर्भीय इमेलव्दारे सुचविले आहे.

सदर कार्यवाहीसाठी येणाऱ्या खर्चाबाबत व वेबसर्व्हरबाबत वेबसर्व्हरच्या कार्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या पिपल कनेक्ट मॅनेज्ड सर्व्हिसेस, मुंबई या संस्थेशी चर्चा करुन, खालील प्रकारचे स्वतंत्र वेबसर्व्हरवर जागा (Space) भाडेतत्वावर घेणेसाठी व त्यासाठी मासिक रुपये ८,०००/- प्रमाणे दिनांक ०१ एप्रिल, २००८ ते दिनांक ३१ मार्च, २००९ या एक वर्षाचे कालावधीसाठी रुपये ९६,०००/- मात्रचे खर्चास व्यवस्थापन समितीचे दिनांक १६ मार्च, २००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २५१ अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे.

Intel / AMD P4 2.4 GHZ of Higher,
1 GB RAM,
Windows 2003 WEB SERVER OS,
HDD Capacity 80GB
Monthly Bandwidth allocation-1500 GB

सदर जागेची मुदत दिनांक ३१ मार्च, २००९ अखेर संपुष्टात येत असल्याने, संस्थान वेबसाईट पुढील कालावधीत सुरळीत चालू राहणेसाठी Institute of Advanced Studies, Nagpur यांचेमार्फत People Connect Managed Servers या कंपनीकडून उपरोक्त प्रकारचे स्वतंत्र वेबसर्व्हरवर घेण्यात आलेल्या जागेचे (Space) चे दिनांक ०१ एप्रिल, २००९ ते दिनांक ३१ मार्च, २०१० या एक वर्षाचे कालावधीसाठी नूतनीकरण करणेत यावेत, असे नम्र मत आहे. सदर कार्यवाहीसाठी रुपये ९५,०००/- मात्रचा खर्च Institute of Advanced Studies, Nagpur यांनी त्यांचे दिनांक २४/०३/२००९ रोजीचे ईमेलाव्दारे कळविलेला आहे. सदर रक्कम त्यांना मागीलप्रमाणेच दोन टप्यात अदा करता येईल.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे, Institute of Advanced Studies, Nagpur यांचेमार्फत People Connect Managed Services Mumbai या कंपनीकडून संस्थान वेबसाईटसाठी घेण्यात आलेल्या स्वतंत्र वेबसर्व्हरवरील जागेचे (Space) चे दिनांक ०१ एप्रिल, २००९ ते दिनांक ३१ मार्च, २०१० या **एक वर्षाचे कालावधीसाठी नूतनीकरण करणेस व त्यासाठी येणारे रुपये ९५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

**विषय नं.३७ ४५ वी विभागीय कौशल्य स्पर्धा ऑक्टोबर-२००८ मधील संस्थेच्या यशाबाबत.**

**निर्णय क्र.३५३** औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचे प्रशिक्षण हे केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयाअंतर्गत डायरेक्टोरेट जनरल ऑफ एम्लॉयमेंट ॲण्ड ट्रेनिंग (D.G.E.&T.) यांचे द्वारा राज्य शासनाच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे नियंत्रणाखाली चालते. यामध्ये निरनिराळया १०० हून अधिक अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देण्यात येते. त्यापैकी फक्त १२ व्यवसायांची राष्ट्रीय पातळीवर कौशल्य स्पर्धा घेण्यात येते.

चालू वर्षी नाशिक विभागातून विभागीयस्तर कौशल्य स्पर्धेमधून ०५ जिल्हयामधील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्था/ केंद्रामधून ०६ ट्रेडसाठी १२ विद्यार्थी औरंगाबाद येथे झालेल्या राज्यस्तर स्पर्धेसाठी पात्र झाले. पैकी आपल्या औद्योगिक प्रशिक्षण केंद्रातील ०८ विद्यार्थ्यांचा समावेश होता. राज्यस्तरसाठी नोव्हेंबर- २००८ मध्ये औरंगाबाद येथे झालेल्या ४५ व्या राज्यस्तर कौशल्य स्पर्धेमधुन आपल्या ८ पैकी ४ प्रशिक्षणार्थ्यांनी राज्य पातळीवर सर्व द्वितीय क्रमांक मिळविलेला आहे.

| अ.नं. | नांव | व्यवसाय | उत्तीर्ण श्रेणी |
|---|---|---|---|
| ०१ | कोळपकर सचिन गोरक्षनाथ | जोडारी | सर्व द्वितीय |
| ०२ | काकड सतिष बाळासाहेब | वेल्डर | सर्व द्वितीय |
| ०३ | शेळके गणेश भाऊसाहेब | वीजतंत्री | सर्व द्वितीय |
| ०४ | क्षिरसागर प्रविण दिलीप | टर्नर | सर्व द्वितीय |

एकाच वेळी राज्य पातळीवर एकाच संस्थेतून चार प्रशिक्षणार्थी सर्व द्वितीय येणे हा राज्य पातळीवरील उच्चांक असावा.

राष्ट्रीयस्तरासाठी कौशल्य स्पर्धेमधून फक्त प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यास महाराष्ट्राचे त्या-त्या ट्रेडचे प्रतिनिधीत्व करता येते.

**विभागीय पातळीवरुन आपल्या ८ प्रशिक्षणार्थ्यांची राज्य पातळीवर निवड झाल्याची माहिती मा.व्यवस्थापन समितीसमोर यापुर्वी सादर केलेली आहे. औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचे हे काम अभिनंदनीय आहे असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्याची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय )

**विषय नं.३८** **श्रीसाईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थीनींचा गणवेश रंग बदलणे बाबत**

**निर्णय क्र.३५४** श्रीसाईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय,शिर्डी या विद्यालयासाठी इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थीनींसाठी खालीलप्रमाणे गणवेशाचा वापर करण्यात येतो.

| अ.नं. | वर्ग | गणवेश |
|---|---|---|
| ०१ | इयत्ता पाचवी ते सातवी विद्यार्थीनींसाठी | पिनो फ्रॉक,ब्लाऊज व बेल्ट |
| ०२ | इयत्ता आठवी ते दहावी विद्यार्थीनींसाठी | सलवार कमील ओढणीसह |
| ०३ | इयत्ता पाचवी ते दहावी विद्यार्थीनींसाठी | स्वेटर्स (फुल बाहीचा) |

**शैक्षणिक वर्ष २००९-१०** करीता याप्रमाणे गणवेशाची आवश्यकता आहे.

| अ.नं. | वर्ग | गणवेश | अंदाजे संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | इयत्ता पाचवी ते सातवी विद्यार्थीनींसाठी | पिनो फ्रॉक,ब्लाऊज व बेल्ट | ६०० नग (प्रत्येक विद्यार्थीनीस ०२ नग) |
| ०२ | इयत्ता आठवी ते दहावी विद्यार्थीनींसाठी | सलवार कमील ओढणीसह | ६०० नग (प्रत्येक विद्यार्थीनीस ०२ नग) |
| ०३ | इयत्ता पाचवी ते दहावी विद्यार्थीनींसाठी | स्वेटर्स (फुल बाहीचा) | ६०० नग (प्रत्येक विद्यार्थीनीस ०१ नग) |

श्रीसाईबाबा कन्या विद्या मंदिर या विद्यालयाच्या गणवेशाचा रंग सन १९९४ पासून निवडलेला आहे.आजतागायत म्हणजेच साधारणत: १४ वर्ष त्यामध्ये कुठल्याही प्रकारचा बदल केलेला नाही. शैक्षणिक वर्ष २००९-१० करीता सध्या असलेल्या गणवेश कापडाच्या रंगात बदल करायचा आहे. आकर्षक रंगसंगतीमध्ये गणवेशाचे कापड असावे असे वाटते. तरी गणवेश पुरवठादारांकडून कापडाचा प्रकार, रंग व स्वेटरचे नमुने बोलावून निवड करता येईल. सदर गणवेशाबाबत संस्थानवर कुठलाही आर्थिक बोजा नाही फक्त गणवेश पुरवठादार व पालक यांच्यात समन्वय साधावयाचा आहे.

तरी **गणवेश कापडाचा रंग बदलणे व स्वेटरचे नमुन्याबाबत पुरवठादाराकडून दरपत्रक मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्या,कन्या विद्या मंदिर)

**विषयनं.३९** **व्दारावती इमारतीतील खोल्यामध्ये विविध साहित्य खरेदीकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणे बाबत**

**निर्णय क्र.३५५** व्दारावती इमारतीतील खोल्या भक्तांना निवासासाठी लवकरात लवकर उपलब्ध करुन देणेसाठी खोल्यात ठेवणेकरीता अंघोळीसाठी प्लॅस्टिकची बादली,मग,स्टुल ,बाथरुम मधील लहान बादली, डस्ट बिन इत्यादी खरेदी करणेकामी मा.व्यवस्थान समितीचे दिनांक ०३.०१.२००९ रोजीचे सभेमध्ये आयत्या वेळेचा विषय क्र.१० निर्णय क्र. ६९ .व्दारावती इमारतीसाठी आवश्यक असणारे वरील प्रमाणे साहित्य खरेदीकामी मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे व मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांचे समितीने मुंबई - नाशिक येथून समक्ष पहाणी करुन मालाचा नमूना पसंत करुन प्रचलित पध्दतीने खरेदी करणे बाबत अंतिम निर्णय घ्यावा असा झालेला आहे.त्यानुसार बुधवार दिनांक २८.०१.२००९ रोजी मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर त्यांचेसोबत श्री बी.डी.साबळे,प्रशासकिय अधिकारी,निवासस्थान व श्री डी.एम.देसाई,शाखा

अभियंता,बांधकाम विभाग यांनी मुंबई येथे जाऊन उपरोक्त माल/वस्तूची समक्ष पहाणी केली आहे असून चांगल्या प्रतीच्या मालाचे कोटेशन मागितले आहे. आलेले कोटेशन मा.डॉ.गोंदकर विश्वस्त यांचे समक्ष उघडणेत आलेले आहे.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.न. | दुकानदारांचे नांव | | प्लॅस्टिक बादली १७ लिटर | प्लॅस्टिक बादली ०३ लिटर | प्लॅस्टिक मग ०१ लिटर | प्लॅस्टिक स्टुल | डस्ट बिन स्विंग १२ | डस्ट बिन साधे | सोप डिस्क |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मागणी | ४०० नग | ४०० नग | ५०० नग | ३५० नग | ३५० नग | | ५०० नग |
| १ | भिंगारवाला एन्टरप्राईजेस अहमदनगर | वॅटसह रुपये-पैसे | १५०-००<br>कामधेनू कंपनी | -- | २२-००<br>कामधेनू कंपनी | --- | १४०-०० | --- | ---- |
| ०२ | बिछावत, मुंबई | रुपये-पैसे<br>वॅटसह रुपये-पैसे | १०५-००<br>१०९-२०<br>(४%) | २८.२५<br>२९-३८<br>(४%) | १३.९०<br>१५.६३<br>(१२.५०%) | १०६-००<br>११०-२४<br>(४%) | ०९७-००<br>१००-८८<br>(४%) | ०४३.५०<br>०४५.२४<br>(४%) | ---- |
| ०३ | जलाराम ट्रेडर्स,मंबई. | रुपये-पैसे<br>वॅटसह रुपये-पैसे | ९२.०० <br>९५.६८<br>(४%) | २७.००<br>२८.०८<br>(४%) | ११.२०<br>१२.६०<br>(१२.५०%) | ९८.००<br>११०.२५<br>(१२.५०%) | ०८७..००<br>०९०.४८<br>(४%) | .३५.५०<br>३६.९२<br>(४%) | --- |
| ०४ | लक्ष्मीदास एन्टरप्राईजेस , मुंबई | रुपये-पैसे<br>वॅटसह रुपये-पैसे | ८८.००<br>९१.५२<br>(४%)<br>मिलन कंपनी | २५.२५<br>२६.२६<br>(४%)<br>मिलन कं. | १०.५०<br>११.८१<br>(१२.५०%)<br>मिलन कंपनी | ९४.००<br>१०५.७५<br>(१२.५०%)<br>मिलन कंपनी | ०८५.००<br>०८८.४०<br>(४%) | ३४.००<br>३५.३६<br>(४%) | --- |
| ०५ | समृध्दी इंडस्ट्रीज लि.सांगली | रुपये-पैसे<br>वॅटसह रुपये-पैसे | १२०.०० | --- | --- | --- | --- | --- | --- |
| ०६ | प्रविण प्लस्टिक, मुंबई | रुपये-पैसे<br>वॅटसह रुपये-पैसे | ११२.५०<br>११७.००<br>(४.%)<br>(अनब्रेकेबल)<br>पॉलीसेट कं. | ४०.००<br>४१.६०<br>(४%)<br>(अनब्रेकेबल)<br>पॉलीसेट कं. | १०.२५<br>११.५३<br>(१२.५%)<br>(अनब्रेकेबल)<br>पॉलीसेट कंपनी | १५५.३१<br>१७४.७२<br>(१२.५%)<br>(जम्बो)रफ - टफ (जोयो) | १०२.००<br>११४.७५<br>(१२.५%)<br>पॉलीसेट कंपनी | --- | ०४.००<br>०४.५०<br>(१२.५%) |
| | चांगल्या प्रतीच्या मालाच्या कंपनीचे नांव व दर | | ११७.००<br>(अनब्रेकेबल)<br>पॉलीसेट कंपनी | ०४१.६०<br>(अनब्रेकेबल)<br>पॉलीसेट कंपनी | ११.५३<br>(अनब्रेकेबल)<br>पॉलीसेट कंपनी | १७४.७२<br>(जम्बो)<br>रफ -टफ<br>(जोयो) | ११४.७५<br>पॉलीसेट कंपनी | -- | ०४.५० |
| | एकुण रुपये | | ४६,८००-०० | १६,६४०-०० | ०५,७६५-०० | ६१,१५२-०० | ४०,१६२-५० | -- | ०२,२५०-०० |
| | | एकुण रुपये:- १,७२,७६९-५० | | | | | | | |

**अ.नं. १. प्लॅस्टिक बादली १७ लिटर :-** यात बिछावत,मुंबई ,जलाराम ट्रेडर्स,मुंबई ,लक्ष्मीदास एन्टरप्रायजेस,मुंबई यांचेपेक्षा प्रविण प्लॅस्टिक,मुंबई यांचे दर आधिक आहेत.कारण बादलीची क्वॉलीटी चांगली आहे.(अनब्रेकेबल आहे.)

**अ.नं. २. प्लॅस्टिक बादली ०३ लिटर (बाथरुम मधील ) :-**यात बिछावत,मुंबई ,जलाराम ट्रेडर्स,मुंबई , लक्ष्मीदास एन्टरप्रायजेस,मुंबई यांचेपेक्षा प्रविण प्लॅस्टिक,मुंबई यांचे दर आधिक आहेत.कारण बादलीची क्वॉलीटी चांगली आहे. .(अनब्रेकेबल आहे.)

**अ.नं. ३. प्लॅस्टिक मग ०१ लिटर :-** यात प्रविण प्लॅस्टिक,मुंबई यांचे दर सर्वात कमी आहे. मगाची क्वॉलीटी चांगली आहे. .(अनब्रेकेबल आहे.)

**अ.नं. ४. प्लॅस्टिक स्टुल :-** यात बिछावत,मुंबई ,जलाराम ट्रेडर्स,मुंबई ,लक्ष्मीदास एन्टरप्रायजेस,मुंबई यांचेपेक्षा प्रविण प्लॅस्टिक,मुंबई यांचे दर आधिक आहेत.कारण प्लॅस्टिक स्टुलची क्वॉलीटी चांगली आहे.(रफ-टफ,) .(अनब्रेकेबल आहे.)

**अ.नं. ५. डस्ट बिन (स्विंग) :-** यात बिछावत,मुंबई ,जलाराम ट्रेडर्स,मुंबई ,लक्ष्मीदास एन्टरप्रायजेस,मुंबई यांचेपेक्षा प्रविण प्लॅस्टिक,मुंबई यांचे दर आधिक आहेत.कारण डस्ट बिनची क्वॉलीटी चांगली आहे. (अनब्रेकेबल आहे.)

**अ.नं. ७.** सोप डिस्कचे कोटेशन प्रविण प्लॅस्टिक,मुंबई यांनी दिलेले आहे.मालाची क्वॉलीटी चांगली आहे. या उपरोक्त तुलनात्मक तक्त्यात बिछावत ,मुंबई ,जलाराम ट्रेडर्स,मुंबई, लक्ष्मीदास एन्टंरप्राईजेस,मुंबई यांचे मालाचे नमुने सर्वसाधारण असून त्यांची फूटतुट लवकर होईल असे दिसते. प्रविण प्लॅस्टिक,मुंबई यांचे दर आधिक आहेत.कारण माल चांगला व टिकाऊ आहे. (अनब्रेकेबल ) त्यांना पुरवठा आदेश देणेबाबत मा.विश्वस्त डॉ.एकनाथ गोंदकर यांनी सुचविले आहे.

त्यानुसार प्रविण प्लॅस्टिक,मुंबई यांना उपरोक्त मालाचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. **याकामी रुपये १,७२,७६९-५० खर्च आलेला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-प्रशासकीय अधिकारी,निवासस्थाने )

**विषय नं.४० संस्थान निवासस्थानांचा सेवाआकार वाढविणे बाबत**

**निर्णय क्र.३५६** सदरहू विषयाबाबत उपसमितीचे सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासकीय अधिकारी,निवासस्थाने)

**विषय नं.४१** **व्दारावती इमारतीतील खोल्यांकरीता लिंक कंपनीचे कुलपांचे खरेदीस आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत.**

**निर्णय क्र.३५७** व्दारावती इमारतीतील खोल्या भक्तांना निवासासाठी लवकरात लवकर उपलब्ध करुन देणेसाठी खोल्याकरीता लिंक कंपनीचे कुलपाचे खरेदी करणेकामी मा.व्यवस्थान समितीचे दिनांक ०३.०१.२००९ रोजीचे सभेमध्ये आयत्या वेळेचा विषय क्र.१० निर्णय क्र. ६९ .व्दारावती इमारतीसाठी आवश्यक असणारे साहित्य खरेदीकामी मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे व मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांचे समितीने मुंबई - नाशिक येथून समक्ष पहाणी करुन मालाचा नमूना पसंत करुन प्रचलित पध्दतीने खरेदी करणे बाबत अंतिम निर्णय घ्यावा असा झालेला आहे. त्या नुसार कोटेशन मागितले आहे. आलेले कोटेशन मा.डॉ.गोंदकर विश्वस्त यांचे समक्ष उघडणेत आलेले आहे. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ. न. | तपशिल | **गौतम प्लायवुड, कोपरगांव रुपये-पैसे** | आशाएजन्सीज कोपरगांव **रुपये-पैसे** | सौमय्या डिवेअर स्टोअर्स, नाशिक **रुपये-पैसे** | शिरोडे अण्ड, सन्स कोपरगांव **रुपये-पैसे** | मागणी नग | न्युनतम दर **रुपये-पैसे** | न्युनतम **एकुण रुपये** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | लिंक लॉंक, ६ लिव्हर, ३ चाव्या स्टिल बॉडी [ATOOT] | **११७-७५** | १३०-०० | २३८-०० | १३३-०० | ४०० | ११७-७५ | ४७,१००-०० |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यात गौतम प्लायवुड,कोपरगांव यांचे दर सर्वात कमी असल्याने गौतम प्लायवुड, कोपरगांव यांना उपरोक्त मालाचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. **यकामी रुपये ४७,१००-०० खर्च आलेला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-प्रशासकीय अधिकारी,निवासस्थाने )

**विषय नं.४२** **काशिको टूर्स ॲण्ड ट्रॅव्हल्सने येणाऱ्या प्रवाशांना व्ही.आय.पी.पास देणे बाबत**

**निर्णय क्र.३५८** श्री अरुण शिरोडे, काशिको टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स, नाशिक यांनी त्यांच्या दिनांक १४.०१.२००९ च्या पत्रान्वये, "मुंबई व पुणे या दोन शहरानंतर नाशिक शहर झपाटयाने वाढत असून ही अभिमानाची बाब आहे. केंद्र आणि राज्य शासनाबरोबरच गुंतवणुकदारांनीही नाशिक शहराचा होत असलेला विकास डोळयापुढे ठेवून त्यादृष्टीने शहरात लक्ष केंद्रीत केलेले आहे. भविष्यातील नाशिकचा विकासात्मक दृष्टीकोन लक्षात घेवून केंद्रीय नागरी उड्डान मंत्री श्री प्रफुल्ल पटेल यांनी किंग फिशर या हवाई वाहतूक कंपनीच्या सहकार्याने मुंबई ते नाशिक व परत मुंबई अशी हवाई सेवा सुरु करण्याच्या दृष्टीने तयारी सुरु केलेली आहे. ही बाब लक्षात घेवून जास्तीत जास्त प्रवाशांना या विमान सेवेकडे आकर्षित करणेसाठी इतर सर्व विभागांची या हवाई सेवेव्दारे आलेल्या प्रवाशांना कोणकोणत्या आणि काय सुविधा देण्यात येतील याची माहिती सदर कंपनी गोळा करीत असून त्याअनुषंगाने माहितीपत्रक तयार करीत आहेत. ते फक्त नाशिक आणि परिसरातील व्यवसायांना मदतीचे ठरणार नसून शासकीय कार्यालये व कार्पोरेट हाऊसेसलाही सोईस्कर होणार आहे.

त्याअनुषंगाने किंग फिशर शिर्डी दर्शन पॅकेज तयार करीत आहे. किंग फिशर एअरलाईन्सचे नाशिक विभागाचे सहकारी म्हणून आम्ही काम करणार आहोत. आपणास विनंती करीतो की आपण साईभक्तांसाठी किंग फिशर कंपनीने जे पॅकेज तयार केले त्याचा अभ्यास करावा. यामध्ये आम्ही अशी विनंती करीतो की या हवाई सेवेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना शिर्डीला थेट दर्शनासाठी व्हि.आय.पी पास देण्याची सुविधा उपलब्ध करुन दयावी. आम्हाला खात्री आहे की किंग फिशर एअरलाईन्सने आखलेली ही कल्पना साकारण्यासाठी आपण सहकार्य केले तर याचा प्रचार देशभर होवून त्याचा फायदा देशभरातील साईभक्तांनाही होईल. तरी किंग फिशर कंपनीने मुंबई ते नाशिक जाणाऱ्या व येणाऱ्या प्रवाशांसाठी साईबाबांच्या प्राधान्याने दर्शनाचा जो आराखडा तयार केला त्याचा आपण विचार करावा ही विनंती, " असे कळविलेले आहे.

श्री साईबाबा संस्थानकडून आजतागायत कोणत्याही टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्सला अशा प्रकारची सुविधा देण्यात आलेली नाही. याबाबत कुठलाही धोरणात्मक निर्णय आतापर्यंत झालेला नाही. सध्या हेलिकॉप्टर सेवेव्दारे येणारे साईभक्तही काही चार्जेस घेवून व्हि.आय.पी पासची व्यवस्था करावी अशी मागणी करतात.

**तरी उपरोक्तबाबत धोरणात्मक निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो अमान्य करण्यात आला.** (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

**विषय नं.४३** **संस्थान प्रकाशित पुस्तकांचे लेखकांना प्रती भेट देणेबाबत**

**निर्णय क्र.३५९** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी द्वारा प्रकाशित होणा-या पुस्तकांच्या प्रकाशनांचे लेखकांकडून त्यांचे पुस्तकांचे प्रकाशना संबंधीचे अधिकार संस्थानला प्रदान करण्यात आल्याने पुस्तकांचे प्रकाशन करण्यात येते. हक्क प्रदान करतांना लेखक सुरुवातीस आम्हास कुठलेही मानधन, रायलटी अथवा त्या मोबदल्यात पुस्तके नको आहेत. आमचे पुस्तके संस्थानने प्रकाशित करावे, ही इच्छा प्रकट करतात.

पुस्तकांचे प्रकाशन झाल्यानंतर ते संस्थानला पत्र देतात की, माझे नातेवाईक, गुरुजन वर्ग, किंवा त्यांचे तेथील साई मंदिर यांना भेट म्हणून देणेकामी विनामुल्य पुस्तकांची मागणी करतात. म्हणजेच त्यांनी रकमेची मागणी न करता रक्कमरुपी पुस्तकांची मागणी करतात. काही लेखक तर प्रत्येक आवृत्तीच्या प्रतींची मागणी करतात. त्यामुळे प्रत्येक वेळेस कोणी १०० प्रती, ५१ प्रती, ११ प्रती,५ प्रती अशा स्वरुपाचा प्रस्ताव सादर करावा लागतो, त्यात बराच वेळ वाया जातो. त्यामुळे निर्णय घेणे अडचणीचे होते.

करीता ज्या लेखकांकडून पुस्तकांचे हक्क प्रदान केलेनंतर प्रथम आवृत्तीचे ११/५१/१०१ प्रती भेट देणेबाबत समयोचित निर्णय घेता येईल, तदनंतर पुढील आवृत्यांची ते हयात असे पर्यंत ५ प्रती प्रत्येक वेळी भेट देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन ज्या लेखकांकडून पुस्तकांचे हक्क प्रदान केलेनंतर प्रथम आवृत्तीचे ५१ प्रती भेट देण्यात याव्यात, तदनंतर पुढील आवृत्यांची ते हयात असे पर्यंत ५ प्रती प्रत्येक वेळी भेट म्हणून देण्यात याव्यात असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

**विषय नं.४४ प.पुं.श्री श्री रविशंकर यांच्या महासत्संगासाठी झालेल्या खर्चाबाबत.**

**निर्णय क्र.३६०** उपरोक्त विषयानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) , मार्फत दि. १६/०९/२००८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ७३८ अन्वये श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री.श्री. रविशंकर, आर्ट ऑफ लिव्हींगचे प्रणेते यांच्या शिबीराचे आयोजन करणेस तत्वत: मान्यता मिळालेली होती. दि.०३/०१/२००९ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.६६ (अ व ब) अन्वये प.पु.श्री श्री रविशंकर यांचे दि.१३/०१/२००९ रोजी सायं. ०४.०० ते ०७.०० यावेळेत महासत्संग व इतर आयोजित कार्यक्रमासाठी करावयाच्या विविध अनुषंगिक व तत्सम कामांसाठी येणा-या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आलेली होती.

त्यानुसार महासत्संग कार्यक्रमासाठी खालीलप्रमाणे एकूण रुपये १४,८९,०५७.०० खर्च आलेला असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

| अ.नं. | तपशील | खर्च रक्कम |
|---|---|---|
| ०१. | मंडप, कमानी व स्टेज (डेकोरेशनसह) | १०,७२,०७९.०० |
| ०२. | कलाकार बिदागी | ११,२१०.०० |
| ०३. | निमंत्रण पत्रिका व जाहिरात | १,४३,३०२.०० |
| ०४. | प्रवास खर्च | १,५९,१४९.०० |
| ०५. | इतर खर्च (शॉल व गेस्ट हाऊस इ.) | १,०३,३१७.०० |
| | एकूण खर्च | **१४,८९,०५७.००** |

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

**विषय नं.४५ संस्थान सेवेत कायम करणेबाबत.**

**निर्णय क्र.३६१** श्री.विठ्ठल शांताराम राशिनकर, हे श्री साईबाबा हॉस्पीटलकडे परिचारक या पदावर सेवेत होते. सेवेत असतांना दि.१३/०७/२००६ रोजी अपघाती निधन झाल्याने त्यांचे जागी मयत अनुकंपा कारणात्सव त्यांची वारसदार पत्नी नामे श्रीमती चंद्रकला विठ्ठल राशिनकर, यांची संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटलकडे जा.नं.एसएसएस/वशी-०१/७०४/२००७ दि.२९/०३/२००७ अन्वये वर्ग-०४ चे पदावर एक वर्ष कालावधी साठी प्रति महा रु.२०००/- एकत्रित नियत वेतनावर नेमणूक करण्यात आलेली होती.

सदर एक वर्षाचा परिवीक्षाधीन कालावधी समाधान कारक पूर्ण केल्यानंतर त्यांना दि.०३/०४/२००८ पासून प्रति महा रु.२५००/- नियत वेतन आदा करण्यात येत आहे.त्यांचा परिवीक्षाधीन कालावधी खाली त्यांचे नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे संपुष्ठात येत आहे.

| अ. नं. | कर्मचा-याचे नांव | शिक्षण | नेमणूक तारीख | परिवीक्षाधीन कालावधी संपुष्ठात येत असल्याची तारीख | वैद्यकिय अधिक्षिका यांचे वैद्यकियदृष्टया पात्र असलेबाबतचे प्रमाणपत्र |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्रीमती चंद्रकला विठ्ठल राशिनकर वर्ग-४ कर्मचारी श्री साईबाबा हॉस्पीटल | इ.१० वी पास | ०३/०४/२००७ | ०२/०४/२००९ | दि.०७/०३/२००९ |

"श्रीमती चंद्रकला विठ्ठल राशिनकर यांचे काम व वर्तणूक ठिक आहे त्या हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात. त्याबाबतीत काही प्रकरणे चालू अथवा प्रस्तावीत नाही. त्यांना वेतनश्रेणी द्यावी व संस्थान नियमाप्रमाणे वर्ग-०४ कर्मचारी या पदावर संस्थान सेवेत कायम करणे बाबत निर्णय व्हावा"असे अभिप्राय वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी दिले आहे.

श्रीमती चंद्रकला राशिनकर, वर्ग-०४ कर्मचारी श्री साईबाबा हॉस्पीटल यांचेबाबत वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांचे अभिप्राय विचारात घेता त्यांना **दि.०३/०४/२००९ पासून वर्ग-०४ चे पदाची वेतनश्रेणी रु.२५५०-५५-२६६०-६०-३२०० देऊन संस्थान सेवेत कायम करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.४६** **कु.वर्षा भगवान हातांगळे यांना अनुकंपा कारणास्तव संस्थान सेवेत घेणे बाबत**

**निर्णय क्र.३६२** श्री.भगवान साहेबराव हातांगळे हे संस्थानचे बगीचा विभागाकडे मदतनीस या पदावर सेवेत असतांना त्यांचे दि.०५/१२/२००५ रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालीलप्रमाणेः-

१. **दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव** :- कै.भगवान साहेबराव हातांगळे
२. **मृत्युचे वेळी हुद्या व विभाग** :- मदतनीस, बगीचा विभाग
३. **संस्थानमधील सेवेचा कालावधी** :- दि.०६/०३/१९८९ ते दि.०४/१२/२००५
एकूण सेवा १६ वर्षे ९ महिने
४. **मृत्यु दिनांक** :- ०५/१२/२००५

दिवंगत हातांगळे यांची मुलगी नामे कु.वर्षा भगवान हातांगळे यांनी संस्थानमध्ये वडीलांचे जागी अनुकंपा तत्वावर सेवेत घेणेबाबत अर्ज केला असून त्यांचे बाबत माहिती खालीलप्रमाणे -

०१. अर्जदाराचे नांव :- कु.वर्षा भगवान हातांगळे
०२. मयत कर्मचाऱ्याशी नाते :- मुलगी
०३. जन्मतारीख व वय :- दि.३१/१०/१९९० (वय वर्षे १८ वर्षे ०४ महिने)
०४. शैक्षणिक व शारीरीक पात्रता :- इयत्ता ५ वी

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपाकारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे. त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपा कारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे. शासन निर्णय अकंपा १०९५/प्र.क्र.३४/आठ मंत्रालय, दि.११/०९/१९९६ नुसार "सेवेत असतांना दिवेगत झालेल्या किंवा दुर्धर व्याधीमुळे अकाली सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटूंबातील अज्ञान वारसदाराच्या बाबतीत एकाने सज्ञान म्हणजे १८ वर्षाचा झाल्यावर एक वर्षाचे आत या योजनेखाली नोकरीसाठी अर्ज करावा" असे नमूद केलेले आहे. त्यानुसार कु.वर्षा भगवान हातांगळे यांची जन्मतारीख ३१/१०/१९९० असल्याने त्यांना दि.३१/१०/२००८ रोजी १८ वर्ष पूर्ण झालेले आहे व त्यांनी अनुकंपा तत्वावर संस्थान सेवेत घेणेकामी दि.०२/०३/२००९ रोजी म्हणजे ०१ वर्षाचे आत नोकरीसाठी विनंती अर्ज सादर केलेला आहे.

कु.वर्षा भगवान हातांगळे यांना संस्थानमध्ये वडीलाचे जागेवर घेणेबाबत आमची काहीही हरकत नसल्याबाबत तिच्या बहिनी १) सारीका हातांगळे व २) मनिषा हातांगळे यांनी मे.तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो.राहाता यांचे समोर दि.०४/०३/२००९ रोजी करुन दिलेले प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे.

तरी दिवंगत भगवान साहेबराव हातांगळे यांची मुलगी नामे कु.वर्षा भगवान हातांगळे ह्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार पात्र ठरत असल्याने त्यांना **मानवतेच्या दृष्टीकोनातून त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार अनुकंपा तत्वावर वर्ग-४ चे पदावर नेमणूक देणेस मान्यता प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.४७** **अ) श्रीसाईबाबा इंग्लिश स्कुलमधील रिक्त पदे भरणेबाबत.**

**निर्णय क्र.३६३** **अ)** श्री साईबाबा संस्थान संचलित श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये ज्यु.केजी ते इ.१०वी पर्यंतचे वर्ग चालविले जातात. चालू शैक्षणिक वर्षात ज्यु.केजीच्या ५ तुकडया व सि.के.जी.च्या ३ तुकडया अशा एकूण केजी विभागाच्या ०८ तुकडया आहेत. पैकी ४ तुकडयांकरीता ४ सहा.शिक्षिका कायम कर्मचारी सध्या शाळेकडे आहेत. उर्वरित ४ तुकडयांकरीता कुशल कंत्राटी कर्मचारी नेमलेले आहेत. केजी विभागाकडे एकत्रित रु.२५००/- मानधनावर ०४ शिक्षण सेवक (स्त्री कर्मचारी) नेमणूक करावयाचे आहेत. शासनाकडे केजी विभागाकरीता वेतनश्रेणीबाबतचा कुठलाही जी.आर. उपलब्ध नसल्याकारणाने आपण सदरच्या नियुक्त्या रु.२५००/- मानधनावर करत आहोत. त्याकरीता केली विभागाकडे खालील तक्त्यात नमूद केलेप्रमाणे शिक्षिकांची रिक्त पदे तातडीने भरणे आवश्यक आहेत.

| अ.नं. | पदाचे नाव | इयत्ता | रिक्तपद संख्या | शैक्षणिक पात्रता | अनुभव | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पुर्व प्राथमिक शिक्षक/ शिक्षणसेवक | ज्यु.केजी/ सि.केजी | ०४ | पदवीधर मॉन्टेसरी (इंग्रजी माध्यम) | २ वर्षे | २५००/- एकत्रित मानधन |

तरी **वरील शिक्षकांची रिक्तपदे भरणेकामी प्रचलित पध्दतीने वर्तमानपत्रात जाहीरात देऊन समक्ष मुलाखतीद्वारे नेमणूक करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**ब) श्रीसाईबाबा कन्या विद्या मंदीर व कनिष्ठ महाविद्यालयामधील रिक्त पदे भरणेबाबत.**

श्रीसाईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या माध्यमिक विभागाकडे इयत्ता सातवी ते दहावी पर्यंतच्या वर्गांना इंग्रजी विषयाचे अध्यापन करण्यासाठी श्री.अरुण बाबुराव घोडके सहा.शिक्षक

या पदावर कार्यरत होते. कन्या विद्या मंदिर या विभागाकडील ३४ तासिकांचा कार्यभार श्री.घोडके यांना देण्यात आलेला होता. परंतू जा.क्र एसएसएस/वशी-०१/३४१२/०८दिनांक १३/११/२००८ अन्वये श्रीसाईबाबा कनिष्ठ महाविद्यालय या विभागाकडे सहा.शिक्षक इंग्रजी अर्धवेळ पर्यावरण अर्धवेळ या पदावर नेमणूक देण्यात आलेली असल्याने माध्यमिक विभागाकडील पद रिक्त झालेले आहे. सदर रिक्त पदावर जा.नं.एसएसएस/वशी-०१/१८०५२/२००८ दिनांक ०९/१२/२००८ अन्वये २००८-०९ शैक्षणिक वर्षांच्या उर्वरित कालावधीसाठी दिनांक ३०/०४/२००९ अखेर श्रीमती.लबडे उज्वला भागचंद यांना "कंत्राटी शिक्षण सेवक (माध्यमिक विषय-इंग्रजी)' रु:- ४,०००/-मानधनावर तात्पुरती नेमणूक करण्यात आलेली आहे.

माध्यमिक विभाग ८ ते १० गटासाठी माध्यमिक शाळा संहितेनूसार १.५ प्रमाणे सहा वर्ग तुकडयांसाठी एकूण ०९ पदे मान्य होतात. यामध्ये खालीलप्रमाणे शिक्षक कार्यरत आहेत.

| अ.न. | शिक्षकाचे नाव | पदनाम | कायम कर्मचारी | जात संवर्ग |
|---|---|---|---|---|
| ०१ | सौ.एन.बी.चव्हाणके | प्राचार्या | ०१ | (ओपन) |
| ०२ | श्री.बी.के.वाणी | सहा.शिक्षक | ०१ | (ओपन) |
| ०३ | श्री.जी.व्ही.वरघुडे | सहा.शिक्षक | ०१ | (ओपन) |
| ०४ | श्रीमती.मिरजकर | सहा.शिक्षिका | ०१ | (ओपन) |
| ०५ | श्री.व्ही.के.वाणी | सहा.शिक्षक | ०१ | (ओपन) |
| ०६ | श्री.एस.ए.बाबर | सहा.शिक्षक | ०१ | (ओपन) |
| ०७ | श्री.एस.एन.खैरनार | सहा.शिक्षक | ०१ | ओ.बी.सी |

एकूण ०९ पदांपैकी ०७ पदांवर कायम शिक्षक कर्मचारी कार्यरत असुन

| अ.न. | शिक्षकाचे नाव | पदनाम | संख्या | जात संवर्ग |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती.स्वाती रामदास माने | शिक्षणसेवक (माध्यमिक)गणित | ०१ | अनुसुचित जाती (एस.सी) |

०१ पद श्रीमती.माने शिक्षणसेवक म्हणून जा.क्र.एसएसएस/वशी-०१/१३०१०/२००८ दि.०४/०९/ २००८ नूसार दि. ३०/०४/२०११ या तीन शैक्षणिक वर्षांच्या कालावधीसाठी नेमणूक केलेली आहे.

| अ.न. | शिक्षकाचे नाव | पदनाम | संख्या | जात संवर्ग |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती.लबडे उज्वला भागचंद | कंत्राटी शिक्षणसेवक (तात्पूरती) माध्यमिक विभाग -इंग्रजी | ०१ | (ओपन) |

श्रीमती.सरोदे कुंती ताराचंद हया बी.ए.एम.पी.एड (शारिरीक शिक्षण-मदतनीस) हया नियतवेतन रु ५,५००/-वर्ग-४ कर्मचारी आहेत.

प्राथमिक विभाग इयत्ता पाचवी ते सातवी गट-श्रीसाईबाबा कन्या विद्या मंदिर या विभागाकडे इयत्ता पाचवी ते सातवीच्या एकूण ०६ वर्ग तुकडया असुन प्रत्येक वर्ग तुकडीस १.३ प्रमाणे एकूण ७.८ म्हणजेच पूर्णांकित ८ पदे मंजूर होतात.

| अ.न. | शिक्षकाचे नाव | पदनाम | कायम कर्मचारी | जात संवर्ग |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.एन.एम.गाडेकर | सहा.शिक्षक | ०१ | (ओपन) |
| ०२ | श्री.आर.एस.पुंड | सहा.शिक्षक | ०१ | ओ.बी.सी |
| ०३ | श्रीमती.एस.आर.दुरुगकर | सहा.शिक्षिका | ०१ | (ओपन) |
| ०४ | श्रीमती.ए.ए.पवार | सहा.शिक्षिका | ०१ | (ओपन) |
| ०५ | श्रीमती.एम.सी.पांढरे | सहा.शिक्षिका | ०१ | ओ.बी.सी |
| ०६ | श्री.गायकवाड ए.आर. | शिक्षणसेवक | ०१ | अनु.जाती |
| ०७ | श्री.चिंधे ताराचंद मुकिंदा | शिक्षणसेवक | ०१ | भटक्या जाती |

उपरोक्त नियमानुसार ०८ पदे आवश्यक असुन ०७ पदे भरलेली आहेत व ०१ पद रिक्त आहे. याशिवाय-

१) श्री.प्रभाकर रावसाहेब वाणी (एम.सी.एम विषय-माहितीत्तंत्रज्ञान) कंत्राटी कुशल कर्मचारी म्हणून सन २००४ पासून कार्यरत आहेत. सध्या त्यांना माहितीत्तंत्रज्ञान प्रयोगशाळेत काम दिलेले आहे.

२) श्रीमती.माधुरी माणिकराव भस्मे (बी.एस.सी.बीएड्) कंत्राटी कुशल कर्मचारी म्हणून सन २००७ पासून कार्यरत आहेत. सध्या त्यांना विज्ञान प्रयोगशाळेमध्ये प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून काम दिलेले आहे.

<u>उपरोक्तप्रमाणे कायम कर्मचारी शिक्षक जात संवर्ग संख्या याप्रमाणे १६+ ०१ = १७</u>

| जात सवर्ग | अनु.जाती (S C) | अनु.जमाती (S T) | विमुक्त व भटक्या जमाती (V J / NT) | इतर मागासवर्ग (O B C) | विशेष मागासवर्ग (S B C) | बिगर मागास (OPEN) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आरक्षण | | | | | | ०० | |
| भरलेली पदे | ०२ | ०० | ०१ | ०३ | ०० | १० | १६ |
| पद-आरक्षण | २.२१ | १.१९ | १.८७ | ३.२३ | ०.३४ | - | ८.८४ |
| अनुशेष | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | |

उपरोक्त जात संवर्ग तक्त्यानुसार अनुसुचित जमाती (ST) विमुक्त व भटक्या जमाती (VJ/ NT) जात संवर्गातील अनुशेष शिल्लक आहे.

तरी श्रीसाईबाबा कन्या विद्या मंदिर या विद्यालयासाठी खालील शिक्षक व शिक्षकेतर नेमणूका करणे आवश्यक आहे.

०१) माध्यमिक विभाग-इंग्रजी विषय पूर्णवेळ शिक्षक बी.ए.(इंग्लिश) बी.एड् रु.४०००/- मानधन शिक्षणसेवक ०१ पद, जात संवर्ग अनुसूचित जमाती (ST) किंवा विमुक्त व भटक्या जमाती (V J / NT) या जात संवर्गातील नेमता येईल.

०२) प्राथमिक विभाग-शिक्षणसेवक रु.३०००/- एच.एस.सी (विज्ञान) डीएड् ०१ पद , जात संवर्ग अनुसूचित जमाती (ST) किंवा विमुक्त व भटक्या जमाती (V J / NT) या जात संवर्गातील नेमता येईल.

०३) विज्ञान व माहिती तंत्रज्ञान प्रयोगशाळा सहाय्यक -बी.सी.एस/बी.एस्सी (कॉम्प्युटर सायन्स्) रु.३२००-४९००- ०१ पद नेमणूक करता येईल.

०४) कनिष्ठ लिपीक ३०५०-४५९० -०१ पद

(श्रीसाईबाबा कन्या विद्या मंदिर या विद्यालयामध्ये इयत्ता पाचवी ते दहावी सध्या ६०० विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत. माध्यमिक शाळा संहिता नियम क्र. ५७.५ पान क्र. ५५,५६ नुसार ५०० ते १५०० विद्यार्थी संख्येस प्रयोगशाळा सहाय्यकाचे ०१ पद व कनिष्ठ लिपीक ०१ पद निर्माण होते.)

तरी **उपरोक्त अ.क्र. १, २, ३ चे भरणेकामी प्रचलित पध्दतीने वर्तमानपत्रात जाहीरात देऊन समक्ष मुलाखतीद्वारे नेमणूक करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.४८** **ऑफिसर ऑन स्पेशल ड्युटी,श्री.एम.ए.लोहोकरे,मुंबई कार्यालय,यांना कंत्राटी पध्दतीने मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.३६४** श्री.एम.ए.लोहोकरे, कार्यालय प्रमुख तथा ऑफिसर ऑन स्पेशल डयुटी, मुंबई कार्यालय यांनी त्यांचे दि.२७/०२/२००९ रोजीचे अर्जान्वये दि.०१ जून २००९ पासून पुढील एक वर्ष कालावधीकरिता कंत्राटी पध्दतीने मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०८/२००५ रोजीचे सभेतील निर्णयानुसार संस्थान पत्रव्यवहार, शासकीय पत्रव्यवहार व विविध प्रस्तावावर शासकीय मान्यता मिळणेकामी पाठपुरावा करणे मराठी, हिंदी, इंग्रजी पत्रव्यवहार स्वतंत्ररित्या पहाणे कामी जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२१३३/२००७ दि.०१/०८/२००७ अन्वये श्री.एम.ई.लोहोकरे यांची संस्थानचे मुंबई कार्यालयात ११ महिन्यांसाठी प्रतिमहा रु.१५०००/- एकत्रित मानधनावर कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यात आलेली असून ते दि.०१/०८/२००७ रोजी मुंबई कार्यालयात कामावर हजर झालेले असून त्यानंतर त्यांना दि.०१/०७/२००८ पासून पुढे ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच त्यांचेकडे मुंबई कार्यालय प्रमुखाचे काम देणेत आलेले आहे.

श्री.लोहोकरे यांचा ११ महिन्यांचा कालावधी दि.३१/०५/२००९ अखेर संपुष्ठात येत आहे. श्री.लोहकरे यांचेमार्फत शासकीय पत्रव्यवहार, शासनाकडे पाठविण्यात आलेले प्रस्ताव प्रकरणे याबाबत पाठपुरावा करणेत येतो. तसेच मा.अध्यक्ष साहेब, मा.श्री.विखे साहेब व मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे मंत्रालय, मुंबई भेटीचे वेळी आवश्यक माहितीसह श्री.लोहोकरे हजर असतात.

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता **श्री.लोहोकरे यांना पुढील एक वर्ष कालावधीकरीता सध्याच्याच शर्ती-अटीवर मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.४९** **डॉ.चंद्रशेखर एस.बोबडे, वैद्यकीय संचालक यांचे मुदतवाढीबाबत**

**निर्णय क्र.३६५** डॉ.चंद्रशेखर एस.बोबडे यांची जा.नं.एसएसएस वशी-०१/४३३८/२००८ दि.२४/०३/२००८ अन्वये संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये वैद्यकीय संचालक या पदावर रु.७०,०००/- (अक्षरी रु. सत्तर हजार) मात्र एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आली होती त्यानुसार ते दि.०७/०४/२००८ रोजी कामावर हजर असून सदरचा कालावधी दि.०६/०४/२००९ रोजी संपुष्ठात येत आहे.

प्रशासकीय अधिकारी रुग्णालये यांनी "श्री बोबडे वैद्यकीय संचालक यांचे विरुध्द काही प्रकरणे नाहीत ते चांगल्या प्रकारे काम करतात. सध्या आपणाकडे वाढता कामाचा व्याप लक्षात घेता आपणाकडे पर्यायी वैद्यकीय संचालक उपलब्ध होई पर्यंत मुदतवाढ द्यावी." असे अभिप्राय दिलेले आहे.

प्रशासकीय अधिकारी रुग्णालये यांचे उपरोक्त अभिप्राय विचारात घेता डॉ.बोबडे यांच्या जागी नव्याने वैद्यकीय संचालक उपलब्ध होई पर्यंतच्या किंवा एक वर्ष या दोहोपैकी जी क्रि या अगोदर घडेल त्या कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.चंद्रशेखर एस.बोबडे यांना पूर्वीचेच अटी-शर्तीवर एक वर्ष कालावधीसाठी वैद्यकीय संचालक या पदावर मुदतवाढ देण्यात यावी,असें ठरलें.**

(कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना विभाग)

**विषय नं.५०** **श्री रामराव रंभाजी शेळके, अधिक्षक यांचे सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३६६** उपरोक्त विषयांकीत कामी श्री रामराव रंभाजी शेळके,अधिक्षक कॅन्टीन विभाग यांनी दि.३१/०१/२००९ रोजी विनंती अर्ज सादर केला असून त्यात," मला दि.२२/११/२००८ रोजी रु.५५००-१७५-९००० या वेतनश्रेणीवर अधिक्षक वरिष्ठ पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे.परंतु मागील बोर्डाने दि.०२/०८/२००४ रोजी कैलास खराडे, श्री उत्तम गोंदकर व इतर हे माझेपेक्षा ज्युनियर असतांना त्यांना अधिक्षक वरिष्ठ पदावर पदोन्नती दिलेली आहे.मी त्यांना सिनियर आहे. मला अधिक्षक हे पद त्यांचे अगोदर मिळावयास पाहिजे होते ते उशिरातउशिरा म्हणजे दि.१८/१०/२००८ रोजी मिळाले.त्यांचे प्रमाणेच मलाही दिनांक ०२/०८/२००४ पासून अधिक्षक पदाचा नेमणूकीचा आदेश व्हावा. मला मागील रक्कमेचा फरक देण्यात येवू नये मात्र सेवाजेष्ठतेप्रमाणे दिनांक ०२/०८/२००४ पासून माझी नेमणूक अधिक्षक वरिष्ठ पदावर व श्रेणीवर व्हावी." अशी विनंती केलेली आहे.

श्री रामराव रंभाजी शेळके यांचा संस्थान सेवेचा तपशील खालील प्रमाणे-

**शिक्षण :-** बी.ए.

**संस्थान सेवेत हजर तारीख :-** ०१/११/१९७५

**नेमणूकीच्या वेळेचे पदनांम :-** मदतनीस

**पदोन्नतीचा तपशील :-**
०१. दि.०१/०१/१९७९ लिपीक टंकलेखक
०२. दि.२९/०८/१९८४ वरिष्ठ लिपीक / क.पर्यवेक्षक
०३. दि.०१/०९/१९९६ कालबध्द पदोन्नती साखळीतील वरच्या पदावरील वेतनश्रेणी
०४. दि.०१/०८/१९९९ रोजी रु.५०००-१५०-८००० या वेतनश्रेणीवर पदोन्नतीने नेमणूक

**संस्थानमध्ये झालेली एकूण सेवा :-** ३३ वर्षे

श्री रा.रं.शेळके यांनी अर्जात नमूद केलेल्या श्री खराडे व गोंदकर यांचेबाबत सविस्तर महिती खालील प्रमाणे-

गत मा.व्यवस्थापन समितीने एप्रिल २००४ मध्ये वर्तमानपत्रात जाहीरात देवून वरिष्ठ मुख्य अभियंता, अधिक्षक, वरिष्ठ लेखापाल, तांत्रिक सहाय्यक इ. पदांसाठी अर्ज मागणी करुन पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी मुलाखत पत्रे देण्यात आली होती त्यास अनुसरुन संस्थान आस्थापनेवरील पात्र उमेदवारांनाही जाहिरातीप्रमाणे त्यांची शैक्षणिक पात्रता विचारात घेवून मुलाखतीस आमंत्रीत करण्यात येवून सदरहू उमेदवारांच्या दि.०१/०८/२००४ रोजी मा.व्यवस्थापन मंडळाने मुलाखती घेवून सदर पदांसाठी गुणवत्ता क्रमानुसार निवड करण्यात येवून त्यानुसार सदर उमेदवारांना (श्री खराडे, गोंदकर, बोरावके, साबळे, उगले वगैरे) नेमणूक आदेश देण्यात आलेले आहेत.

सदर पदांसाठी संस्थान सेवेतील पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावण्यात आले होते त्यावेळी श्री रा.रं.शेळके यांनाही मुलाखतीसाठी बोलावण्यात आलेले होते, तथापी श्री रामराव शेळके हे मुलाखतीसाठी हजर राहीले नव्हते, त्यामुळे सदर पदावर त्यांना त्यावेळी नेमणूक देण्यात आलेली नाही.

मुलाखतीसाठी हजर असलेल्या पात्र उमेदवारांमधून सेवाजेष्ठता विचारात न घेता शैक्षणिक अर्हता व मुलाखत यांचा विचार करुन नेमणूका देण्यात आलेल्या आहेत त्यामुळे **श्री रा.रं.शेळके यांची मागणी योग्य वाटत नाही, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो मान्य करण्यात आला.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.५१ पोस्ट रिकरिंग डिपॉझिट वरील पोष्टाचे कमिशन मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३६७** मा.व्यवस्थापन समिती दि.०८/०२/२००९ रोजीचे सभेतील निर्णयानुसार जा.नं.एसएसएस/वशी-०१/४६३/२००९ दि.११/०२/२००९ अन्वये पोस्ट रिकरींग डिपॉझिटवरील कमीशन कर्मचारी कल्याण निधीमध्ये जमा करणेबाबत आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

पगारबील तयार करणार व तपासणीस यांनी त्यांचे १८/०२/२००९ रोजीचे अर्जामध्ये भारत सरकारच्या Payroll Saving Scheme मध्ये खालीलप्रमाणे नियम आहेत.

Commission payable to Cashier / Disbursing Officer

The Cashier or other disbursing officer will be remunerated by a commission for undertaking the work of effecting recoveries and thereafter depositing them in the post office.

उपरोक्त सरकारी नियम विचारात घेऊन श्री साईबाबा संस्थानने प्रादेशीक संचालक राष्ट्रीय बचत पुणे यांचेकडून पोस्ट रिकरींग वसुलीबाबतचा देण्यात येणारा मेहनताना लेखाशाखेतील तपासनीस व प्रशासन शाखेतील दोन लिपीक यांना जा.क्र.एसएसएस/वशी-लेखा/८५१०/९२ दि.१९/०८/१९९२ च्या आदेशानुसार सम प्रमाणात विभागून देण्यात येत होता.

फेर निर्णयासाठी अर्जदार यांनी सदरचा मेहनताना सुरु रहाणेबाबत तसेच माहे जानेवारी-२००९ चे मेहनतानाची रक्कम रु.३७६१/- पुढील आदेश होईपावेतो Suspense A/c खाती जमा ठेवणेबाबत विनंती केली आहे.

भारत सरकारच्या पे रोल सेव्हिंग स्किमच्या नियमात पगारपत्रके तयार करणाऱ्याच कर्मचाऱ्यास पोस्ट रिकरींगचे अतिरिक्त कामाबाबत मेहनताना देण्याची तरतूद आहे.

तरी सदर नियम तसेच संस्थानकडील जा.क्र.एसएसएस/वशी-लेखा/८५१०/९२ दि.१९/०८/१९९२ पासून भारत सरकारच्या पोस्ट विभागाकडून पगार पत्रक तयार व तपासणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांस **पोस्ट रिकरींगचे कपातीचे व तत्ससंबंधीत अतिरिक्त कामाबाबत मेहनताना दिला जात आहे तो पूर्वीप्रमाणे देण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेचे विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा विषय नं.०१** **शिर्डी कनकुरी-डो-हाळे गावांकरीता रस्त्यावर पथदिवे उभारणी करणेकामी प्राप्त झालेली टेंडर्स उघडून टेंडरधारकांशी वाटाघाटी/चर्चा करुन निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.३६८** शिर्डी कनकुरी-डो-हाळे गावांकरीता रस्त्यावर पथदिवे उभारणी करणेकामी येणा-या रक्कम रु.५८,१६,८८८/- इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.११-०८-२००७ चे सभेतील विषय क्र.१३ निर्णय क्र.६९५ अन्वये मान्य करण्यात आला आहे. या कामासाठी येणा-या खर्चास व याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागवावेत असा निर्णय झालेला होता. शासन मान्यतेनंतर वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. दि.१८-०३-२००९ ते दि.३१-०३-२००९ असा टेंडर विक्री कालावधी ठेवण्यात आला होता. टेंडर सादर करण्याची मुदत दि.०१-०४-२००९ अखेर अशी ठेवण्यात आली होती. त्यानुसार शिर्डी कार्यालयातून एकुण ०७ टेंडरची विक्री झाली असून ०७ टेंडर प्राप्त झाले आहेत. तसेच मुंबई कार्यालयातून ०९ टेंडरची विक्री झाली असून ०२ टेंडर प्राप्त झाले आहेत. असे एकुण ०९ टेंडर प्राप्त झाले आहेत.टेंडर तपशील खालीलप्रमाणे :-

**(अ) शिर्डी कार्यालयात प्राप्त झालेले टेंडर :-**

| अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.आदिती इलेक्ट्रिकल्स्, नाशिक |
| ०२ | मे.बडगुजर ॲण्ड कंपनी, नाशिक. |
| ०३ | मे.भोळे इलेक्ट्रिकल्स्, नाशिक |
| ०४ | मे.न्यु-टेक, नागपूर |
| ०५ | मे.विजय इलेक्ट्रीकल ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, शिर्डी |
| ०६ | मे.नितीन इलेक्ट्रिकल्स्, औरंगाबाद |
| ०७ | मे.एम.डी.एस.कंपनी, नाशिक |

**(ब) मुंबई कार्यालयाकडून प्राप्त झालेले टेंडर :-**

| | |
|---|---|
| ०८ | मे. रमेश इलेक्ट्रिकल ॲण्ड मेकॅनिकल वर्क्स,मुंबई |
| ०९ | मे. अवेश इलेक्ट्रिकल्स्, डोंबिवली (प.), मुंबई |

उपरोक्तप्रमाणे शिर्डी कनकुरी-डो-हाळे गावांकरीता रस्त्यावर पथदिवे उभारणी करणेकामी प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | पार्टीचे नांव | निविदेतील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मे. रमेश इलेक्ट्रिकल ॲण्ड मेकॅनिकल वर्क्स,मुंबई | ४८,४३,७४०.०० | ४७,००,०००.०० |
| ०२ | मे. अवेश इलेक्ट्रिकल्स्, डोंबिवली (प.), मुंबई | ८२,८२,३३४.०० | ८१,३२,३३४.०० |
| ०३ | मे.न्यु-टेक, नागपूर | ५४,७१,७७७.०० | ४१,९०,०००.०० |
| ०४ | मे.बडगुजर ॲण्ड कंपनी, नाशिक. | ४४,६८,९६५.०० | ४०,००,०००.०० |
| ०५ | मे.नितीन इलेक्ट्रिकल्स्, औरंगाबाद | ५१,२८,९१५.०० | ४६,००,०००.०० |
| ०६ | मे.आदिती इलेक्ट्रिकल्स्, नाशिक | ४६,३५,००८.०० | ४४,००,०००.०० |
| ०७ | मे.एम.डी.एस.कंपनी, नाशिक | ५१,९४,२९६.०० | ४९,४४,२९६.०० |
| ०८ | मे.भोळे इलेक्ट्रिकल्स्, नाशिक | ५१,५७,९९१.०० | ४३,५०,०००.०० |
| ०९ | मे.विजय इलेक्ट्रीकल ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, शिर्डी | ५४,३५,८४४.०० | ३९,५०,०००.०० |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.विजय इलेक्ट्रीकल ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, शिर्डी यांचे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा विषय नं.०२** **संस्थान रुग्णालयांसाठी लॉण्ड्री शेडचे बांधकामाबाबत .**

**निर्णय क्र.३६९** संस्थानचे रुग्णालयांकरीता स्वतंत्र लॉण्ड्री तयार करणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि. १०/०१/२००८ रोजीचे सभेत निर्णय क्र. ३१ अन्वये मान्यता मिळाली आहे. रुग्णालय विभागाचे मागणी नुसार २० फुट x ३० फुट साईजचे शेड बांधणेसाठी इकडील विभागामार्फत अंदाजपत्रक बनवून निविदा मागविणेत आल्या होत्या. मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०६/०९/२००८ रोजीचे सभेत ठेकेदार मे. एस. एन गुंजेगांवकर यांची

रक्कम रुपये ३,१७,५३५.०० मात्रची निम्नतम निविदा स्विकारुन यांना लॉण्ड्री शेड उभारणे कामाचा कार्यादेश देण्यास मान्यता मिळाली. त्यानुसार जा.क्र. १३४४८ दि. १३/०९/२००८ अन्वये मे. एन. एस. गुंजेगावकर यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे.

मा. वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी त्यांचे दि. १७/०९/२००८ रोजीचे पत्राने लॉण्ड्री शेडचे बांधकाम तुर्तास स्थगित ठेवावे असे कळविले होते. त्यानुसार सदरचे काम स्थगित ठेवण्यात आले आहे. मा. वैद्यकीय संचालक यांनी त्यांचे दि. १४/११/२००८ रोजीचे पत्राने लॉण्ड्री उभारणेकामी सुधारीत नकाशा दिला आहे. तसेच साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील बाजूस सदरची लॉण्ड्री शेड उभारणेस कळविले आहे.

सुधारीत नकाशानुसार (४५'x२२' मापाचे ) लॉण्ड्री शेड उभारणेकामी अंदाजे रक्कम रुपये ४,६८,२९१.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे. यासाठी मूळ मान्यतेपेक्षा रक्कम रुपये १,५०,७५६.०० मात्र अधिक खर्च लागणार आहे.

मा. वैद्यकिय संचालक यांनी साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील मोकळ्या जागेत लॉण्ड्री शेड उभारणे बाबत सूचविले आहे. परंतू सदरच्या जागेत साईभक्तांसाठी नविन तिन खोल्या असलेली सदनीका भक्तनिवास इमारत बांधण्याचे मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०८/०३/२००९ रोजीचे सभेत ठरले आहे. तेथे साईभक्तांसाठी भक्तनिवास इमारतीचे काम हाती घेणे प्रस्तावीत असल्याने तेथे लॉण्ड्री शेड बनविता येणार नाही. करीता लॉण्ड्री शेड साईनगर कर्मचारी वसाहतीचे दक्षिणेकडील श्री लोढा यांचेकडून घेतलेल्या जागेत करता येईल.

तरी वैद्यकीय संचालक यांनी दिलेल्या सुधारीत नकाशा प्रमाणे लॉण्ड्री शेडचे बांधकाम करणेसाठी ठेकेदार मे.एस.एन.गुंजेगांवकर यांना कार्यादेश देणेस तसेच याकामी येणारे वाढीव रक्कम **रुपये १,५०,७५७.०० मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत तसेच सदरहू लॉण्ड्री शेडचे बांधकाम सर्व्हे नं.१२५ मधील श्री लोढा यांचेकडून खरेदी केलेल्या जागेत करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०३** **नवीन बेंच खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.३७०** श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये ज्यु. केजीसाठी चालू शैक्षणिक वर्ष २००८-२००९ मध्ये एकूण २४२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. चालू वर्षी दोन ज्यु. केजी या वर्गाच्या वाढीव तुकडया सुरु करण्यात आलेल्या आहेत. पुढील वर्षीही सि. केजी या वर्गाच्या तुकडया वाढणार असल्याने लहान साईजचे बेंच खरेदी करावे लागणार आहेत. मागील वर्षी सागवानी टॉपसह, १६ गेज, सीआरसी पाईप फ्रेम असलेले १०० नग लहान साईज बेंच खरेदी करण्यात आलेले आहेत. केजीच्या या दोन्ही वर्गासाठी खालील तपशिलात नमुद केलेप्रमाणे तसेच सोबत बेंचचे आकृतीत दर्शविलेप्रमाणे १०० नग बेंचची आवश्यकता आहे.

| अ.नं. | तपशिल | मागणी | अंदाजे किंमत रुपये | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | केजी विभाग<br>लहान साईज बेंच | १०० नग | १९००/- | १,९०,०००/- |

केजी विभागातील लहान साईज बेंच (३ ते ४ वर्ष वयोगटासाठी) असून एका बेंचची अंदाजे किंमत रुपये १९००/- रुपये इतकी राहील. त्यासाठी अंदाजे रुपये १,९०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी **उपरोक्तप्रमाणे १०० नग बेंच कोटेशन्स मागवून खरेदी करण्यास व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,९०,०००/- खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्या,कन्या विद्या मंदिर/अधिक्षक,खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०४** **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान ते श्री साई प्रसादालय या अंतरात भक्तांसाठी स्कायवॉक सुविधा निर्माण करणेबाबत.**

**निर्णय क्र. ३७१** श्री साईंच्या दर्शनासाठी शिर्डी येथे येणाऱ्या साईभक्तांना निवास, प्रसाद भोजन, वैद्यकिय सेवा या सारख्या मुलभूत सेवा-सुविधा उपलब्ध व्हाव्यात यादृष्टीने श्री साई मंदिराच्या दक्षिणेस श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, शैक्षणिक संकुल, रुग्णालय, धर्मशाळा, कर्मचारी वसाहत तर उत्तरेस जुना प्रसादालय परिसर, नवीन श्री साई प्रसादालय परिसर विकसित करण्यात आलेले आहेत. तसेच भक्तनिवासस्थान परिसरानजीकच साईआश्रम भाग १ व श्री साई प्रसादालय परिसराजवळ साईआश्रम भाग २ या नियोजित भक्तनिवासस्थान प्रकल्पांचे बांधकाम प्रगतीपथावर आहेत. अस्तित्वात असणारे उपरोक्त सर्व विकास प्रकल्प संस्थान मालकीच्या जागेत असून, हा भाग अहमदनगर- मनमाड या राज्य महामार्गालगत आहे.

उपरोक्त सर्व परिसरात येणे-जाणेसाठी सध्या अहमदनगर - मनमाड या राजरस्त्याचा वापर भक्तांसह शिडी शहर व परिसरातील स्थानिक नागरीक करतात व करीत आहेत. वर्षातील सलग सुट्टयांच्या, उत्सवांच्या कालावधीतील भक्तांच्या गर्दीमुळे तसेच हा राज्यमार्ग महाराष्ट्रातील महत्वाच्या

शहरांसह देशातील इतर राज्यांनाही जोडणारा असल्याने या शिडीतून जाणाऱ्या सहा पदरी महामार्गावर लहान व जड वाहतूक मोठया प्रमाणावर असते. अशा विविध कारणांमुळे अहमदनगर - मनमाड मार्गावर नेहमी वाहतूक ठप्प होते, खोळंबते व याचा त्रास पायी चालणाऱ्या भक्तांसह सर्वसामान्य नागरीकांना होतो.

या सर्व बाबींचा विचार करुन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान / नियोजित साईआश्रम प्रकल्प भाग १ पासून ते श्री साई प्रसादालय / पोलिस स्टेशन पर्यन्त या अंतरात अहमदनगर - मनमाड रस्त्याच्या मध्यावर (सध्या असलेल्या दुभाजकांवर) स्कायवॉकची उभारणी केल्यास भक्तांसह सर्वसामान्य नागरीकांना ही याचा मोठा उपयोग होईल.

यादृष्टीने श्री साई प्रसादालयचे बांधकाम ठेकेदार मे. आय.व्ही.आर.सी.एल., पुणे यांचे प्रतिनिधींनी मा.अध्यक्षसाो. यांची मुंबई भेट घेऊन, सदरहू स्कायवॉक उभारणेबाबत चर्चा केली. सदरहू चर्चेत मा. अध्यक्षसाो. यांनी मे.आय.व्ही.आर.सी.एल.,पुणे यांच्या प्रतिनिधींना स्काय वॉकचा प्राथमिक प्रस्ताव तयार करुन, त्याबाबतचे संकल्पना चित्र करण्याविषयी सुचना केलेली होती. त्यानुसार संबंधीत कंपनीच्या तांत्रिक प्रतिनिधींनी शिर्डी येथे भेट देऊन रस्त्याची व जागेची पहाणी केलेली आहे. त्यानुसार संबंधीत कंपनीने प्राथमिक स्वरुपात आराखडा तयार केला आहे. मे.आय.व्ही.आर.सी.एल.पुणे यांचे प्रतिनिधी श्री भूषण साने यांनी आजचे सभेपूढे उपस्थित राहून स्कायवॉकच्या प्राथमिक आराखड्याचे स्पष्टीकरण केले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, **सध्या पहिल्या टप्प्यामध्ये बसस्थानक ते मंदिर परिसर व तेथून पूढे नवीन प्रसादालयापर्यन्त स्कायवॉक उभारणेबाबतचा प्रस्ताव तयार करणेत यावा. सदरहू काम खर्चिक स्वरुपाचे असल्याने ते बांधा -वापरा हस्तांतरीत करा (B.O.T) तत्वावर करणे शक्य आहे काय? याबाबत पडताळणी करण्यात यावी व तपशिलवार प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे यथावकाश सादर करणेत यावा असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०५** **श्री साईलिला नियतकालीकाचे अंक पाकिटे तयार करणेकामचे दरपत्रक उघडून निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र. ३७२** श्री साईलीला नियतकालीकाचे अंक पाकिटे तयार करणे कामाचे दरपत्रक पत्र जा.नं.एसएसएस/ वशी/प्रकाशने/ १९७९/ २००९, दि.१४.०२.२००९ अन्वये मुंबई येथील १६ निवडक प्रेसधारकांना पाठवून ते दि.०६.०३.२००९ अखेर भरुन जमा करणेविषयी कळविण्यात आले होते, त्यापैकी खालीलप्रमाणे ४ निवडक प्रेसधारकांचे सीलबंद दरपत्रक प्राप्त झाले आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|
| ०१ | मे.उचिता ग्राफिक प्रिंटर्स प्रा.लि., मुंबई |
| ०२ | मे.ओनस प्रिंट सोलुशन (इंडिया) प्रा.लि., मुंबई |
| ०३ | मे.न्यु राधारमण प्रिंटींग प्रेस, मुंबई |
| ०४ | मे.सेफ ऑफसेट प्रा.लि., मुंबई |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली दरपत्रके आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता प्रेसधारकांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव | कोटेशन्समध्ये देऊ केलेले दर | |
|---|---|---|---|
| | | श्रीसाईलीला मराठी अंक पाकीटे छपाई दर प्रती नग रुपये | श्रीसाईलीला इंग्रजी अंक पाकीटे छपाई दर प्रती नग रुपये |
| ०१ | मे.उचिता ग्राफिक प्रिंटर्स प्रा.लि., मुंबई | १.३५ | १.३५ |
| ०२ | मे.ओनस प्रिंट सोलुशन (इंडिया) प्रा.लि., मुंबई | ००.५३.५ | ००.५३.५ |
| ०३ | मे.न्यु राधारमण प्रिंटींग प्रेस, मुंबई | ००.९९ | ००.९४ |
| ०४ | मे.सेफ ऑफसेट प्रा.लि., मुंबई | **००.४९** | **००.४९** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.सेफ ऑफसेट प्रा.लि.मुंबई यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ०६** **आयडीया सेल्यूलर कंपनीकडून मोतीचूर लाडू प्रसादाकरीता प्रिंटेड प्लॉस्टिक पिशवी व कॅरीबॅग विनामूल्य घेणे व आयडीया कंपनीच्या इतर मागण्यांचा विचार होऊन निर्णय घेणे बाबत**

**निर्णय क्र.३७३** आयडीया सेल्सूलर कंपनी, पुणे यांनी दि. २३.०१.२००९ व दि. ०१.०४.२००९ चे प्रस्तावान्वये ०१ वर्षासाठी मोतीचूर लाडूप्रसाद पॅकींगच्या प्लास्टीक पिशव्या व प्लास्टीक कॅरी बॅग विनामुल्य पुरविणेस तयार असलेबाबत कळविलेले आहे. सदर प्लास्टीक पिशव्या व कॅरीबॅगवर संस्थानचा सध्याचा मजकूर प्रिंट करणार असून त्याशिवाय कंपनीची जाहिरात म्हणून आयडीया सेल्यूलर कंपनीचा लोगो प्रिंट करणार आहेत. त्याचप्रमाणे खालीलप्रमाणे ०१ ते ०८ मागण्या मान्य करणेबाबत विनंती केलेली आहे.

०१. प्रत्येक प्रसाद पॅकेट व कॅरी बॅगवर संस्थानचे सध्याचे विहित मजकुराशिवाय आयडीया कंपनीची जाहिरात (लोगो ) छापण्यात येईल (सोबतचे नमुन्याप्रमाणे)

०२ प्रति दिवशी ५०,००० लाडू पॅकेट्स व १५,००० कॅरी बॅगप्रमाणे पुरविणेस तयार आहेत प्रति ०३ महिन्याचा आगाऊ साठा पुरविणेत येईल. मात्र संस्थानचे गरजेनूसार आवश्यक जादा पिशवी लागणार असेल तर पूर्वसुचनेनुसार जादा पिशवी देणेस तयार आहोत.

०३ संस्थानमधील सर्व आवश्यक सुचना फलक / मार्गदर्शक बोर्ड नवीन आकर्षक तयार करुन देऊ मात्र त्यावर आयडीया कंपनीचा लोगो प्रिंट केला जाईल.

०४ संस्थान व संस्थान कर्मचाऱ्यांसाठी आयडीया कंपनीची ग्रुप मोबाईल सुविधा देऊ ती संस्थानला स्विकारावी लागेल.

०५ मंदिर परिसर सोडून सर्व निवासस्थान, हॉस्पिटल, प्रसादालय, शैक्षणिक संकुल या ठिकाणी P.C.O. कॉईन बॉक्स बसविणेस तयार आहोत मात्र सदर सेवा संस्थानमार्फत चालविण्यास आमची त्यास हरकत नाही. अथवा आम्ही कंपनीतर्फे चालविणेस तयार आहोत.

०६ संस्थानचे सर्व इमारतीमध्ये साईभक्तांचे सोईसाठी मोबाईल चार्जर सेवा आमचे कंपनीतर्फे देण्यात येईल. मात्र त्याकामी लागणारा इलेक्ट्रीकल पुरवठा व स्वीच बोर्ड संस्थानला बसवावे लागेल.

०७ आयडीया कंपनीतर्फे अत्यावश्यक हेल्प लाईन नंबर सेवा पुरविण्यात येईल. साईभक्त किंवा कर्मचारी यांनी संपूर्ण भारतातून या नंबरवर फोन केला असता त्याचे मुल्य फ्री असणार आहे. मात्र इनकमिंग चार्जेस संस्थानला भरावे लागतील.

०८ आयडीयाचे ग्राहकासाठी कुरीयरमार्फत मोतीचूर लाडू प्रसाद कंपनीतर्फे घरपोहच सेवा पुरविणेची इच्छा आहे. त्याकामी संस्थानची जी किंमत असेल ती कंपनी भरेल.

सध्या संस्थानला ०१ वर्षासाठी लाडू पॅकींग प्लास्टीक पिशवीसाठी सुमारे ६०,००,०००/- (रु. साठ लाख मात्र) खर्च येत आहे. गर्दीचे प्रमाणात वाढ होत असल्याने यापुढे रु. ६०,००,०००/- पेक्षा जास्त खर्च येण्याची शक्यता आहे. त्यामुळे आयडीया सेल्युलर कंपनी यांची विनंती मान्य केल्यास संस्थान खर्चात रु. ६०,००,०००/- पेक्षा जास्त बचत होऊ शकेल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, **आयडीया सेल्युलर कंपनीचे प्रस्तावामध्ये मागणी केलेल्या ८ मागण्या मान्य न करता फक्त मोतीचुर लाडू पॅकिंग प्लॅस्टिक पिशवी व कॅरीबॅगवर आयडीया कंपनीचा लोगो प्रिन्ट करुन प्लॅस्टिक पिशवी व कॅरीबॅग पुरविणेस तयार असल्यास त्यांचेकडून सध्या एक वर्षाकरिता लागणारी लाडू पॅकिंग प्लॅस्टिक पिशवी व कॅरीबॅग विनामुल्य घेण्यात यावी, असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय/कॅन्टीन)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ०७** **साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम ) इमारतीचे २८ खोल्या नूतनीकरण करणेबाबत ..**
**निर्णय क्र.३७४** भक्तनिवास (५०० रुम ) इमारतीचे नूतनीकरणाचे करावयाच्या कामाची समक्ष पहाणी आर्किटेक्ट अरविंद वैद्य, संगमनेर यांनी करुन याकामी रुपये ५,२०,६७,७००.०० मात्र रकमेचे इस्टीमेटचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि. २०/०५/२००७ चे सभेत सादर करणेत आला होता. त्यावर मा. व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा होऊन यापुर्वी नमुना दाखल करणेत आलेल्या तिन खोल्याचे नूतनीकरणाची मा. विश्वस्तांनी समक्ष पहाणी करुन उर्वरीत खोल्यांचे २५-२५ चे टप्प्याने नूतनीकरण करणेस व याकामी येणारे योग्य त्या खर्चास व वर्तमान पत्रात जाहिरात देवून निविदा मागविणेस मान्यता देणेत आली.

याबाबत दि. २६/०१/२००८ रोजी मा. विश्वस्त डॉ. गोंदकर यांनी नमुना दाखल रुमची पहाणी केली तसेच दि. ०२/०४/२००८ रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांनी आर्किटेक्ट अरविंद वैद्य, वरिष्ठ मुख्य अभियंता, व अधिक्षक साईबाबा भक्तनिवासस्थान यांचे समवेत नमुना दाखल करणेत आलेल्या रुमची तसेच नविन नूतनीकरण करण्याच्या रुमचीही पहाणी करणेत आली.

त्यावेळेस झालेल्या चर्चेनुसार आर्किटेक्ट यांनी अ टाईप २५ रुमचे व सी टाईप ३ रुमचे अशा एकूण २८ खोल्यांचे रुपये ३५,६५,२००.०० मात्रचे एस्टीमेट सादर केले होते. त्यानुसार निविदा मागविणेत येवून सदरचे प्राप्त झालेल्या निविदा मा. व्यवस्थापन समितीचे सभेत दि. ०६/०९/२००८ चे सभेत नि.क्र. ६४० (६) अन्वये उघडणेत आल्या. त्यावेळेस चर्चा होवून नूतनीकरणासाठी प्रस्तावीत करणेत आलेल्या बाबींपैकी भिंतीस डॅडो करण्यासारखा ॲटमचे कामकरणे आवश्यक वाटत नाही. असे ॲटम वगळल्यास खर्च कमी होऊ शकतो, तरी याबाबत सुधारीत फेर प्रस्ताव यथावकाश ठेवणेत यावा असे ठरले.

त्यानुसार आर्कि. अरविंद वैद्य, संगमनेर यांनी दि. २१/०३/२००९ चे पत्रान्वये ए टाईप चे २५ रुमचे व सी टाईप ३ रुमचे अशा एकूण २८ खोल्यांचे रुपये २८,३१,९७५.०० मात्र खर्चाचे एस्टीमेट सादर केले असून यामध्ये खालील बाबींचा समावेश केलेला आहे.

०१. रुममध्ये पोर्सेलिनो टाईल्सची फ्लोरींक करणे

०२. सध्या असलेल्या एम.एस. खिडकी काढून त्याठिकाणी एम.एस. ग्रील व ॲल्यु खिडक्या बसविणे.

०३. खिडक्यांकरीता मार्बलची फ्रेम करणे (Jambs & Sills )

०४. रुमचे सध्या असलेल्या मुख्य दरवाजा आहे. तसाच ठेवून त्यावर पुढील बाजुने ०६ एम एम प्लायवूड व १.५ एम एम लॅमिनेट बसविणे, नविन डोअर सेट बसविणे

०५. संडासकरीता कॉंक्रीटफ्रेम व बाथरुमकरीता मार्बल फ्रेम बसविणे
०६. टॉयलेटकरीता B.W.P. Quality flush door बसविणे
०७. टॉयलेट मध्ये Glazed Tiles dado व फ्लोरींगकरीता Antiskid Flooring करणे
०८. रुमचे भिंती व सिलींगला लस्टर पेंट करणे
०९. रुमचे प्रवेशव्दाराजवळ बिम व स्लॅब एका लेव्हलला दिसावा करीता सदर ठिकाणी पी.ओ.पी. सिलींग करणे
१०. रुममधील क्वॉटला डिकोपेंट करणे.प्रत्येक रुममध्ये व बेसिनसमोर आरसा बसविणे
११. प्रत्येक रुममध्ये कपडे अडकविणेकरीता हँगरची सोय करणे.

तरी याकामी अे टाईप चे २५ रुमकरीता व सी टाईपचे ३ रुमचे वरिल बाबींनुसार नूतनीकरण करणेकामी येणारे अंदाजे रुपये २८,३१,१७५.०० मात्रचे खर्चास व त्यानुसार **आर्किटेक्ट वैद्य, संगमनेर यांचेकडून निविदा फॉर्म तयार करुन निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला असता सदर कामाकरीता वर्तमान पत्रात जाहिरात देऊन स्पर्धात्मक निविदा मागविण्यास व याकामी सर्वसमावेषक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०७** **गुंतवणूकीबाबत निर्णय घेणे.**
**निर्णय क्र.३७५** माहे एप्रिल,२००९ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१. | स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी | ०३/०४/२००९ | २,८६,९०,११३.०० |
| ०२. | स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी | ०५/०४/२००९ | १,१४,७६,०४५.०० |
| ०३. | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | ०९/०४/२००९ | ३,४४,८०,४५८.०० |
| ०४. | किसान विकास पत्र, श्रीरामपूर | २३/०४/२००९ | २,५०,००,०००.०० |
| ०५. | दैनंदिन खर्च वजा जाता माहे एप्रिल २००९ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | ५,००,००,०००.०० |
| | | एकूण | १४,९६,४६,६१६.०० |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम **रु. १४.९६ कोटी** गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत

उपरोक्त अ.नं. २ स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी यांचेकडील मुदत पूर्ण होणारी रक्कम ही परकीय चलनातील असल्याने व परकीय चलन खात्यातील रक्कम ही खर्च करणे आवश्यक असल्याने, सदरची रक्कम संस्थानचे बँक ऑफ बरोडा, नाशिक येथील परकीय चलन बचत खात्यात वर्ग करावी लागेल. त्यामुळे ही रक्कम वजा जाता एकूण रु. १३.८१ कोटी इतकी रक्कम गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत आहेत.

वरीलप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल .

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी | ०५ | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी |
| ०२ | आंध्र बँक, शिर्डी | ०६ | स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी |
| ०३ | बँक ऑफ बरोडा, कोपरगांव | ०७ | बँक ऑफ बरोडा, नासिक |
| ०४ | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | ०८ | विजया बँक, शिर्डी |

तरी वरील अ.नं. १ ते ८ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.१३.८१ कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी व अ.नं.२ स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी कडील मुदत पूर्ण होणारी रक्कम बँक ऑफ बरोडा, नासिक येथील संस्थानच्या परकीय चलन बचत खात्यात वर्ग करण्यासाठी मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तपैकी जास्तीत जास्त व्याजदर देणाऱ्या राष्ट्रीयकृत बँकांकडे टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यात यावी व वरील अ.नं.०२ स्टेट बँक ऑफ इंडिया, शिरडी यांचेकडील मुदत पूर्ण होणारी रक्कम बँक ऑफ बडोदा, नाशिक येथील संस्थानच्या परकीय चलन बचत खात्यात वर्ग करण्यात यावी, तसेच नित्य प्रसादालय योजनेअंतर्गत आंध्र बँक शिर्डी यांचेकडे बचत खात्यात शिल्लक असलेली रक्कमही त्या बँकेकडेच प्रचलित व्याजदराने गुंतविण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-मुख्य लेखधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०८** **रुग्णालये विभागासाठी सन २००९-१० या आर्थिक वर्षासाठी स्वतंत्र पुर्व व अंतर्गत लेखापरीक्षकांची नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.३७६** श्रीसाईनाथ व श्रीसाईबाबा हॉस्पिटलची स्वतंत्र लेखाविषयक कार्यप्रणाली दि.०१ एप्रिल २००८ पासुन स्वतंत्ररित्या सुरु करण्यात आली आहे. वाढत्या व्यवहारांवर अचुक नियंत्रण रहावे यासाठी लेखाविभागाकडून अदा करण्यात येणारी देयके अदा होण्यापुर्वी सर्व नियमांचे पालन झाल्याबाबत स्वतंत्र पुर्व लेखापरीक्षकांकडून (Pre-Auditor) व अंतर्गत लेखापरीक्षकांकडुन तपासणी होणे गरजेचे आहे. यामुळे नजर चुकीने होणाऱ्या चुका व काही संभाव्य त्रुटी टाळणे शक्य होते व वैधानिक लेखापरीक्षकांसही त्यांचा महत्वपुर्ण फायदा होतो. वैधानिक लेखापरीक्षकांच्या आक्षेपांचे प्रमाण कमी होऊन होणाऱ्या चुका, लेखाप्रणालीमधील दोष वेळीच सुधारुन आर्थिक व्यवहारांवर अचुक नियंत्रण ठेवता येईल.

आर्थिक वर्ष २००८-२००९ साठी मे.व्ही.व्ही.कोठारी, चार्टर्ड अकौटंन्ट, श्रीरामपुर या लेखापरीक्षण संस्थेची पुर्व व अंतर्गत लेखारीक्षक म्हणून रु.२,००,०००/- एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आली होती. त्यांची मुदत मार्च २००९ रोजी संपत आहे. पुर्व लेखापरीक्षण व अंतर्गत लेखापरीक्षण दोन स्वतंत्र तज्ञ व कार्यक्षम लेखापरीक्षकांकडुन करुन घेण्याच्या दृष्टीने मे.व्ही.व्ही.कोठारी, चार्टर्ड अकौटंन्ट यांची पुर्व लेखापरीक्षक व इतर तज्ञ व कार्यक्षम लेखापरीक्षण संस्थांची अंतर्गत लेखापरीक्षक म्हणुन नेमणुक करुन मानधन ठरविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, **मे.व्ही.व्ही.कोठारी, चार्टर्ड अकौटंन्ट, श्रीरामपुर यांची पूर्वलेखापरिक्षक म्हणून सर्व करांसहीत रक्कम रुपये १,५०,०००/-वार्षिक फी वर नेमणूक करावी व अंतर्गत लेखापरिक्षक म्हणून मा.अध्यक्ष महोदय यांनी सक्षम लेखापरिक्षण संस्थेचे नांव सुचवावे असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९** **मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १४८/१ क्षेत्र ०५ हे ०२ आर भूसंपादनाने घेणेबाबत कै. साखरबाई हरीभाऊ शेळके यांची सर्व्हे नंबर १४८/१ मधील क्षेत्र ०० हे ६० आर जमीन विकत घेणेबाबत व क्षेत्र ०४हे १५आर ५०चौमी भूसंपादनातून वगळणेबाबत.**

**निर्णय क्र.३७७** **विषयाची पूर्वपीठीका.**

**(अ)** कै. साखरबाई हरीभाऊ शेळके, राहणार शिर्डी यांची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १४८/१ क्षेत्र ०४ हेक्टर ८६ आर पोटखराबा ०० हे १६ आर असे एकुण क्षेत्र ०५ हेक्टर ०२ आर " धर्मशाळा व इतर बांधकाम " यासाठी भूसंपादनाने घेणेबाबत मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस पत्र क्रमांक एसएसएस/वशी०२/ ११६६४/९९ दिनांक २९ डिसेंबर, १९९९ रोजी प्रस्ताव पाठविलेला आहे.

मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी त्यांचेकडील आदेश क्रमांक भूसं/कार्या/१६/ ५७/२०००, भूसं/एसआर/४/उविअ/१०/२०००, दिनांक ०८ फेब्रुवारी, २००० अन्वये मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना भूसंपादन कायदा, १८९४ चे कलम ५२ अ खाली भूसंपादनाचे प्रकरण चालविणेबाबत प्राधिकृत केले.

उपरोक्त जमिनीमधून १८ मीटर विकास योजनेतील रस्ता जात आहे. मोजणी खात्याने केलेल्या मोजणीमध्ये सदर रस्त्याचे क्षेत्र ०० हे २६ आर ५० चौरस मीटर आहे ते वजा जाता आता ०४ हेक्टर ५९ आर ५० चौमी अधिक पोटखराबा ०० हे १६ आर ०० चौमी एकूण क्षेत्र ०४ हेक्टर ७५ आर ५० चौमी संपादन करावयाचे आहे. त्याप्रमाणे मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी त्यांचेकडील क्रमांक भूसंपादन/१/कावि/५४०/२००१, एसआर/६/२००१, दिनांक २१ डिसेंबर, २००१ रोजी सुधारीत नोटीफिकेशन काढले. सदरचे सुधारीत नोटिफिकेशन महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १० जानेवारी, २००२ चे पृष्ठ क्रमांक ३२ वर प्रसिध्द झालेले आहे.

**(ब)** कै. साखरबाई हरीभाऊ शेळके यांनी दिनांक १६ फेब्रुवारी, २००४ रोजी जमीन खरेदीबाबत प्रस्ताव दिला. त्यांत खालील बाबी नमूद केलेल्या आहेत :

०१. त्याचे जमिनीपैकी ०६ एकर जमीन संस्थानला द्यावयास तयार आहे. उरलेली जमीन त्यांचेसाठी सोडून देणेत यावी.

०२. सदर जमीन प्रती गुंठा १,२५,०००/- मात्र याप्रमाणे द्यावयास तयार आहे.

सदर अर्जाबाबत तत्कालीन मा. व्यवस्थापन मंडळाचे दिनांक २९-३१ मार्च, २००४ रोजीच्या सभेत निर्णय क्रमांक १५१ खालीलप्रमाणे झालेला आहे :

" .. .. अर्जदार यांचे वरील म्हणण्यावर सविस्तर चर्चा होऊन, हा विषय सामोपचाराने संपुष्टात आणण्यासाठी अर्जदार यांची विनंती मान्य करणेत यावी, असे ठरले. त्याप्रमाणे उच्च न्यायालय, खंडपीठ

औरंगाबाद येथे रिट पिटीशनमध्ये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी व श्रीमती साखरबाई शेळके यांनी संयुक्तपणे समझोता अर्ज दाखल करावा, त्याचप्रमाणे सर्व्हे नंबर १४८/१ पैकी वर निर्देश केलेली (संस्थान जमिनी लगतची) ०२ हेक्टर ४० आर (डी. पी. रोडचे क्षेत्र सोडून, ज्याचा वेगळा खरेदी व्यवहार करावा) जमीन संपादन करावयाची कार्यवाही चालू ठेवणेबाबत मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना कळविण्यांत यावे आणि जमीन क्षेत्र ०२ हेक्टर ३५ आर ५० चौमी भूसंपादनातून वगळण्यांत यावे, असे ही त्यांना कळविणेत येऊन, पुर्वीचे प्रस्तावाऐवजी ०२ हेक्टर ४० आर क्षेत्र भूसंपादीत व्हावे आणि त्याप्रमाणे अॅवॉर्ड प्रमाणे होणारी रक्कम उभयतांना मान्य असेल, असे भूसंपादन अधिकाऱ्यांना कळविण्यांत यावे. ”

त्याप्रमाणे श्रीमती साखरबाई शेळके यांना पत्र क्रमांक एसएसएस/वशी-२/४२१३ /२००३, दिनांक ०५ मे, २००४ अन्वये कळविणेत आलेले आहे. त्याचप्रमाणे इकडील पत्र क्रमांक एसएसएस/वशी-२/५३८६/ २००४, दिनांक २९ मे, २००४ रोजी स्मरणपत्र दिले. तसेच पत्र क्रमांक एसएसएस/वशी-२/६४४५/२००४, दिनांक २६ जून, २००४ रोजी स्मरणपत्र दिले.

श्रीमती साखरबाई शेळके यांनी दिनांक २८ जून, २००४ रोजीच्या पत्राने, त्या सदरची जमीन ९०,०००/- प्रती गुंठा या दराने द्यावयास तयार आहेत, असे पत्र दिले. त्यांना पत्र क्रमांक एसएसएस/वशी०२/ २३६०/२००४, दिनांक २२ जुलै, २००४ अन्वये त्यांची विनंती मान्य करता येत नाही म्हणून कळविण्यांत आले.

त्यावर श्रीमती साखरबाई शेळके यांनी भूसंपादनाच्या अॅवॉर्डप्रमाणे रक्कम स्वीकारणेस तयार आहोत, असे कळविले. त्यावर साक्षीदार म्हणून त्यांच्या मुली ०१. श्रीमती रजनी विश्वास जोगळेकर, ०२. श्रीमती संजीवनी दशरथ महांबरे यांनी सहया केलेल्या आहेत.

उपरोक्त अर्जाप्रमाणे पत्र क्रमांक एसएसएस/वशी-०२/८४७६/२००४, दिनांक २६ ऑगष्ट, २००४ रोजी त्यांना “ .. .. याबाबत उभयपक्षी करावयाचा समझोता अर्जाचा मसुदा आपले वकील व संस्थानचे वकील यांचेकडून तयार करावा याबाबत मा. हायकोर्ट खंडपीठ, औरंगाबाद येथे अर्ज दाखल करणेची कार्यवाही लवकरात लवकर करावी, अशी त्यांना विनंती करण्यात आलेली आहे. ”

दिनांक ०८ सप्टेंबर, २००५ रोजीच्या पत्रात अॅवॉर्डाप्रमाणे होणारी रक्कम उभयतांना मान्य असलेचे तसेच रस्त्यात जाणारे क्षेत्र खरेदी करुन द्यावयाचे ठरले, असे कळविणेत आले होते.

तद्नंतर, श्रीमती साखरबाई शेळके यांनी दिनांक १० सप्टेंबर, २००५ रोजी अर्ज दिला, त्यात त्यांनी खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे,

०१. सर्व्हे नंबर १४८/१ पैकी ०२ हेक्टर ४० आर संपादनास लेखी संमती अथवा तोंडी संमती दिलेली नाही.

०२. सर्व्हे नंबर १४८/१ पैकी रस्त्याचे ११ आर क्षेत्र खरेदी देण्याचे व ताब्यात देण्याचे कधी ही मान्य केले नव्हते.

०३. सर्व गोष्टी मान्य करुन संमती दिली असा समज करुन घेतल्याचे दिसते.

०४. त्यांचे बरोबर कोणताही निश्चित स्वरुपाचा करार केलेला नाही.

०५. संस्थानच्या दिनांक ०८ सप्टेंबर,२००५ रोजीच्या पत्रामधील मजकूर त्यांना मान्य नाही.

थोडक्यात, कै. साखरबाई हरीभाऊ शेळके या संस्थानला जमीन देण्यास तयार नव्हत्या.

**(क)** मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे श्रीमती साखरबाई हरीभाऊ शेळके यांनी रिट पिटीशन क्रमांक ३९०/२००२ दाखल केलेला आहे. त्यात खालीलप्रमाणे मागणी केलेली आहे :

०१. मौजे शिर्डी येथील स.नं. १४८/१, क्षेत्र ०५ हे ०२ आर बाबत मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडे चालू असलेले भूसंपादनाचे कागदपत्र मागवून घेणेत यावेत.

०२. मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांनी स.नं. १४८/१ क्षेत्र ०४ हे ५९ आर ५० चौमीबाबत भूसंपादन कायदा कलम ४ खाली काढलेले क्रमांक भूसंपादन/कावि-६/२/एलएक्यु/एसआर/ १०/२००० हे नाटिफिकेशन रद्द करणेत यावे व सदरचे भूसंपादन हे सार्वजनिक कामासाठी नाही व योग्य नाही, असे जाहिर होऊन भूसंपादनाचा प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

०३. प्रकरणाच्या अनुषंगाने योग्य ते मार्गदर्शन व आदेश होणेस विनंती आहे.

०४. सदर रिट पिटीशनची सुनावणी चालू असतांना व त्याचा अंतिम निकाल लागेपर्यन्त भूसंपादन कायदा कलम ६ अन्वये व काढलेले नोटिफिकेशन क्रमांक भूसंपादन/कावि-६/२/एलएक्यु/एसआर/ १०/२०००, दिनांक ०१ ऑक्टोबर, २००१ च्या अनुषंगाने होणाऱ्या कार्यवाहीस स्थगिती देण्याची विनंती आहे.

०५. रिट पिटीशनची सुनावणी चालू असतांना व त्याचा अंतिम निर्णय होईपर्यन्त स.नं. १४८/१ क्षेत्र ०५ हेक्टर ०२ आर ताबा घेऊ नये म्हणून मनाई हुकूम देणेत यावा.

०६. अर्जदाराला दाव्याचा खर्च देणेत यावा.

याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचा दिनांक २९ एप्रिल, २००२ रोजी खालीलप्रमाणे आदेश झालेला आहे :

" .. .. सदर रिट पिटीशनची सुनावणी होऊन अंतिम निकाल होईपर्यन्त स्थगिती देण्यात येत असून, जैसे थी ती स्थिती ठेवावी. "

सदर रिट पिटीशनमध्ये संस्थानचे वकील श्री. आर. एन. धोर्डे यांच्या अभिप्रायानुसार श्रीमती साखरबाई हरीभाऊ शेळके यांचे रिट पिटीशन फेटाळण्यात यावे, याबाबत श्री.पी.टी.जोशी, प्रशासकीय अधिकारी यांचे प्रतिज्ञापत्र दिनांक १७ जून, २००२ रोजी दाखल करणेत आलेले आहे.

मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांना सदर रिट पिटीशन मधील मनाई हुकूम उठविणेबाबत सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांना कार्यवाही करणेबाबत कळविणेत आलेले आहे. त्याप्रमाणे मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी देखील त्यांचे स्तरावरुन सदर रिट पिटीशन मधील स्थगिती आदेश उठविणेबाबत पाठपुरावा चालु ठेवला आहे.

**(ड)** श्रीमती साखरबाई हरीभाऊ शेळके ह्या दिनांक ०५ ऑगष्ट, २००८ रोजी मयत झालेल्या आहेत. त्यांना खालीलप्रमाणे तीन मुली वारस आहेत :

०१. श्रीमती रजनी विश्वास जोगळेकर

०२. श्रीमती संजीवनी दशरथ महांबरे

०३. सौ. सोनिया देवीदास पाटील

**आता,** उपरोक्त ०३ वारस मुलींनी दिनांक ०१ एप्रिल, २००९ रोजी इकडील कार्यालयास विनंती अर्ज दिला असून, त्यामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :

" .. .. जिल्हा अहमदनगर, तालुका राहाता, मौजे शिर्डी येथील जमीन सर्व्हे नं. १४८ क्षेत्र साडेबारा एकर अशा जमीनीवर श्री साईबाबा संस्थान यांचे आरक्षण आहे. आम्ही नामदार हायकोर्टात त्या विरुध्द रिट पिटीशन करुन स्टे घेतला आहे.

संस्थान संबधीत जमीनीबाबत तडजोड करण्यास तयार असेल तर त्यानुसार श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने दिड एकर क्षेत्र देण्यास तयार आहोत. मात्र आम्ही दिड एकर क्षेत्र संस्थानला बाजारभावाने खरेदी दिल्यास, राहिलेल्या संपुर्ण क्षेत्रावरील आरक्षण उठविण्यात आले पाहिजे. तसेच भविष्यात पुन्हा पुन्हा आमच्या जमीनीवर आरक्षण करण्यात येऊ नये. तडजोड झाल्यावर आम्ही रिट पिटीशन काढुन घेऊ, तरी याबाबत योग्य तो निर्णय चर्चेत घेण्यात यावा. संबंधीत विषय राहिल्या अनेक वर्षापासून तडजोडीसाठी प्रलंबीत असुन तडजोड मात्र होत नाही. सदर क्षेत्र आम्ही जमिनीच्या पश्चिम बाजुने देण्यास तयार आहे. तरी योग्य तो निर्णय घ्यावा, ही आपणांस विनंती. "

सदरहू सर्व्हे नंबर १४८/१ क्षेत्र ०५ हेक्टर ०२ आर पैकी यामधून विकास योजनेतील रस्ता जात आहे. परंतु त्याबाबत त्यांनी अर्जात उल्लेख केलेला नाही. सदरचे भूसंपादनाचे प्रकरण १९९९ साली सादर केलेले होते. त्यावेळेस मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी ०४ हेक्टर ७५ आर ५० चौमी जमिनीची निवाडयामध्ये झाडे, झुडूपे, विहीर, ३० टक्के दिलासा, १२ टक्के अतिरिक्त घटक व आस्थापना चार्जेस मिळून एकूण किंमत रुपये ३,२९,१७,९७२/- मात्र धरलेली आहे, म्हणजे प्रती आर ६९,२२७/- मात्र किंमत संस्थानला द्यावी लागणार होती व आताही निवाडयाप्रमाणे होणारी किंमत द्यावी लागणार आहे, कारण भूसंपादनाची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे

त्यानंतर सन २००४ मध्ये कै. साखरबाई हरीभाऊ शेळके यांनी रक्कम रुपये ९०,०००/- मात्र प्रती गुंठा मागणी केली होती, परंतु दिनांक १० सप्टेंबर, २००५ रोजीच्या पत्रात त्यांनी सदरचे म्हणणे नाकारले आहे.

सन २००७ व सन २००८ च्या रेडिरेकनरप्रमाणे प्रती आर रुपये २,५०,०००/- मात्र अशी किंमत येत आहे.

**(इ)** **(१)** अर्जदार श्रीमती जोगळेकर व इतर दोन यांनी दिनांक ०१ एप्रिल, २००९ रोजी जमिनीच्या पश्चिम बाजूस दिड एकर जमीन घ्यावी म्हणून दिलेला आहे. भूसंपादनाचे प्रकरणाने संस्थानला ०४ हे ७५ आर ५० चौमी जागा मिळणार आहे. याबाबत कै. साखरबाई हरीभाऊ शेळके यांनी दिनांक १६ फेब्रुवारी, २००४ रोजीच्या पत्रान्वये सहा एकर जमीन देणेबाबतचा प्रस्ताव दिलेला होता.

**(२)** मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे मयत साखरबाई हरीभाऊ शेळके यांनी महाराष्ट्र शासन व संस्थान विरुध्द रिट पिटीशन ३९०/२००२ दाखल केलेला आहे. सदरची दावा सुनावणीस घेणेबाबत मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी पाठपुरावा केलेला आहे. तसेच, सदरहू दावा सुनावणीस घ्यावा म्हणून मा. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी दिनांक ०६ फेब्रुवारी, २००९ रोजी मा. उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर व मा. कार्यकारी अधिकारी यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्राच्या अनुषंगाने सदरहू दावा सुनावणीस निघालेला आहे. साधारणतः चालू महिन्यास दावा केव्हांही सुनावणीस येऊ शकतो.

**(३)** अर्जदार यांनी बाजारभावाप्रमाणे किंमत मागणी केली आहे. परंतु भूसंपादनाचा निवाडा कधी ही जाहीर झाला तरीदेखील भूसंपादन कायदा १८९४ चे कलम ४ ची अधिसूचना ज्या तारखेस प्रसिध्द झाली, त्या तारखेस असणारी किंमत भूसंपादनाने बाधीत होणाऱ्या जमीनमालकांस देण्यात येते.

**(ई)** उपरोक्त परिच्छेदात नमूद केलेल्या विवेचनानुसार, कै. साखरबाई हरीभाऊ शेळके यांची सर्व्हे नंबर १४८/१ मधील जमिनीबाबत खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती आहे :

०१. श्रीमती जोगळेकर, श्रीमती महांबरे, श्रीमती पाटील यांनी दिलेल्या विनंती अर्जानुसार, सर्व्हे नंबर १४८/१ पैकी मधील क्षेत्र ०० हे ६० आर (विकास योजनेतील रस्त्याचे क्षेत्र सोडून) इतकी जमीन जमीनमालकांच्या सर्व्हे नंबर १४८/१ च्या पश्चिमबाजूने खरेदी घेणे अथवा न घेणे तसेच उर्वरित ०४ हेक्टर १५ आर ५० चौमी जमीन भूसंपादनातून वगळणे अथवा न वगळणे.

०२. सदरची जमीन खरेदीबाबत प्रती आर दर निश्चित करणे.

०३. जमीन खरेदीसाठी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे अर्ज करुन परवानगी घेणे.

०४. अर्जदार यांची ६० आर जमीन घेणे व उर्वरित जमीन भूसंपादनातून वगळणेबाबत निर्णय झाल्यास, मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे कै. साखरबाई हरीभाऊ शेळके यांनी दाखल केलेल्या रिट पिटीशन मध्ये अर्जदार यांचे वकील व संस्थानचे वकील श्री. आर. एन. धोर्डे यांच्या मार्गदर्शनाने समझोत्याचा अर्ज दाखल करणे.

०५. भूसंपादनातून क्षेत्र वगळण्याचा निर्णय झाल्यास भूसंपादन प्रस्ताव रद्द करणेपोटी शासनाला भरावा लागणारा आस्थापना खर्च अर्जदाराकडून वसूल करणे अथवा न करणे.

०६. जमीन खरेदीचा निर्णय झाल्यास, खरेदीखताच्या वेळेस अर्जदार यांना ताब्यात मिळणारे क्षेत्राच्या एकूण किंमतीपैकी ८० टक्के रक्कम आदा करणे व सरकारी मोजणी झाल्यानंतर उर्वरीत २० टक्के रक्कम आदा करणे.

०७. खरेदीचा निर्णय झाल्यास, खरेदीखतासाठी कायदेशीर बाबींसाठी संस्थान वकीलांचा अभिप्राय घेणे, सर्च रिपोर्ट घेणे इत्यादी अनुषंगिक बाबींसाठी तसेच खरेदीखतासाठी येणाऱ्या सर्वसमावेशक अनुषंगिक खर्चास मान्यता देणे याबाबतचा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

आजचे सभेपुढे कै.साखरबाई हरीभाऊ शेळके यांच्या वारस मुली श्रीमती रजनी विश्वास जोगळेकर व श्रीमती संजीवनी दशरथ महांबरे या सदरहू प्रस्तावाच्या अनुषंगाने चर्चा करणेकामी उपस्थित

होत्या. सुरुवातीस श्रीमती रजनी जोगळेकर यांनी विषयांकित जमिनीचे संदर्भात त्यांनी दिलेल्या अर्जाबाबत सभेस माहिती दिली व अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा, अशी विनंती केली.

या अनुषंगाने, मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर साधकबाधक चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला :

०१. श्रीमती जोगळेकर व इतर २ यांनी समक्ष केलेल्या विनंतीनुसार, सर्व्हे नंबर १४८/१ पैकी मधील ०१ हे ०० आर जमीन (विकास योजनेतील रस्त्याचे क्षेत्र सोडून) जमीनमालकांच्या सर्व्हे नंबर १४८/१ च्या पश्चिम बाजूने खरेदी करणेत यावी. यदाकदाचित जमीनमालक खरेदी देऊ इच्छित असलेल्या जमिनीच्या क्षेत्रात जर विहीर अथवा कुपनलिका उपलब्ध असल्यास, सदरहू विहीर अथवा कुपनलिकेवर अथवा त्यावरील पाण्यावर आदिंवर जमीनमालकांचा कोणत्याही प्रकारचा हक्क अथवा वहिवाट राहणार नाही.

०२. सर्व्हे नंबर १४८/१ पैकी मधील ०१ हे ०० आर जमीन रक्कम रुपये २,५०,०००/-मात्र प्रति आर या दराने खरेदी करणेत यावी. सदरहू जमिनीचे खरेदीखत करतांना प्रत्यक्ष ताब्यात मिळणारे जमिनीचे एकूण किंमतीचे ८० टक्के रक्कम खरेदीखत नोंदणीचे वेळेस व उर्वरित २० टक्के रक्कम जमिनीस संस्थानचे नांव लागलेनंतर व विहीत पध्दतीने संस्थानमार्फत सरकारी मोजणी झालेनंतर प्रत्यक्ष ताब्यात मिळणारे जमिनीचे प्रमाणांत आदा करण्यात यावी.

०३. उपरोक्त जमीन खरेदी करणेकामी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांची रितसर परवानगी घेणेत यावी.

०४. सर्व्हे नंबर १४८/१ पैकी मधील खरेदी करावयाची ०१ हे ०० आर जमीन वगळतां उर्वरित ०३ हे ७५ आर ५० चौमी जमीन भूसंपादनातून वगळणेबाबतचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेमार्फत सादर करण्यात यावा.

०५. भूसंपादनाचा प्रस्ताव वगळणेसाठी / रद्द करणेसाठी शासनाकडे जो आस्थापना खर्च संस्थानला भरावा लागणार आहे, तो आस्थापना खर्च संबंधीत जमीनमालकांनी भरणे आवश्यक राहिल. सदरहू आस्थापना खर्चाची रक्कम खरेदीखताचे अगोदर भरणे आवश्यक राहील. जर सदरहू रक्कम संबंधीत जमीनमालकांनी भरली नाही तर जमीनमालकांची खरेदीखताव्दारे राखून ठेवणेत येणाऱ्या २० टक्के रक्कमेतून सदरहू आस्थापना खर्चाची रक्कम वसूल करण्यांत यावी. सदरहू शर्त / अट खरेदीखतात नमूद करण्यात यावी.

०६. जमीन खरेदी करणेकामी परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव अथवा भूसंपादनातील जमीन वगळणेबाबतचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस सादर करणेपूर्वी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे कै.साखरबाई हरीभाऊ शेळके यांनी दाखल केलेल्या रिट पिटीशनमध्ये अर्जदार यांचे वकील व संस्थानचे वकील श्री. आर. एन. धोर्डे यांच्या मार्गदर्शनाने समझोत्याचा अर्ज दाखल करणेत यावा.

तसेच उपरोक्त सर्व कायदेशीर, महसुल संबंधीत कार्यवाहीस विलंब लागण्याची शक्यता गृहीत धरुन कै.साखरबाई हरीभाऊ शेळके यांच्या वारस मुलींकडून याबाबत योग्य अटी व शर्तीचा समावेश असलेला समझोता करारनामा करुन घेणेत यावा. तत्पूर्वी सदरहू निर्णय संबंधीत वारस मुलींना लेखी कळविणेत यावा. त्यांचेकडून सदरहू निर्णय मान्य असलेबाबत / सदरहू निर्णयास संमती आहे, असे कार्यालयास लेखी कळविण्यांत आल्यानंतर सदरहू प्रस्तावाबाबत करावी लागणारी उचित कार्यवाही करणेत यावी.

०७. **उपरोक्त सर्व कार्यवाहीसह खरेदीखतासाठी करावे लागणारे कायदेशीर बाबींसाठी संस्थान वकीलांचा अभिप्राय घेणे, सर्च रिपोर्ट घेणे, खरेदीखताचा मसुदा तयार करणे, खरेदीखत नोंदणी करणेकामी मुद्रांक व नोंदणी शुल्क भरणे, जमिनीचे सरकारी मोजणीकामी मोजणी शुल्क भरणे, वकिल फी आदा करणे इत्यादी अनुषंगिक बाबींसाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावशेक अनुषंगिक खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा विषय नं.१०** **गुरुद्वारा सचखंड बोर्ड,नांदेड यांचेकडील मोदक ब्रॅण्डचे गावरान तूप खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.३७८** मा.अधिक्षक,गुरुद्वारा सचखंड,बोर्ड,नांदेड यांनी त्यांचेकडील दिनांक २४.१२.२००८ रोजीचे पत्र क्र.५४१२/०८-०९ अन्वये संस्थानला पत्र देऊन कळविले आहे की, दिनांक ३० ऑक्टोबर,२००८ रोजी त्यांचेकडे श्रीगुरुग्रंथसाहेब शताब्दी महोत्सव कार्यक्रम साजरा करण्यात आला. त्यासाठी रेखा डेअरी इंडस्ट्रीज, इंदौर या फर्मकडून मोदक ब्रॅण्डचे खरेदी करण्यात आलेल्या गावरान तूपातील प्रती १५ किलोचे ५५०० डबे (८२५ क्विंटल) गावरान तूप त्यांचेकडे शिल्लक आहे. सादरचे गावरान तूप संस्थानने खरेदी करावे, अशी विनंती केली होती.

सदरचे पत्र दिनांक १९.०३.२००९ रोजीचे व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर केले होते. त्यावर संस्थानचे मा.विश्वस्त श्री.अशोक खांबेकर व संस्थानचे अधिकारी यांनी गुरुद्वारा सचखंड बोर्ड, नांदेड येथे समक्ष जाऊन मोदक ब्रॅण्डचे गावारान तूप खरेदीबाबत खातरजमा करुन अहवाल सादर करावा असा निर्णय झाला होता.

उपरोक्त निर्णयानुसार मा.विश्वस्त श्री.अशोक खांबेकर व श्री.उगले,अधिक्षक,प्रसादालय यांनी नांदेड येथे समक्ष जाऊन पहाणी केली. त्याचप्रमाणे गुरद्वारा सचखंड बोर्ड,नांदेड यांचेकडील गावरान तूपाचे ३ डबे आणुन प्रायोगिक तत्वावर वापरणेत आले व त्याचे प्रसादरलाडू बनविणेत आले. तथापि सदर तुपाचे लाडू कडक झाले असल्याचे निदर्शनास आले.

त्यामुळे उपरोक्त बाबींचा विचार करता **मे.गुरुद्वारा सचखंड बोर्ड,नांदेड यांचेकडील मोदक ब्रॅण्डचे गावरान तूप स्विकारणेबाबतची त्यांची विनंती अमान्य करणेत येऊन त्यांना तसे दिलगीरीपर लेखी पत्र देऊन कळविण्यात यावे,असें ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **मा.विश्वस्तांचे सुचनेबाबत.**

**निर्णय क्र.३७९** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

०१. सध्या संस्थानचे जुने प्रसादालय परिसरातील सुलभ शौचालय चालविणेबाबत नविन एजन्सीची नियुक्ती करण्यात यावी. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

०२. श्रीसाईबाबा रुग्णलयातील सुव्यवस्थित कार्यान्वित असलेला नेत्रशल्य विभाग श्री साईनाथ रुग्णालयात स्थलांतरीत करण्यात येऊ नये. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

वरील निर्णय क्र ३१७ ते ३७९ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
(किशोर रा.मोरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

स्वाक्षरीत/-
(जयंत मुरलीधर ससाणे )
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)